महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपयुक्त



# झटपट निबंध

डॉ. पवन मांडवकर

## अनुक्रमणिका


'झटपट निबंध' अभ्यासण्यापूर्वी ०३
अनुक्रमणिका ०४
निबंध ०५
१. संताचे समाजप्रबोधन
संतांची सामाजिक कामगिरी १७
२. प्रदूषण : एक भीषण समस्या २८
३. भोदुगिरी : एक वाढती चिंता
बुवाबाजी : एक समस्या ३६
४. शिक्षणाची दशा आणि दिशा
आजची शिक्षणपद्धती ४४
५. कर्माची महती
केल्याने होत आहे रे ५१
६. शेतकऱ्यांची दैन्यावस्था ५८
७. धर्मनिरपेक्षता : काळाची गरज ७०
८. मातृभाषेचे महत्त्व ७७
९. लोकसंख्येचा भस्मासुर ८६
१०. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व ९७
११. जाहिराती : किती भ्रामक? किती खऱ्या?
१०४
१२. स्त्रियांपुढील आव्हाने
बदलते स्त्रीजीवन ११२
१३. राष्ट्रीय एकात्मता १२०
१४. आजची लोकशाही १२८
१५. बेकारीची समस्या १३५
१६. हुंडा : एक कलंक १४२
१७. अंधश्रद्धा : भीषण समस्या १४९




शासनमान्य यादीतील पुस्तक

# झटपट निबंध

(शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी व मराठीच्या अभ्यासकांना विशेष उपयुक्त)


## डॉ. पवन मांडवकर



**वक्रतुंड एंटरप्रायजेस**

सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी

कोल्हापूर ४१६ ०१०

भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९

ISBN 978-81-925695-6-7

झटपट निबंध
[Zatpat Nibandha]

© प्राचार्य डॉ. पवन मांडवकर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

नवीन आवश्ती ३ नोव्हेंबर २०२२
प्रती १०००

प्रकाशक
वक्रतुंड एंटरप्रायजेस
सौ. अपर्णा अनिल मोहिते
सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी
कोल्हापूर ४१६ ०१०
भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९

मुद्रक
दमयंती एजन्सी, कोल्हापूर

मुखापश्ष्ठ
भरत यादव
कोल्हापूर

मूल्य २४० रुपये

# ‘झटपट निबंध’ अभ्यासण्यापूर्वी..

संगणकाच्या युगात आपल्याला सर्व गोष्टी तयार आणि त्वरेने हव्याहव्याशा वाटू लागतात. परीक्षार्थ्यांना निबंधही तयारच मिळावे, ही त्यांची अपेक्षा असते, त्यातूनच ‘झटपट निबंध’ या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

‘निबंध’ हा प्रकार शाळेपासून तर महाविद्यालयापर्यंत भाषेचा अभ्यास करणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना सतत अभ्यासक्रमात राहिलेला आहे. एखाद्या विषयासंबंधी विद्यार्थ्याचे ज्ञान, त्याकडे बघण्याचा दृष्टिकोण, माहिती देत असताना त्याने मांडलेला युक्तिवाद, त्याचे भाषाप्रभुत्व, त्याने मांडलेले समर्पक दृष्टांत, म्हणी, वाक्प्रचार, सुविचार आणि त्याचे अवांतर वाचन अशा सगळ्यांचे मूल्यमापन निबंधालेखनातून होत असते. निबंध म्हणजे नेमके काय आणि त्याच्या प्रकारांविषयी चर्चा या पुस्तकात केलेली आहेच. फक्त हे पुस्तक महाविद्यालयीन विद्यार्थी डोळ्यांसमोर ठेवून लिहिले आहे आणि वारंवार जे विषय परीक्षांमध्ये विचारले जातात, तेच येथे हाताळले आहेत.

या पुस्तकाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल की निबंध हा प्रकार तसा कठीण नाही. फक्त योग्य पद्धतीने तो मांडतला पाहिजे. मुद्देसूद, तर्कशुद्ध आणि शैलीदार निबंध लिहिण्यासाठी अवांतर वाचन हवे. ह्या अभ्यासानंतर विद्यार्थीही नवनवीन विषयांवर स्वतः निबंध ानिर्मिती करू शकतील, अशी आशा वाटते.

- पवन मांडवक

करण्याकरिता एखादी म्हण, सुभाषित, कविवचन, सूचक प्रश्न, एखादा किस्सा किंवा कल्पनारम्य वाक्य वापरता येते. त्यानंतर मुख्य विषयाच्या संदर्भात आपले विचार मांडायचे असतात. शेवटी समारोपीय निष्कर्ष किंवा सारांश मांडायचा असतो. निबंधाचा शेवटही परिणामकारक असावा. शेवटी वापरलेली वाक्ये किंवा काव्याच्या ओळी वाचकांवर प्रभाव पाडणाऱ्या असाव्यात.

निबंधात विषयाच्या मुद्यानुरूप परिच्छेद पाडायचे असतात. निबंधाची भाषा प्रभावी असावी; पण क्लिष्ट असता कामा नये. सुबोध व रसाळ असावी. सजावटीकरिता सुंदर शब्द, वाक्प्रचार, म्हणी, अवतरणे, सुभाषिते यांची पेरणी करावी.

## निबंधलेखनाचे तंत्र आणि मंत्र

चांगला निबंध लिहिण्याकरिता विद्यार्थ्याने भरपूर वाचन करावे. वेळोवेळी जाणवलेल्या महत्त्वाच्या घडामोडी, आलेले अनुभव लक्षात ठेवावे. विचारांना कल्पनेचे पंख जोडून निबंधलेखनप्रांतात भराऱ्या माराव्या. 'वाचा, ऐका, पहा, विचार करा, लिहा' हे निबंधलेखन करणाऱ्यांकरिता मोलाचे सूत्र ठरते. विचारप्रधानता, विषयनिष्ठता, रचनाबद्धता ही निबंधाची वैशिष्ट्ये ठरतात. आकर्षक आरंभ व शेवट, मुद्देसूद, बांधेसूद विस्तार (प्रस्तावना, विषय प्रतिपादन



# निबंध

बहुतेकांनी शालेय जीवनात 'निबंध' अनेक वेळा लिहिला असेल; परंतु तो एक वाङ्मयप्रकार आहे, निबंधलेखनाचेही तंत्र असते, याची जाणीव त्यावेळी झालेली नसेल. 'पावसाळ्यातील एक दिवस', 'माझी शाळा', 'माझा आवडता लेखक' अशा विषयांवर निबंध लिहिला असला तरी ते लेखन या वाङ्मयप्रकारात तांत्रिकदृष्ट्या बसते का, याचा विचार तेव्हा केला नसेल; पण आता निबंधलेखनाची जी वैशिष्ट्ये आहेत, त्याचे जे प्रकार आहेत आणि लिहिण्याचे जे तंत्र आहे, त्याचा अभ्यास करावयाचा आहे.

साहित्यनिर्मिती ही प्रामुख्याने भावनांचे प्रकटीकरण करण्यासाठी होत असते. विविध साहित्यप्रकारांतून मानवी भावभावनांचे अनेकविध रंग साहित्यिकाने वाचकाला उलगडून दाखविलेले असतात. निबंध हा प्रकार मानवी मनाचे दर्शन घडविणारा परंतु भावभावनांमध्ये वाहवत न जाणारा एक साहित्यप्रकार आहे. तो गद्यलेखनाचा एक प्रकार म्हणून ओळखला जातो. त्याचाच अभ्यास आपल्याला करावयाचा आहे.

## निबंध म्हणजे काय? :-

स्वमत प्रदर्शन करून एखाद्या विषयाचे व्यापक दृष्टिकोनातून केलेले विवेचन म्हणजे निबंध होय. 'निबंध' (नि+बंध) या शब्दाचा अर्थ बांधणे, गुंफणे किंवा जुळवणे असा आहे. नेमकी, नीटनेटकी विचारांची बांधणी म्हणजे निबंध किंवा आपल्याला सुचणाऱ्या विचारांची, कल्पनांची सुयोग्य मांडणी म्हणजे निबंध. निबंधाची साधीसोपी व्याख्या करावयाची झाल्यास एखाद्या विषयासंबंधी केलेले स्पष्टीकरणात्मक, विवरणात्मक लेखन किंवा माहितीपूर्ण विवेचन म्हणजे निबंध असे म्हणता येईल.

पुष्कळदा एखाद्या विषयावर वेगवेगळ्या अभ्यासकांची वेगवेगळी मते असू शकतात. विविध मतांचा अभ्यास करून योग्य वाटणारी मते मान्य करणे व अयोग्य वाटणाऱ्या मतांचे खंडन करणे निबंधात अपेक्षित असते. त्यातून काही निष्कर्ष काढता येतात. म्हणजेच एखाद्या विषयाची विविध अंगे अभ्यासून, त्यावरील भिन्नभिन्न मते खंडनमंडन करून काही निष्कर्ष काढणे याला निबंधरचना म्हणतात. निष्कर्ष मांडताना किंवा विषयासंबंधी मते मांडताना तर्कशुद्धता असावी लागते. मुद्यांमध्ये सुसंगती असावी लागते. आपली मते पटविण्याकरिता अनुभव पाठीशी ठेवून स्पष्टीकरण, उदाहरणे द्यावी लागतात. म्हणजेच तर्कशुद्ध रीतीने केलेली, बुद्धीला आवाहन करणारी, सर्व सिद्धांत साध



ार व सप्रमाण मांडणारी, इतिहास, अनुभव व अवलोकन यांच्या पायावर उभी असलेली विचारप्रधान रचना म्हणजे निबंध.

ज्याप्रमाणे वनातील मिळतील ती फुले गोळा करून, हवी ती सुंदर फुले निवडून आकर्षक हार तयार केला जातो, तशाच प्रकारे निबंधही तयार करावयाचा असतो. जी विचारसुमने सुचतात, ती संकलित करून, त्यातून आवश्यक ती निवडून सुयोग्य, सुंदर शब्दांची बांधणी करून निबंध तयार करावा लागतो. संकलन, निवड व गुंफण अशी ती प्रक्रिया असते. एकंदरीत काय तर एखाद्या विषयावर सुयोग्य आणि निवडक अशा विचारांची आकर्षक व सुसंगत रीतीने बांधणी अथवा मांडणी म्हणजे निबंध होय.

## निबंधाची रूपरेखा :-

निबंध लिहिताना निश्चित अशी रूपरेखा असावी लागते. त्यात तीन प्रमुख भाग असतात.

१. प्रस्तावना (निबंधाची सुरुवात)
२. विषय-विवेचन (निबंधाचा गाभा अथवा स्पष्टीकरण)
३. समारोप (निबंधाचा सारांश अथवा निष्कर्ष)

निबंधाच्या प्रारंभी विषयाचा परिचय करून द्यावा लागतो. निबंधाची सुरुवात आकर्षक

प्रकारात अधिक आढळतात.

कल्पनाप्रधान निबंध लिहिताना विविधा कल्पना मनात साठवून असाव्यात. त्यांची योग्य जुळणी करावी. विसंगत वाटतील त्या टाळून कल्पनांचा क्रम ठरवावा. काही निबंधात मुख्य एकच कल्पना असते. तिचाच विस्तार केला जातो, तर काही निबंधात वैविध्यपूर्ण कल्पनांची साखळीच दिसून येते. निबंधलेखकाला कल्पनाविलासाच्या उत्तुंग भराऱ्या मारण्याची संधी या प्रकारात असते. या प्रकारात कल्पनेला स्वैर वाव दिला, तरी त्या कल्पना हास्यास्पद ठरू नयेत. त्या वास्तव भासाव्या, अशा पद्धतीने रंगवाव्या. 'मी पंतप्रधान झालो तर...', 'मी अभिनेता झालो तर...', 'मला लॉटरी लागली तर...', 'वृत्तपत्रे बंद झाली तर...', 'घड्याळे बंद पडली तर...', 'वीज गेली तर...', 'मंगळावर माणूस' असे अनेक विषय या निबंधप्रकारात समाविष्ट करता येतील.

## ४. चरित्रात्मक निबंध

चरित्रात्मक निबंध काल्पनिक नसतो, तर तो वास्तविक इतिहास असतो. चरित्रात्मक निबंधात एखाद्या व्यक्तीच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला जातो. व्यक्तीची गुणवैशिष्ट्ये, स्वभाव किंवा दोष-दुर्गुण यांवरही प्रकाश टाकला जातो. जन्म, बालपण, उमेदीचा कालखंड, शिक्षण, स्वभाववैशिष्ट्ये, कार्य,



व उपसंहार) हे निबंधाचे घटक होत. सुवाच्य अक्षर, शुद्धलेखन, टापटीप व योग्य परिच्छेदांचा अनुक्रम यांमुळे निबंधाचा दर्जा वाढतो. निबंधलेखन हे विद्यार्थ्यांमधील अनेक सुप्त गुणांचा विकास साधणारे माध्यम आहे. विद्याव्यासंग, भाषाप्रभुत्व, बहुश्रुतता व कलात्मक लेखन हे सगळेच गुण व्यक्त करण्याची संधी निबंधलेखनात मिळते. म्हणूनच वाङ्मयाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून निबंधाचा अभ्यास आवश्यक ठरतो.

## निबंधाचे प्रकार

स्थूलमानाने निबंधाचे महत्त्वाचे पाच प्रकार आहेत.

१. वर्णनात्मक निबंध
२. कथनात्मक निबंध
३. कल्पनाप्रधान निबंध
४. चिंतनात्मक निबंध
५. चरित्रात्मक निबंध

याव्यतिरिक्त आत्मवृत्तपर निबंध, व्यक्तिचित्रणात्मक निबंध, चर्चात्मक निबंध, समीक्षणात्मक निबंध, ललित निबंध असेही प्रकार चर्चिले जातात. निबंधाचे विषयानुरूप प्रकारही पाडता येतात. आर्थिक, सामाजिक, राजकीय, साहित्यपर, शैक्षणिक, समस्याप्रधान, वैज्ञानिक निबंध असे काही विषयपर निबंधप्रकारही

पाडता येतील; परंतु यांतील बहुतेक प्रकार चिंतनपर निबंधाशी संबंधित आहेत. याचा अर्थ एखादा विषय दुसऱ्या प्रकाराने लिहिता येणार नाही, असे नाही; परंतु चिंतनशीलतेला किंवा वैचारिकतेला चालना देऊनच त्यांची निर्मिती करता येते.

## १. वर्णनात्मक निबंध

एखाद्या प्रसंगाचे, अनुभवाचे वेधक वर्णन या प्रकारात केले जाते. निबंधात वर्णनाच्या तपशीलास महत्त्व असून त्याचा क्रम, मांडणी व वाङ्मयीन सौंदर्य यांवर त्या निबंधाचे यश अवलंबून असते. त्याकरिता निबंधलेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणाची, अवलोकनाची गरज असते. विषयाचा तपशील देत असताना किंवा वर्णन करीत असताना कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यायचे, कोणत्या गोष्टी टाळायच्या हे ठरवावे लागते. एखादी घटना किंवा प्रसंग जणू डोळ्यांपुढे घडतो आहे, असे समजून निबंध लिहायचा असतो. राष्ट्रीय सण, समारंभ, उत्सव, निसर्ग, स्थळ, प्रवासवर्णने, खेळ, घटना अशा अनेक विषयांवर वर्णनात्मक निबंध लिहिता येतो. कधी हे वर्णन व्यक्तीचेही असेल तर कधी वर्णन पशुपक्ष्यांचेही असू शकेल.

## २. कथनात्मक निबंध

ज्या निबंधात निवेदन किंवा कथनाला महत्त्व दिले जाते, तो कथनात्मक किंवा निवेदनात्मक



निबंध म्हणून ओळखला जातो. या प्रकारात वर्णनापेक्षा कथनाला प्राधान्य दिले जाते. कथन करताना ऐकणाऱ्याची उत्कंठा वाढीस लागायला हवी. त्याकरिता सुंदर रचना, चटकदार पण सोपी प्रवाही भाषाशैली आवश्यक ठरते. कथनपर निबंधात निबंधकाराचे अस्तित्व जाणवत राहते. एखादी घटना कशी घडली, ती प्रत्यक्ष कशी बघितली याचे उत्कंठावर्धक वर्णन किंवा चित्रण या प्रकारात निबंधलेखक करतो. या प्रकारात लेखकाच्या कल्पनाशक्तीलाही वाव असतो. एखादा बघितलेला अपघात, आपत्ती, निसर्ग, उत्सव किंवा अविस्मरणीय घटना असे विषय या निबंधप्रकारात समाविष्ट होतात.

## ३. कल्पनात्मक निबंध

या प्रकारात लेखकाच्या कल्पकतेला भरपूर वाव असतो. बघितलेली अथवा अनुभवलेली घटना किंवा पूर्वज्ञानावर आधारित विषयांना कल्पनाविलासाने रंगवून सांगण्याची किमया या निबंधप्रकारात लेखकाला करून दाखवावी लागते. पुष्कळदा या प्रकारातील निबंधाचे विषय काल्पनिक असतात; परंतु ते खरे वाटतील अशा सुसंगत रीतीने, प्रभावीपणे मांडण्याची, सजवण्याची हातोटी लेखकात असावी लागते. यामध्ये काल्पनिकतेलाच भरपूर वाव असल्याने पुष्कळसे अनपेक्षित आणि स्वप्नवत वाटणारे विषय या प्रकारात लिहिता येतात. 'जर...तर' पद्धतीचे निबंधही या

निबंध वाचताना वाचकांना त्या वस्तूबद्दल आत्मीयता वाटली पाहिजे. पोस्टाच्या पेटीचे आत्मवृत्त, मी टिळकांचा पुतळा बोलतोय, एका क्रांतिकारकाचे मनोगत, एका भूकंपग्रस्ताची मनोव्यथा असे अनेक विषय आत्मवृत्तपर निबंधात मांडता येतील.

## ७. व्यक्तिचित्रणात्मक निबंध

शब्दांनी एखाद्या व्यक्तीचे शब्दचित्र रंगवणे म्हणजे व्यक्तिचित्रण करणे होय; पण चरित्राप्रमाणे संपूर्ण जीवनगाथा येथे सांगितली जात नाही. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र रेखाटताना त्याचे रंगरूप, शरीरयष्टी, पोशाख, स्वभाव, विशिष्ट सवयी, लकबी यापैकी काहींचा किंवा सर्व मुद्यांचा समावेश केला जातो; पण क्रमाक्रमाने वर्णन केल्यास ते नीरस अथवा कंटाळवाणे होईल. म्हणून प्रभावी अशा पद्धतीने वर्णन करावे. ते हुबेहूब चित्तवेधक ठरावे. सहजसुंदर संवाद व निवडक महत्त्वाचे प्रसंग योग्य परिच्छेदांतून मांडले की सकस व्यक्तिचित्र साकार होते. व्यक्तिचित्र रेखाटन असे असावे की वाचणाऱ्यांना ती व्यक्ती निबंधलेखकाच्या जवळची आहे, असे भासावे. पोस्टमन, हमाल, पेपरविक्या, आजोबा, गुरुजी इत्यादींप्रमाणेच कोणत्याही एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे शब्दचित्रण या निबंधप्रकारात करता येते.



योग्यता, अंत किंवा सध्याची स्थिती अशा मुद्यांवर प्रकाश टाकण्याचे कार्य या प्रकारात केले जाते. ज्या व्यक्तीचे आपण चरित्र लिहितो, ती व्यक्ती असामान्य किंवा लोकोत्तर असते. त्या व्यक्तीचा संपूर्ण जीवनपट तारखेनुसार सांगितला पाहिजे, असे नाही. निवडक प्रसंगही पुरेसे होतात. थोरांची चरित्रे वाचून आपण त्यांच्याप्रमाणे व्हावे, ही विद्यार्थ्यांमध्ये इच्छा निर्माण व्हावी, हा अशा निबंधाचा हेतू असतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, संत गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी, सुनील गावस्कर, लता मंगेशकर अशा कितीतरी मानमान्यता पावलेल्या व्यक्तींचे जीवनकार्य चरित्रात्मक निबंधात समाविष्ट करता येईल.

## ५. चिंतनात्मक निबंध

या प्रकारात चिंतनशीलतेला प्राधान्य दिले जाते. निबंधलेखकाच्या वैचारिकतेला चालना दिली जाते. निबंधातून त्याच्या सामान्य ज्ञानाची, साधकबाधक चर्चेच्या कुवतीचीही जाणीव होते. अनुकूल-प्रतिकूल मतमांडणी करण्याची हातोटी अशा प्रकारच्या निबंधलेखकांत असावी लागते. येथे तात्त्विकतेला प्राधान्य असते. गंभीर अथवा हलकेफुलके विषयही चिंतनातून मांडता येतात. मात्र विचारांची पद्धतशीर मांडणी महत्त्वाची असते. मांडलेल्या विधानाचे स्पष्टीकरण

देण्याची अपेक्षाही चिंतनपर निबंधातून केली जाते.

या प्रकाराला विचारप्रधान निबंध किंवा विवेचनपर निबंध असेही म्हटले जाते. याच प्रकारात समस्याप्रधान निबंधांचा अधिकाधिक समावेश होतो. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा कुठल्याही समस्येची चर्चा समस्याप्रधान निबंधात करता येते. कुठलीही एक बाजू घेऊन किंवा दोन्ही बाजूंच्या गुणदोषांची चर्चा करून निष्कर्ष काढण्याची संधी अशा प्रकारच्या निबंधातून असते. चिंतनात्मक निबंधात निबंधलेखकाने मांडलेले निष्कर्ष शतप्रतिशत बरोबरच असतील असे नाही; परंतु लेखकाचा तो युक्तिवाद वाचकांना पटला पाहिजे, ते मत योग्य वाटले पाहिजे. अनेक दाखले, उदाहरणे देत असताना हे केवळ आपलेच म्हणणे नसून अनेक विचारवंतांचे विचारही अशाच प्रकारचे आहेत, हे पटवून देण्यासाठी संतांची, मान्यवरांची वचने, वाक्ये उद्धृत करावी. या निबंधाच्या मांडणीत सुरुवातीला प्रस्तावनेत विषयाची ओळख करून दिली जाते. नंतर विरुद्ध पक्षाचे म्हणणे किंवा समस्येची तीव्रता मांडली जाते. ह्या पूर्वपक्षानंतर विरुद्ध पक्षाचे म्हणणे खोडून काढले जाते किंवा समस्येवरील उपाय सांगावे लागतात. म्हणजेच प्रथम विरोधी मंडन, नंतर त्याचे खंडन करून आपली बाजू पटवून दिली जाते व शेवटी निष्कर्ष मांडला जातो. प्रदूषण, भ्रष्टाचार,



विज्ञानाचे चमत्कार, भारतीय संस्कृती, ग्रंथ हेच गुरू, जाहिरातीची कला, खेळांचे जीवनातील स्थान, राष्ट्रीय एकात्मता, संतांचे कार्य, भोंदूगिरी, कर्माची महती, मातृभाषेचे महत्त्व, धर्मनिरपेक्षता, शेतकऱ्यांची दैन्यावस्था, लोकसंख्येचा भस्मासुर असे अनेक महत्त्वपूर्ण विषय चिंतनपर निबंधात समाविष्ट करता येतील. त्यातील बरेचसे समस्याप्रधान निबंध आहेत. समस्याप्रधान निबंध लिहिताना चिंतनशीलतेला, वैचारिकतेला चालना द्यावी लागते. परीक्षेच्या दृष्टीनेही याच प्रकाराला अधिक महत्त्व दिले जाते.

## ६. आत्मवृत्तपर निबंध

आत्मवृत्तपर निबंधात एखादी सजीव किंवा निर्जीव गोष्ट आपली कथा सांगत आहे, अशी कल्पना केली जाते. ज्या वस्तूचे आत्मवृत्त लिहायचे, ती निर्जीव असली तरी ती सजीवाप्रमाणे बोलते आहे, माणसाप्रमाणे तिला रागलोभ, मानापमान, सुखदुःखे आहेत, असे गृहीत धरून लिहावे लागते. त्या वस्तूशी, तिच्या भावभावनांशी निबंधलेखकाने एकरूप व्हावयास हवे. ती वस्तू आपल्या भावना आठवणींतून, हकिकतीतून करू पाहते आहे, अशी कल्पना करावयास हवी.

आत्मवृत्तपर निबंधाची भाषा प्रथमपुरुषी असावी. मात्र ती एकसुरी नसावी. सतत तक्रारीचा सूर त्यात नसावा. अनुभवांना, भावनांना महत्त्व असावे. निवेदनात आत्मीयता असावी. एकंदरीत

चालणारा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

संतांनी समाजास नेभळट, निष्क्रिय केले असा आरोप करणाऱ्यांना तुकाराम महाराजांच्या अभंगातून उत्तर मिळते,

‘मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रास भेदू ऐसे ।।
भले तरी देऊ कासेची लंगोटी ।
नाठाळाचे माथा देऊ काठी ।।’

संत रामदासही परखडपणे सांगतात की,

‘ठकासी व्हावे ठक, उद्धटासी उद्धट
दुष्टांचे निर्दालन झालेची पाहिजे’

दुष्टांची तमा करणारे हे संत नाहीत. मग नेभळट समाज निर्माण होणे शक्य तरी आहे का? उलट जनसामान्यांना योग्य मार्गदर्शन त्यांनी केले आहे. पण ‘बुडता हे जन न देखवे डोळा । म्हणुनी कळवळा येतसे ।।’ असा समाजाच्या अधःपतनामुळे आलेला कळवळाही ते लपवू शकत नाहीत. संपूर्ण मानव जात सुखी व्हावी, म्हणून ज्ञानेश्वर माऊली परमेश्वराला पसायदान मागते -

‘जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती
वाढो ।। भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।।’

परमेश्वराविषयी विविध कल्पना



निबंधाचे प्रकार हे सोयीकरिता पाडले गेले आहेत. वास्तविक हे सर्व प्रकार एकमेकांमध्ये मिसळलेले आहेत. कल्पनात्मक निबंधात कथनाबरोबर वर्णनही येते, तर आत्मचरित्रात्मक निबंधात कथनाबरोबर कल्पनेलाही वाव असतो. म्हणजेच कुठल्याही एका निबंधप्रकाराला अन्य प्रकारांपासून वेगळे करता येत नाही.

# १. संतांचे समाजप्रबोधन संतांची सामाजिक कामगिरी

‘पवित्र तो देश । पावन तो देश ।
जेथे हरीचे दास । जन्मा येती ।।’

अशा शब्दांत तुकारामांनी संतांचे महत्त्व वर्णन केले आहे. समाजप्रबोधनाच्या दृष्टीने दीर्घ कालापर्यंत प्रभावी ठरलेली महाराष्ट्रातील संतपरंपरा ही अत्यंत भूषणावह आहे. येथे ज्ञानेश्वरांपासून तुकाराम, रामदासांपर्यंत अठरापगड जातीतील आणि समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधून येऊनही सर्वांना एकत्र आणणारी संतपरंपरा होऊन गेली. त्यापुढेही गेल्या शतकातील संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज यांच्यासारखे आधुनिक दृष्टिकोण

ठेवून समाजाला दिशा देणारे अनेक आगळेवेगळे संत होऊन गेले. तुकाराम महाराजांपर्यंतचे बरेचसे संत भागवत संप्रदायी होते, भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे होते. तो कालखंड भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या लोकोत्तर पुरुषांचा होता. त्यात विविध जातींचे संत तर होतेच; पण काही स्त्रियाही संतपदाला पोचलेल्या होत्या. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, बोधलेबुवा, भानुदास, नरसिंह मेहता, दामाजीपंत, गोराकुंभार, नृसिंह सरस्वती, मोरया गोसावी, आनंदमूर्ती, दासोपंत, जनार्दनस्वामी, उद्धव गोसावी, उद्धव चिद्घन, चोखामेळा, सेनान्हावी, सावतामाळी, सखूबाई, जनाबाई, बहिणाबाई, अक्काबाई, वेणाबाई, कान्होपात्रा अशी किती म्हणून नावे घ्यावीत? या सर्व संतांची कामगिरी बहुमोल अशीच आहे.

भारताचे सर्वाधिक नुकसान पूर्वापार चालत आलेल्या भेदभावांनी केले. संतांनी वर्णाश्रमाची मूळ खुळचट कल्पना बदलून तिला नवे स्वरूप दिले. जातिभेदाची बंधने ढिली केली. उच्चनीचता, श्रेष्ठकनिष्ठता ही जन्मावर अवलंबून नसून गुणकर्मावर किंवा आचरणावर अवलंबून असते, हे पटवून दिले. इतर धर्मांचा द्वेष न करता परधर्मसहिष्णुतेचा संदेश दिला. आश्रमकल्पनेचे अयोग्य स्वरूप दाखवून दिले. अनासक्त बुद्धीने कर्मे केल्यास गृहस्थाश्रमातच मोक्षप्राप्ती



होते, हे स्वतःच्या आचरणाने जनमनावर बिंबवले. स्त्रियांना धर्मकार्यात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. त्यांना वेदाधिकार प्राप्त करून दिला. अभंग, ओव्या, भारुडे अशा विविध रूपांतून त्यांची शिकवण अमर झाली आहे.

ह्या संत मंडळींनी प्राकृतात ग्रंथरचना करून महाराष्ट्र सारस्वतात भर घातली.

'माझा मऱ्हाठाचि बोलु कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंके ।।'

असा मराठीचा बाणा व्यक्त करणाऱ्या ज्ञानदेवांनी आणि महानुभाव पंथाच्या संतसज्जनांसह अन्य संतांनी जनसामान्यांना समजेल अशा मराठी भाषेत विविध रचना करून समाजाला नवी दिशा दिली, मार्ग दाखवला. समाजात ऐक्य प्रस्थापित करताना जातिभेद, पंथभेद, प्रांतभेद उद्ध्वस्त करण्याचा सतत प्रयत्न केला. देव एकच आहे. राम-रहिम अशी त्याची विविध नावे आहेत, हे लोकांना पटवून दिले.

आपल्या आचार-विचार-उच्चारांतून समाजाला हितोपदेश करणाऱ्या संतांनी संसार करतानाच परमार्थ साधण्याचा उपदेश केला.'प्रपंच सोडुनी परमार्थ कराल, तेणे तुम्ही दुःखीकष्टी व्हाल' असे सांगणाऱ्या या संतांनी भक्ती, ज्ञान, वैराग्य, दया, क्षमा, शांती, विवेक अशा अनेक गुणांचा पुरस्कार करून सन्मार्गावर

अल्प असे ज्ञान । अंगी ताठा अभिमान ।।
तुका म्हणे लंड । त्याचे हाणोनि फोडा तोंड ।।'

भोंदू साधूंचे तोंड फोडण्याची भाषा करणारे तुकोबा 'भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ।।' कुत्र्याचाही रंग भगवा असतो, पण त्याला अनुभवाचा मार्ग सापडला आहे का? असा प्रश्न करीत भगवे कपडे घालून लोकांना फसविणाऱ्या दांभिकांवर कडाडून हल्ला करतात.

काही ढोंगी व्यक्तींनी स्वतःला संत म्हणवून जे वाईट कार्य केले, त्यामुळे संतांविषयी जनमानसात काहीसा अविश्वासही निर्माण झाला; परंतु गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, बाबा आमटे, ताराबाई मोडक अशा आधुनिक काळातील संतसज्जनांनी संतांच्या कार्यावरील विश्वास पुन्हा निर्माण केला. वैयक्तिक स्वार्थाचा त्याग करून त्यांनी संपूर्ण आयुष्य मानवतेच्या कल्याणासाठी अर्पण केले. 'पापाची वासना नको दावू डोळा' असे म्हणणारे तुकाराम सर्वच जनसामान्यांना सदाचरणाची शिकवण देतात.

आजच्या भ्रष्टाचारी वातावरणात संतांची 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी' ही उक्ती आणि कृती किती आवश्यक आहे, हे सहज लक्षात येते. वाममार्गाने संपत्ती जमवणाऱ्यांनी आणि स्वतःच्या स्वार्थासाठी व कुटुंबासाठीच तिचा उपयोग करणाऱ्यांनी ही संतांची शिकवण मनन, चिंतन



आहेत; पण आधुनिक संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्या मते देव देवळात नसून मानवाच्या सेवेत आहे.

'मंदिर मंदिर क्या घुमना है ।
पहले सेवा कर गरिबोंकी ।।'

असे तुकडोजी महाराज म्हणतात. गरिबांची सेवा करा, अडल्यानडल्यांना मदत करा, तेच खरे पुण्याचे काम आहे असा उपदेश संतांनी केला आहे. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' असे सांगून कुठलाही भेद न मानता सर्व 'एकाच परमेश्वराची लेकरे' आहेत असा संदेश त्यांनी दिला.

'रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा ।
सांडी तूं अवगुणु रे भ्रमरा ।।'

अशा काव्यमय शैलीने मनुष्याला अवगुण सोडण्याचा प्रेमळ उपदेश ज्यांनी केला, त्या ज्ञानदेवांसारख्या अनेक संतांच्या कामगिरीने ही भूमी धन्य झाली आहे. माणुसकी हरवत चाललेल्या माणसाला तिने माणुसकीची नव्याने ओळख करून दिली. विश्वात्म्याजवळ पसायदान मागताना ज्ञानदेवांनी ज्ञानी-अज्ञानी, स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच, चांगले-वाईट यांत भेद दाखवला नाही, उलट -

'दुरितांचे तिमीर जावो। विश्व स्वधर्म सूर्य पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात।।'

अशाप्रकारे पापी (दुरित) लोकांच्या जीवनातला

अंधार (अज्ञान) नाहीसा होऊन त्यांना यश मिळण्यासाठी व त्यांचे जीवन प्रकाशमय होण्यासाठी प्रार्थना केली आहे. केवळ तत्त्वज्ञानाला दिलेले रूप म्हणजे ज्ञानेश्वरी नाही. मानवता ही या अनुभवामागची आत्यंतिक तळमळ आहे. ज्ञानेश्वरांचे हे मोलाचे कार्य समाजोद्धारासाठीच होते ना?

रामदासस्वामी, तुकाराम महाराजांप्रमाणेच नामदेव-एकनाथांनीदेखील प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय कसा साधावा, हे सांगून भोळ्याभाबड्या जनतेला दुष्प्रवृत्तींचा नाश करावा व परमार्थ साधावा, असे मार्गदर्शन केले. काम, क्रोध, अहंकार, मत्सर, मोह, लोभ यांसारखे शत्रू जीवाला त्रस्त करीत असतात. त्यांचा नायनाट करावा, हे रूपकाच्या माध्यमातून संत एकनाथ सांगतात -

‘सत्वर पावगे भवानी आई, रोडगा वाहीन तुला।
सासरा माझा गावी गेला, तिकडेच खपवी त्याला।।’

अशी कौटुंबिक नात्यावरील आध्यात्मिक भक्तीची वाट साध्या, सोप्या भाषेत ते सामान्यांना दाखवून देतात. संत एकनाथ संतपरंपरेतील एक श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व आहे. अस्पृश्यांच्या घरी भोजन घेऊन आपण सारे एकाच परमेश्वराची लेकरे आहोत, ही भावना त्यांनी जनमानसात रुजवली.

संतांचे संपूर्ण कार्य हे लोकोपयोगी,



समाजाभिमुख होते. देशाच्या प्रगतीसाठी, समाजाला सन्मार्गावर नेण्यासाठी संतांनी आपले सर्वस्व पणाला लावले. आजही असे संत आढळतात; पण अगदी मोजकेच, जे तळमळीने सत्य, अहिंसा, बंधुत्व या त्रिसूत्रीवर आधारित उपदेश करतात आणि ‘बोले तैसा चाले’ या न्यायाने आचरण करतात. खरोखरीच संतांचे कार्य बघितले म्हणजे तुकोबांच्या अभंगाच्या ह्या ओळी सार्थ वाटतात -

‘जगाच्या कल्याणा । संतांच्या विभुती ।
देह कष्टविती । उपकारे ।।’

संतांच्या समाजप्रबोधनाविषयी खोलात शिरल्यास लक्षात येते की संतांनी ‘जनसेवा हीच ईश्वरसेवा’ मानली होती. त्यातही तळागाळाच्या, हीनदीनांची सेवा करण्यातच परमेश्वरप्राप्ती आहे, असे त्यांचे मत होते.

‘जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।’

अशी तुकोबांची शिकवण होती. सेवेत खरं साधुत्व आहे. जनसेवा हीच साधना आहे, असे सांगणाऱ्या संतांनी भोंदूपणा, ढोंगीपणा यांवर मात्र कडाडून हल्ला केला.

‘गाजराची पुंगी । तैसे नवे झाले जोगी ।।
काय करोनि पठन । केली अहंता जतन ।।

बंधुभाव अशी संतांची अनेक तत्त्वे त्रिकालाबाधित व अविनाशी आहे. म्हणूनच संतांना द्रष्टे म्हटले गेले आहे. संत काळाच्याही पुढे पाहणारे आहेत; म्हणूनच त्यांनी सांगितलेली तत्त्वे अंगीकारणे ही आजच्या काळाची गरज आहे. त्यांनी आपल्या लेखणीने आणि वाणीने मराठी मनाची जी मशागत केली, त्यास तोड नाही.

⦸⦸⦸

# २. प्रदूषण : एक भीषण समस्या

भोपाळच्या 'युनियन कार्बाइड' कारखान्यातून विषारी वायुगळती झाली आणि हजारो लोक मृत्युमुखी पडले, कितीतरी अपंग झाले आणि प्रथमच भारतात प्रदूषणाच्या समस्येवर गांभीर्याने चर्चेला व उपाययोजनांना प्रारंभ झाला. रशियातून आयात केलेले लोणी अणुउत्सर्गदूषित असल्याचे आढळले आणि भारतीय अभ्यासकांबरोबरच सामान्य माणसांच्याही भुवया काळजीमिश्रित आश्चर्याने उंचावल्या. खोपोली रसायनी परिसरातील रासायनिक कारखान्यांतून निघालेले दूषित पाणी पाताळगंगेच्या पाण्यात सोडले जात होते; आणि ते पाणी रसायनी व पनवेलजवळील गावांना पिण्याचे पाणी म्हणून पुरविले जात होते. याच्या दुष्परिणामांची



करून आचरणात आणण्यासारखी नाही का?

आज वनीकरणाचा घोष केला जातो. पाण्याच्या टंचाईच्या समस्येसाठी जंगलतोड होऊ नये, म्हणून वृक्षारोपणाचा आग्रह संतांनी पूर्वीच धरला. तुकारामांनी तर सतराव्या शतकात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' असे म्हणून वृक्षांची महती पटवून दिली.

स्वास्थ्यरक्षणासाठी, बलोपासनेसाठी योगा, सूर्यनमस्कार, व्यायाम, प्राणायाम यांचे महत्त्व आज विशद केले जात आहे. संत रामदासांनी त्या काळात ठिकठिकाणी आखाडे उभे केले होते. व्यायामशाळा सुरू केल्या होत्या. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी बलदंड असणे कसे आवश्यक आहे, ते तरुणांना पटवून दिले होते. आज त्याचीच पुनरावृत्ती होताना दिसते.

रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या संतविद्वानांनीही सत्कार्याची, राष्ट्रप्रेमाची जागृती जनतेत केली. स्वतःच्या आचारातून, विचारातून आणि उच्चारातून प्रखर राष्ट्रीयतेचे धडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज यांनी वेळोवेळी दिले. गाडगे महाराजांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे, समाजजागृतीचे महान कार्य केले. 'देव' ह्या कल्पनेवर त्यांनी प्रहार केला. मंदिरातील दगडाचे देव त्यांनी मानले नाहीत. भारताच्या

स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले जीवन समर्पित केले, ज्यांच्या अविश्रांत परिश्रमांमुळे आणि निर्भय आत्मबलिदानामुळे भारताच्या गौरवशाली युगाचा अरुणोदय झाला, अशा गांधीजींसारख्या महामानवांना देव माना, त्यांची पूजा करा. ज्यांनी समाजाला सेवा दिली, समाजजागृती केली, असे साधू, संत खरे परमेश्वर आहेत, असे गाडगेबाबा सांगत.

'आधी केले, मग सांगितले' ह्या उक्तीप्रमाणे त्यांचे विचार आणि आचार एक होते. अस्वच्छता हे अनारोग्याचे पहिले कारण असते. स्वतःच्या हाती झाडू घेऊन जिथे जातील तिथला परिसर स्वच्छ करण्याचे काम शालेय शिक्षणाची गंधवार्ता नसलेल्या गाडगे महाराजांनी केले आणि समाजाला आदर्श घालून दिला. परिसर स्वच्छ करावा, कष्ट करावे, मिळेल त्या भाकरी तुकड्याने पोट भरावे, रात्रीला भजन-कीर्तन करून समाजाला दिशा दाखवावी, ही त्यांची दिनचर्या होती. समाजात जातिभेद, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती, रूढी-परंपरा, दारूसारखी दुर्व्यसने, निरक्षरता इत्यादींचे प्रस्थ फार बोकाळले होते. त्यावर आपल्या औपरोधिक वाणीने कडक प्रहार गाडगेबाबांनी केला. महात्मा गांधी, विनोबा भावे अशा काही विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील संतांनी अस्पृष्यता निर्मूलन, कुष्ठरोग्यांची सेवा, स्वदेशीचा प्रसार, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धा



निर्मूलन, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमानता असे अनेक विषय हाताळून स्वतः कार्य करून सामान्य जनतेसमोर आणि राज्यकर्त्यांसमोर आदर्श उभे केले.

ब्राम्हण, शिंपी, सोनार, कुणबी, माळी, कुंभार, महार इत्यादी जातीकुळांचा भेद विसरून भक्तीच्या ध्वजाखाली सर्वांना एकत्र सामावून घेणारा हा संतमेळा होता. आध्यात्मिकता, दैववाद, देवाची भक्ती ह्यांसारखे भक्तिमार्गच संतांनी सांगितले नाहीत, तर सामान्यांना प्रपंचाचा मार्गही मोकळा करून दिला. खरोखर संत हे समाजशिक्षक होते. केवळ महाराष्ट्रापुरता त्यांचा संदेश नसून समग्र संसारातील अखिल मानव जातीच्या हिताकरिता अंतिम मूल्याचा शोध आहे. सामान्य जनतेच्या उत्थानासाठी, जागरणासाठी, ज्ञानसंवर्धनासाठी संतांनी आपली वाणी झिजवली. भजन, कीर्तन, व्याख्याने, लेखन अशा विविध मार्गाने सत्संगाचा, सद्भावाचा प्रसार केला. यापुढच्या पिढ्यांनाही तो मार्गदर्शक ठरू शकतो. संतांचे एकूणच कार्य लोकोपयोगी, समाजाभिमुख आहे. त्यांची शिकवण ही बहुजनहिताय, बहुजनसुखाय अशीच आहे. ती सार्वकालिक व सार्वजनिक आहे. त्यातील तत्त्वे अनादी-अनंत आहेत, चिरकाल टिकणारी आहेत. कालप्रवाहात समाज बदलतो, माणसे बदलतात; पण सत्य, सदाचार, सेवा, नीती, चारित्र्य, मानवता, कर्म,

आहे. पाण्याच्या सहाय्याने मानवी संस्कृती वसल्या. वाहत्या पाण्यात घाण सोडली जाऊ लागली. ह्या घाणीपासून अपाय होतो, असे जाणवल्यावर त्या जागेपासून दूर जाऊन वस्ती केली जाऊ लागली. पुढे नदीच्या काठावर अनेक शहरे वसल्यावर दूषित पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. औद्योगिकीकरणामुळे कारखान्यांची संख्या वाढली. पूर्ण विचाराअभावी किंवा नियोजनाअभावी सुरू केलेली कारखानदारी प्रदूषण निर्माण करते. प्रत्येक कारखान्याने आपले घाण पाणी नदीत सोडले. काहींनी पारायुक्त पाणी सोडले. नदीची आत्मशुद्धी करण्याची शक्ती हे दूषित पाणी शुद्ध करण्यास अपुरी पडली. याचा परिणाम पाण्यातील वनस्पती व मासे यांच्यावर झाला. माशांची संख्या कमी होत गेली. मासे मरू लागले. जपानमध्ये मेलेले मासे खाल्याने त्यांच्या पोटात असलेले प्रदूषणयुक्त खाद्य माणसांच्या पोटात गेले. त्यामुळे माणसाच्या मेंदूवर परिणाम होऊ झाला, मेंदूचे आजार झाले. भारतातील नद्याही अशा कारणांनी दूषित झाल्या आहेत. नद्यांच्या पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळून काविळीसारख्या रोगांची साथ पसरते. तेल कारखान्यांतून नद्यांमध्ये वाहत गेलेले तेलयुक्त पाणी पेटून आग लागल्याच्याही घटना घडतात. शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते खाद्यान्नामार्फत माणसांच्या पोटात जातात. पावसाच्या पाण्याबरोबर



जाणीव जागृत नागरिकांना, पत्रकारांना, विचारवंतांना झाली आणि या देशात खऱ्या अर्थाने प्रदूषणाचे विविध प्रकार जनतेच्या ध्यानात येऊ लागले, चर्चिले जाऊ लागले.

सर्व प्राणिमात्रांत मानव हा सर्वाधिक बुद्धिमान प्राणी आहे. या बुद्धिमत्तेचा उपयोग मानवाने स्वतःच्या आणि सजीव सृष्टीच्या उद्धारासाठी केला. नवीन शोध लावले. सृष्टीतील रहस्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आपले राहणीमान अधिक सुखवस्तू कसे होईल याकडे लक्ष दिले. पण मानवाच्या प्रगतीच्या या चढत्या आलेखाबरोबरच त्याच्या नकळत एका अनिष्ट गोष्टीचाही आलेख उंचावू लागला. ती अनिष्ट गोष्ट म्हणजे प्रदूषण होय. प्रदूषण ही एक जागतिक समस्या आहे; पण अजूनही त्याची भयानकता मनुष्याला स्पर्शू शकली नाही. कर्करोग, दमा, क्षय असे रोग ऐकूनही आपल्याला भयानक वाटतात; पण या रोगाचे कारण असलेले प्रदूषण आपल्याला भयभीत करीत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे प्रदूषणाने मनुष्याला प्रत्यक्ष ग्रासलेले नाही, तर त्याचे अप्रत्यक्ष परिणाम मनुष्याला घातक ठरताहेत. म्हणूनच प्रदूषण ही महत्त्वाची समस्या मानून त्याबद्दल जनजागृती होणे गरजेचे आहे.

भारतीय माणूस वैयक्तिक स्वच्छतेकडे फार लक्ष देतो; परंतु त्या तुलनेत तो सार्वजनिक

स्वच्छतेकडे जरासेही लक्ष देत नाही. स्वतःच्या घरातला कचरा तो सार्वजनिक रस्त्यांवर फेकतो. स्वतः पान खातो आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकतो. भाजीबाजारात खरेदी-विक्री करतो आणि सडलेली, खराब, अनावश्यक भाजी तेथेच कचऱ्याच्या रूपाने टाकून देतो. अशाप्रकारे आपण निसर्गाचा समतोल बिघडवीत आहोत, याची त्याला जाणीव नसते. कचऱ्याच्या प्रदूषणाची समस्या एक आव्हानात्मक ठरली आहे. कोट्यावधी टन कचरा रोज या देशात निर्माण होतो आहे आणि तो नष्ट कसा करायचा, यावरील संशोधन तोकडे ठरते आहे. कचऱ्यापासून वीजनिर्मिती, खतनिर्मिती यांचे प्रकल्प निर्माण होत असले, तरी ते मोजकेच आहेत. त्यातच प्लास्टीक संस्कृतीमुळे तर मानवाला फार मोठ्या संकटात टाकले आहे. प्लास्टीकचा न थांबवता येणारा वापर, त्याचे कचऱ्यातील वाढते प्रमाण या गोष्टींमुळे हे संकट उभे राहिले आहे. प्लास्टीक हे नॉनबायोडिग्रेबल म्हणजेच जमिनीतील जंतूंच्या योगे नष्ट न पावणारे असल्याने त्याचा नाश कसा करायचा, हीच मोठी समस्या आहे.

प्रदूषण हे स्लो पॉयझनसारखे आहे. त्याचा परिणाम अचानक आपल्यासमोर येत नाही. काही वेळा समुद्रात मोठ्या प्रमाणावर मासे मेलेले आढळतात. वनस्पतींच्या वाढीमुळे सरोवरे नष्ट होतात. धुरक्याने अनेकांचे मृत्यू होतात. शेतातील अथवा



शहरांतील जंतुनाशके पाण्याच्या प्रवाहाबरोबर अनेक मैल वाहत जाऊन तेथील पक्षांच्या वाढीवर परिणाम होतो, अणुत्सर्गी रसायनाने तर पिढ्यानूपिढ्या विकृतावस्थेत निर्माण होतात. हवा, पाणी, अन्न या विविध माध्यमांतून प्रदूषण सर्वत्र आपले हातपाय पसरवीत आहे.

पुढारलेल्या देशांमध्येच प्रदूषणाचे हे भेसूर दर्शन घडते असे नाही, तर मागासलेल्या आणि विकसनशील राष्ट्रांमध्येही वेगळ्या पद्धतीने प्रदूषणाच्या समस्येने उग्र रूप धारण केलेले दिसते. औद्योगिकीकरणाचा वाढता वेग आणि त्यानुसार झालेले हवेचे व पाण्याचे दूषितीकरण, खनिजांचा संपुष्टात आलेला साठा, कचऱ्याचे प्रचंड डोंगर, वाढते शहरीकरण, त्यामुळे होणारी गलिच्छ वस्त्यांची अनिर्बंध वाढ, वाहनांची वाढती संख्या व त्यामुळे होणारे वायूप्रदूषण आणि या सर्वांस कारणीभूत असलेली वाढती लोकसंख्या हे सारे प्रश्न मागासलेल्या देशांना भेडसावत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाला जागेची कमतरता भासते आहे. त्यामुळे जास्तीत जास्त जंगलतोड, वृक्षतोड हीदेखील प्रदूषणनिर्मितीस, पर्यावरण असंतुलनास कारणीभूत ठरत आहेत.

प्रदूषणाचे स्रोत लक्षात घेतले तर त्यात प्रामुख्याने पाण्यामुळे होणारे प्रदूषण जास्त अपायकारक

तोच अज्ञानाने मानवाला अहितकारक ठरला.

ज्ञान-विज्ञानाच्या कक्षा विस्तारत असताना प्रदूषणाच्या परिणामांना गांभीर्याने घेण्याचा काळ आता आला आहे. जागतिक समस्येचे रूप प्रदूषणाने घेतले असल्याने त्यावर सर्वत्र उपाययोजना होणे अत्यावश्यक आहे. ज्या तंत्रज्ञानामुळे उद्योगधंदे भरभराटीस आले, सोबतच प्रदूषणाचाही प्रश्न निर्माण झाला, त्याच तंत्राच्या मदतीने प्रदूषणावर मात करणारी यंत्रे निर्माण करावी. वातावरण, पाणी, ध्वनी यांचा शास्त्रीय अभ्यास करून कारखान्यांच्या जागेचे नियोजन करावयास हवे. त्यासंबंधी कडक कायदेही व्हायला हवेत. मनुष्यवस्तीजवळ नव्या कारखान्यांना परवानगी देऊ नये. कारखान्याचे पाणी नदीत किंवा समुद्रात सोडण्याआधी त्याच्या गुणधर्माची मानके जाहीर केली पाहिजेत. प्लास्टीकसारख्या प्रदूषणाला सहायक गोष्टींचा वापर सर्व थरांत थांबवला गेला पाहिजे. वृक्षलागवडीचे प्रमाण वाढवावयास पाहिजे. मुख्य म्हणजे सर्व बाबतीत जनतेने जागरूक असले पाहिजे. स्वतः प्रदूषण न करता इतरांनाही प्रदूषणमुक्तीचा संदेश दिला पाहिजे.

⦸⦸⦸

# ३. भोंदुगिरी : एक वाढती चिंता



वाहून जलस्रोतांत मिसळतात आणि वनस्पती, पशुपक्षी यांच्यावरही दुष्परिणाम करतात.

हवेतून प्रदूषण होऊन माणसांवर, अन्य प्राण्यांवर अत्यंत घातक परिणाम होत आहेत. इंधनाच्या ज्वलनाने निर्माण होणारे कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड हे वायूरूप पदार्थ व अर्धवट जळालेले कोळशाचे कण हे प्रामुख्याने कारखान्याच्या धुराड्यातून हवेत सोडले जातात. वाहनांतूनही प्रदूषित धूर सोडला जातो. माणसांना खोकला, ब्रॉन्कायटीस, कॅन्सरसह फुफ्फुसाचे इतर रोग दूषित हवेमुळे होतात. हवेत सोडल्या जाणाऱ्या कणांमुळे सृष्टीचक्रावर परिणाम होतो. पावसाचे प्रमाण कमीजास्त होणे, अवर्षण, कुठल्याही ऋतूत पाऊस पडणे असे बदल घडून येतात. हवेतील दूषितके माणसालाच नाही तर प्राणिपक्षांनाही घातक ठरतात. फ्लुओरिनसारखी द्रव्ये हवेत सोडल्याने गुरांचे पाय जायबंदी होतात. ॲसिडयुक्त धुरामुळे वनस्पती जळून जातात. फळे, फुले व झाडांची वाढ खुंटते.

पृथ्वीच्या पर्यावरणाबाहेर ओझोन वायू आहे. जीवसृष्टीच्या संरक्षणासाठी त्याची नितांत आवश्यकता आहे. पृथ्वीवरील वाढता कार्बन डायऑक्साईड या ओझोनवायूवर आक्रमण करीत असून हा वायू कमी झाला तर सूर्यापासून येणारे अल्ट्राव्हायोलेट

किरण सरळ पृथ्वीवर येतील आणि येथील जीवसृष्टी नाहीशी करून टाकतील.

सर्व प्रकारच्या प्रदूषणात सर्वात भयंकर व दूरगामी परिणाम अणुत्सर्गी पदार्थांच्या प्रदूषणाने होतात. त्याची भयानकता नागासाकी व हिरोशिमाच्या रूपात जगाने अनुभवलेलीच आहे. किरणोत्सर्गी पदार्थांचा नाश कुठल्याही ज्ञात पद्धतीने करता येत नाही. पाण्यात वा हवेत किरणोत्सर्गी पदार्थ असले व ते विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात माणसाच्या शरीरात आढळले, तर त्याच्या पुढच्या अनेक पिढ्यांमध्ये विकृती येऊ शकते.

ध्वनीप्रदूषणामुळे मानवी जीवन उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. साधारणतः ८० डेसिबल्स इतका आवाज माणूस बराच काळ सहन करू शकतो. त्यापेक्षा अधिक आवाज माणसाच्या कानावर पडला तर कालांतराने त्याला बहिरेपणा येऊ शकतो. आसमंतात आवाज, गोंगाट चालू असेल, तर एकमेकांशी बोलताना आवाज चढवून बोलावे लागते. गिरण्यांच्या व आगगाडीच्या शिट्या, वाहनांचे अफाट आवाज, त्यांचे हॉर्न त्यामुळे डोक्याला त्रास होतो. तसेच रक्तदाब वाढणे, डोके गरगरणे, हृदयाच्या स्नायूवर ताण पडणे या तक्रारी उद्‌भवू शकतात. सुपरसोनिक विमानाच्या आवाजाच्या लहरींमुळे लहान पक्षांचे व



प्राण्यांचे मृत्यू होऊ शकतात. भारत हा उत्सवप्रिय देश आहे. घरात टेप, टीव्ही यांचे मोठे आवाज ठेवणे, ही फॅशन झाली आहे. शासकीय अथवा खाजगी कार्यक्रम तर दररोजचेच आहेत. त्याकरिता लाऊडस्पीकर, मोठमोठाले डी.जे., मोठ्या आवाजाचे फटाके यांचा वापर फार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. रात्री दहानंतर ह्या सर्वांवर सुप्रीम कोर्टाने बंदी आणली आहे. पाश्चिमात्य देशात ध्वनीप्रदूषणाने होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव झाल्याने तेथे ही समस्या तितकी राहिलेली नाही. भारतात चोवीसही तास ठरावीक मर्यादेपेक्षा अधिक आवाजावर कायमची बंदी यावयास हवी.

आज वैचारिक प्रदूषणाची भीतीही वाढत आहे. बुद्धिमान माणसे उच्च शिक्षणासाठी, नोकऱ्यांसाठी परदेशात जातात आणि तेथेच स्थायिक होतात. या मायभूमीला परतू इच्छित नाहीत. या वैचारिक प्रदूषणाचाही विचार केला जावा.

विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच विज्ञानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे झाले आहे. विज्ञानाच्या माध्यमातून येणारी प्रगती स्वीकारताना होणाऱ्या अनिष्ट परिणामांवर संशोधन न झाल्याने अनेक वाईट घटना घडल्या. पेनिसिलीनचे इंजेक्शन अशाच प्रकारे वापरण्यात आल्याने अनेक लोक मृत्युमुखी पडले होते. जो शोध पोषक म्हणून प्रचलित केला,

संतांनी या भोंदूंचा आपल्या चिंतनातून, प्रवचनातून समाचार घेतला. तरी त्यांच्या या भयानक प्रस्थाला खरे हादरे बसले, ते स्वातंत्र्योत्तर काळात. इंग्रजांच्या आगमनानंतर वैज्ञानिक युगाला भारतात खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. तेव्हाही या भोंदुगिरीला काही प्रमाणात आळा बसला होता. त्यानंतर ग्रामीण भागातील माणसेही या संदर्भात जागृत झालेली दिसतात. सुशिक्षित माणसे या भोंदुगिरीपासून, बुवाबाजीपासून दूर राहू शकली; पण अडाण्यांना मात्र आपली शिकार बनविण्यात भोंदूंनी कुठलीही कसर बाकी ठेवली नाही.

स्वदेहाची पूजा करणारे, बाह्य वेश परिधान करून साधुत्वाचा आव आणणारे, अल्पज्ञानानेही ताठा अंगी बाळगणारे, धर्माचा चुकीचा अर्थ प्रसृत करणारे ढोंगी समाजकंटकांपेक्षा कमी नव्हते. वैराग्याचे प्रदर्शन मांडीत विषयवासनेत बुडालेले, मूर्ख पुरुष आणि स्त्रिया जमवून नाना प्रकारचे अर्थहीन सल्ले देणारे लबाड साधू 'परद्रव्य परनारी । अभिलाषुनी नाक धरी ।।' या प्रवृत्तीचे होते. परंतु ते कावळे होते. कावळ्याने हंसाप्रमाणे चालण्याचा कितीही आव आणला तरी त्याला हंसाची योग्यता प्राप्त होत नाही. 'आणिता त्या गती । हंस काऊले न होती ।।' तद्वतच निव्वळ साधुपणाच्या सोंगाने खरा साधू होता येत नाही, हेच खरे. पण अशा काकवृत्तीच्या लबाडांशी लढा देताना



# बुवाबाजी : एक समस्या

भोंदुगिरीची समस्या नवी नाही. मध्ययुगीन संतमहंतांच्या कालखंडातही भोंदू साधूंचा सुळसुळाट झाला होता. संतांप्रमाणे पेहराव अथवा वेशभूषा करून भोळ्याभाबड्या माणसांना लुटणारे, त्यांचे शोषण करणारे खोटे साधू जी कृत्ये करायचे, त्यांना भोंदुगिरी किंवा बुवाबाजी म्हटले गेले. वरवर साधुत्वाचा आव आणून सामान्य जनतेला लुबाडणारे हे पाखंडी खऱ्या संतांनाही त्रास द्यायचे. अनेक संतांनी अशा दांभिकांचा आपल्या लेखणी आणि वाणीतून परखड समाचार घेतला आहे.

ढोंगी साधूंमुळे समाजाचा खऱ्या साधू-संतांवरील विश्वास उडून जातो.

'भगवे तरी श्वान, सहज वेश त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ।।
वाढवुनि जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेशा सहजस्थिती ।।
कोरोनिया भूमि करी मध्ये वास । तरी उंदरास काय वाणी ।।
तुका म्हणे ऐसे कासया करावे । देहासी दंडावे वाउगेचि ।।'

भगवी वस्त्रे धारण केली म्हणजे हरीचा अनुभव येतो. असे असेल तर एखाद्या कुत्र्याचा रंग भगवा आहे, म्हणून त्याला अनुभवाचा मार्ग सापडला

आहे का? एखादा माणूस जटा लावून दाही दिशा फिरतो, कोल्ह्याचा वेशही तसाच असतो. तोही दाही दिशा फिरतो, म्हणून त्याला तपस्वी म्हणावे काय? काही लोक जमिनीत कोरून राहतात. उंदीरदेखील जमिनीत बिळे करून राहतात. म्हणून उंदीर साधू म्हणविले जातात का? अंतःकरणात भक्ती नसून तिची सोंगे करणे व शरीराला व्यर्थ दंड देणे असले चाळे निरर्थक आहेत. अशा नाटकी भोंदूंना उद्देशून संत तुकाराम म्हणतात,

'जगी कीर्ति व्हावी । म्हणोनि झालासी गोसावी ।।
बहुत केले पाठांतर । वर्म राहिले ते दूर ।।
चित्ती नाही अनुताप । लटिके भगवे स्वरूप ।।
तुका म्हणे शिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ।।'

लोकांत कीर्ती व्हावी म्हणून तू गोसावी झालास. पुष्कळ पाठांतर केले; परंतु श्रीहरीच्या प्राप्तीचे साधन दूरच राहिले. चित्तामध्ये विषयासंबंधाचा अनुताप नाही व खोटीच भगवे वस्त्रे धारण केली आहेस. हे शिंदळीच्या, तू आपल्या वाणीस व्यर्थ श्रम दिलेस. अशा प्रकारे तुकोबांनी पाखंडखंडनपर अभंगांचा वेगळा अध्यायच समाजापुढे त्या काळात मांडला होता. त्यांच्या शिष्या संत बहिणाबाई यांनीही खोट्या, दांभिक साधूंवर टीकात्मक रचना केल्या होत्या.

महाराष्ट्राचा विचार करताना येथील



भक्तिमय वातावरणामुळे जनमानसाचे मन श्रद्धाशील बनले आहे; पण पुष्कळदा श्रद्धेचा अतिरेक होतो आणि अंधश्रद्धा निर्माण होते. माणसाची परमेश्वरावर श्रद्धा असते, विश्वास असतो. येथे मूर्तीपूजा हे परमेश्वराच्या भक्तीचे माध्यम मानले गेले. कालांतराने देवांची संख्या वाढत गेली. दगडाला शेंदूर फासला की त्याचा देव होऊ लागला. देवळांचीही संख्या वाढली. असंख्य भक्तांच्या रांगा देवळापुढे लागू लागल्या. प्रत्यक्ष मूर्तीलाच देव समजले जाऊ लागले. भक्तीला श्रद्धेचे रूप आले तर श्रद्धेच्या अतिरेकाने तिला अंधश्रद्धेचे रूप आले. समाजाला दिशा देणाऱ्या साधू-संतांनाही श्रद्धास्थानी ठेवण्यात येऊ लागले. साधू-संतांनाही देवाचा अवतार मानले जाऊ लागले. अशाच परिस्थितीचा काही संधीसाधूंनी फायदा उचलला. माणसांच्या श्रद्धेचा स्वार्थासाठी उपयोग करून घेतला. पैसा, मान आणि सत्ता या मोहापायी तोकड्या ज्ञानासह साधूचा पेहराव करून धंदा सुरू केला. श्रद्धा आणि भक्तीच्या वातावरणात या धंद्याला तेजी आली आणि भोंदुगिरी करणारे बुवा जागोजागी दिसू लागले.

महाराष्ट्राच्या समाजजीवनात असंख्य घडामोडी झाल्या. कितीतरी वेळा इथला समाज पूर्णपणे अंधश्रद्धेच्या आहारी गेला. त्या त्या कालखंडात या बुवांचे व्यवसाय व्यापक प्रमाणात सुरू होते. खऱ्या

ान उकळण्याचे ते केंद्र होत चालले आहे. भोंदू साधूंची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. त्याचबरोबर त्यांच्या आश्रमांची, त्यांच्या संस्थांचीही संख्या वाढते आहे. मूल होत नाही म्हणून किंवा कौटुंबिक कारणाने विमनस्क अवस्थेतील स्त्रिया या भोंदू बाबांकडे येतात. त्यापैकी अनेक स्त्रियांचे शारीरिक शोषण करणारे अनेक बुवा आज अस्तित्वात आहेत. खरेतर अशा भोंदूंचा आपल्या देशाला कुठलाही उपयोग नाही. स्वकर्तृत्वावरील विश्वास गमावून माणसे या भोंदूंच्या नादी लागतात आणि निष्क्रिय होतात. माणसाला हीनतेकडे नेणारी, समाजजीवन पोखरणारी, त्याच्या कर्तृत्वाला संपवून टाकणारी, देशाची लुबाडणूक करणारी आणि देशाला कलंक ठरणारी ही भोंदुगिरी समूळ उखडून फेकली पाहिजे. त्याकरिता सर्व वैचारिक पातळीवर उभ्या असलेल्या विविध संघटनांनी आणि माणसांनी एकत्र आले पाहिजे. शासन, पोलीस आणि समाजसेवा करणाऱ्या प्रत्येक घटकाने एकत्र येऊन सर्व समाजात जनजागृती करून भोंदुगिरीच्या या समस्येला चिरडून टाकणे गरजेचे आहे.

⃠⃠⃠

# ४. शिक्षणाची दशा आणि दिशा



खऱ्या संतांनाही फार मनस्ताप सहन करावा लागला.

आजची स्थिती फारच विचित्र झालेली आहे. खेड्यापाड्यातही शिक्षण पोचले आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. जगाचे ज्ञान ग्रामीण भागातील शेवटच्या स्तरापर्यंत पोचू लागले आहे आणि तरीही पुन्हा आपला देश बुवांच्या नादी लागला आहे. दूरचित्रवाणीवरील कुठलीही वाहिनी सुरू केल्यास सकाळपासून सायंकाळपर्यंत कितीतरी वेळा कोणते ना कोणते बुवा दर्शन देत असतात. हे साधू खरे आहेत की भोंदू हे ओळखणे मात्र अत्यंत कठीण आहे. व्यवहार करताना दहा व्यक्तींशी चर्चा करणारा सामान्य माणूस, घरच्या समस्यांपासून देशाच्या समस्यांपर्यंत सर्वांमध्ये सहभागी होणारा हा माणूस, जीवनातल्या असंख्य जटिल प्रश्नांमध्ये बौद्धिक वाद घालणारा हा माणूस या बुवांच्या बाबतीत मात्र कुठलीही चिकित्सा करताना दिसत नाही.

हे भोंदू साधू समाजावर आपला प्रभाव टाकण्यासाठी कुठले ना कुठले चमत्कार करून दाखवतात. हे चमत्कार म्हणजे हातचलाखी असते. हे तथाकथित चमत्कारी बुवा जटा वाढवतात. अंगात भगवी कफनी घालतात. गळ्यात रूद्राक्षाच्या माळा चढवतात. अंगावर, कपाळावर भस्माचे पट्टे ओढतात. हाती कुबडी नाहीतर चिमटा घेतात. पायात खडावा

घालून ते लोकांपुढे येतात. त्यांच्यासोबत त्यांच्या कर्तृत्वाचा प्रचार करणारे सेवक असतात. त्यांच्या कृपेने कोणी रोगमुक्त झाल्याचे, कुणाला नोकरी मिळाल्याचे, कुणाला अपत्यप्राप्ती झाल्याचे, कुणी संकटमुक्त झाल्याचे तर कुणाला आकडा लागल्याचे कितीतरी किस्से हे सेवक जनतेला सांगत असतात. या साधूंची जे कुचेष्टा करतात, त्यांना नावे ठेवतात, त्यांच्यावर विश्वास ठेवत नाहीत, त्यांना प्रचंड हालअपेष्टा भोगाव्या लागतात, हे पटवून देताना काही बनावट आख्यायिकाही हे सेवक सांगतात. परिणामी अंधश्रद्धेला खतपाणी मिळते. बुवांना चांगला धंदा मिळतो. मग हे बुवा एखादा आश्रम थाटतात आणि जनसामान्यांना आकर्षित करून संपत्ती गोळा करण्याचा यज्ञ सुरू करतात.

बुवांच्या भक्तांमध्ये सामान्य माणसेच येतात, असे नाही. उलट गरिबांना तर तेथे फारशी संधीही नसते; पण श्रीमंतांना मात्र या भोंदू साधूंचे दरवाजे मात्र चोवीसही तास उघडे असतात. राजकारणातील बड्या हस्ती निवडणुकांपूर्वी त्यांचे आशीर्वाद घेताना दिसतात. निवडून आल्यावर या भोंदूंचे सत्कार केले जातात. कधी या बुवांच्या आश्रमात तर कधी राजकारणाच्या प्रांगणात एकमेकांचे सत्कार करण्याची परंपरा सुरू होते. बुवांच्या नादी लागलेला जनसमूदाय पाहून सत्ताधाऱ्यांना बुवांच्या नावाचा फायदा



होतो, तर मोठमोठे सत्ताधीश बुवांच्या चरणी लोटांगण घालतात, म्हणून बुवांचेही नाव होते आणि आश्रमाला, बुवांच्या कार्याला मोठमोठ्या देणग्या मिळू लागतात. एकंदरीत लोकमान्यता मिळालेले हे बुवा राजमान्यही होतात आणि ऐश्वर्यशालीही होतात.

'आंधळी गौळण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत गुलाबराव महाराजांनी भोंदुगिरी करणाऱ्यांचे तेवीस प्रकार सांगितले आहे. प्रज्ञाचक्षूंपूर्वी अशा प्रकारचे वर्गीकरण कोण्याही संताने केले नाही. मानवतावादी मार्गाने, सन्मार्गाने अखिल मानवजातीला पुढे घेऊन जाणारे खरे साधू ते गुरुस्थानी असतात; पण शिष्याचा उचित सन्मान ज्याला करता येत नाही, तो गुरू नाही, भोंदू होय. धुमारे घालणे, अंगारा देणे आणि आसुरी प्रयोग करून जनतेला भयभित करणारे साधू भोंदू होत. अशा भोंदूंपासून दूर राहिले पाहिजे, असे संत गुलाबराव महाराजांनी सांगितले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात, 'साधू तोची खरा जाणा, ज्याचे विषय हरी झाले ।'

आजच्या घडीला भोंदुगिरी हा एक भयंकर मोठा रोग समाजाला जडला आहे. जनतेचे ६

कमिशनने ग्रामीण विद्यालयांमध्ये कृषीशिक्षणाची विशेष सोय केली जाईल, त्यात शेती, पशुपालन, कुटीरउद्योग, औद्योगिक तसेच कृषीरसायन व वनस्पती विज्ञान हे विषय वैकल्पिक ठेवण्यात येतील, असे जाहीर केले होते; परंतु पुढे कोठारी आयोगाने त्याची उपेक्षाच केली, असे लक्षात येते.

आज शाळांमधून मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, गणित, शास्त्रे, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल इत्यादी विषय शिकविले जातात. या विषयांकडे लक्ष देणारे शिक्षकही असतात; परंतु कार्यानुभव, हस्तव्यवसाय, समाज सेवा या विषयांचे नियोजन व उपयोजन बरोबर झाले नाही, त्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी होऊ शकत नाही. शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुढच्या आयुष्यात डॉक्टर, इंजिनियर, वकील, अकौंटंट या शाखांकडे कितीजण वळू शकतील? बाकीचे विद्यार्थी पुन्हा शिकतील, पदवीधर होतील. त्यानंतर काय करतील? त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा जीवनात कितपत फायदा होईल?

आज कारखाने, उद्योगधंदे, दळणवळण केंद्रे, विविध प्रकल्प यांमध्ये आवश्यक ते प्रशिक्षण घेतलेले तरुण कामगार आणि अधिकारी हवे आहेत. संशोधन करण्याकरिता जिद्दी संशोधक हवे आहेत; मात्र या सगळ्यांना हवे असलेले प्रारंभिक शिक्षण या



# आजची शिक्षणपद्धती

भारतातील शिक्षणपद्धती ही कधी समस्या होईल, याचा विचारही कुठल्या शिक्षणतज्ञाने कधी केला नसेल. दरवर्षी मे ते जुलैच्या दरम्यान विविध परीक्षांचे निकाल लागतात. लाखो विद्यार्थी शालांत परीक्षा किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण होतात. तितकेच अनुत्तीर्ण होतात. शालेय शिक्षणानंतर उत्तीर्ण झालेले विद्यार्थी उच्चशिक्षणाकडे वळतातच, असे नाही. फारतर पन्नास टक्के विद्यार्थी उच्चशिक्षण घेतात. बरे, जे शिक्षण त्यांना मिळते, ते केवळ पुस्तकी शिक्षण. ही शिक्षणपद्धती त्याला त्याच्या जीवनापासून, दैनंदिन गरजांपासून आणि समस्यांपासून दूर नेऊन टाकणारी आहे. इंग्रजांनी कारकून तयार करणारी ही शिक्षणपद्धती आणली. महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या शिक्षणपद्धतीच्या विरोधात होते. एका ठरावीक वयापर्यंत शिकायचे आणि त्यानंतर लगेच जीवन जगायचे. शिक्षणात कुठे जीवनाचा संबंध नाही आणि जीवनात पुढे कुठे शिक्षणाचा संबंध नाही.

आजच्या शिक्षणपद्धतीचे फलित काय, असा जर कोणी प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर म्हणजे प्रचंड बेकारी हेच देता येईल. कुणी दहावी-बारावी होतोय, कुणी पदवीधर होतोय, कुणी तंत्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करतोय, कुणी इंजिनियरही होतोय, तरी दिसते

आहे ती बेकारीच. या शिक्षणपद्धतीने निर्माण केलेल्या बेरोजगाराची समस्या अत्यंत गंभीर झाली आहे. सुमारे एकशे पन्नास वर्षांपूर्वी महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर यांना या संकटाची जाणीव झाली होती. त्यांनी व्यवसायप्रधान शिक्षण आणण्याचा आग्रह धरला होता. त्या वेळेस त्यांचे म्हणणे ऐकले असते, तर आज ही बेकारीची समस्या इतकी गंभीर झाली नसती.

सर्वांगीण विकास हा शिक्षणाचा उद्देश असतो. पूर्वी वर्णानुसार शिक्षण दिले जायचे. ब्राम्हण वेदविद्या ग्रहण करीत, क्षत्रिय शस्त्रविद्या शिकत तर वैश्य आणि शूद्र हे त्यांच्या कुटुंबाकडून चालत आलेल्या कलेचे किंवा व्यवसायाचे शिक्षण घेत. चातुर्वर्ण्य पद्धती नाहीशी झाली आणि शिक्षणपद्धतीही बदलली. आजच्या शिक्षणपद्धतीत पुस्तकातील माहिती ठरावीक वेळात कागदावर पुन्हा उतरवून काढणे याला परीक्षा म्हटले जाते. पुस्तकाबाहेरील गोष्टींचा विचार करण्याची मुभा आणि फुरसदही विद्यार्थ्यांसह शिक्षकाला नसते. परिणामी स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकत नाही. पदव्या मिळवणे, हे जीवनाचे ध्येय होऊ लागले आहे. नर्सरी, केजी किंवा पहिलीपासून तर इंजिनियरिंग, मेडिकल अशा शाखांमध्ये प्रवेश मिळवणे आज अत्यंत कठीण झाले आहे. शालेय



शिक्षणात ज्याचे पाठांतर चांगले, तो विद्यार्थी हुशार असे समजले जाऊ लागले आहे.

एकीकडे शाळा-महाविद्यालयांमधून बाहेर पडणारा विद्यार्थ्यांचा लोंढा वाढतो आहे आणि शिक्षणाचा दर्जा मात्र तितकाच घसरत चालला आहे. राजकारणी मंडळींच्या शिक्षणसंस्था गाजरगवताप्रमाणे उगवत आहेत. सर्वत्र पैशाचा खेळ सुरू झाल्याने गरिबांना शिक्षणाची द्वारे बंद होऊ लागली आहेत.

आज प्रत्यक्ष जीवन आणि शिक्षणाचा संबंध उरला नाही. शिक्षणाचा थाट हा शहरी थाट झाला आहे. शिक्षण खेड्यात पोचले परंतु त्याने केलेला शहरीपणाचा साजशृंगार खेड्याला पोषक ठरणारा नाही. भारत हा बहुतांश खेड्यांत वसलेला देश आहे. ग्रामीण भागाला आवश्यक असलेल्या शिक्षणाचा विचार तज्ञांनी न केल्याने 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने एकाच ढाच्याचे शिक्षण शहरी विद्यार्थ्यांना पुढे नेते, तर ग्रामीण विद्यार्थ्यांना आणखी मागे रेटते. ग्रामीण भागाला हवा असलेला अभ्यासक्रम अद्यापही तयार झालेला नाही. समग्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया ग्रामीण जीवनातील शेतीपासून सुरू होतो. या शेतीच्या संदर्भात अजूनही शिक्षणप्रणाली हवी तशी निर्माण झाली नाही. शेतीविषयीचे शिक्षण ग्रामीणांच्या भाषेत नाही. मातृभाषेत नाही. माध्यमाचा प्रश्न अजूनही सुटला नाही. मुदलियार

# ५. कर्माची महती केल्याने होत आहे रे

'यत्न तो देव जाणावा' समर्थ रामदासांनी सांगितलेल्या या यत्नदेवाचे दुसरे नाव आहे कर्मदेव. आपण प्रयत्न जर केला, तर या जगात कुठलीही गोष्ट अशक्य नाही. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' या उक्तीप्रमाणे अशक्य गोष्टीही शक्य होतात.

असे म्हणतात जे शक्य नाही, ते बोलू नये आणि जे बोलले ते केल्याशिवाय राहू नये. म्हणूनच कर्तबगार पुरुष अबोल असतात. 'आधी केले, मग सांगितले' अशी त्यांची वृत्ती असते. याउलट 'गर्जेल ते पडेल काय, बोलेल तो करील काय' अशा प्रवृत्तीची नाकर्ती माणसे असतात. कष्टांपासून दूर पळणारी ही नाकर्ती माणसे घरी बसून सगळी सुखे मिळविण्याची अपेक्षा करतात. सुख मिळाले नाही, तर जगाला, नशिबाला बोल लावतात. स्वतः दुःखी होऊन इतरांनाही दुःख देतात. आळशी लोकांमध्ये असलेली 'येईल माझा हरी । देईल खाटेवरी ।।' ही प्रवृत्तीच मुळात चुकीची आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसेनानींना फार मोठे योगदान द्यावे लागले. घरी बसून आम्हाला स्वातंत्र्य मिळेल, अशी अपेक्षा



तरुणांना मिळालेले नाही. व्यवसायपूरक अभ्यासक्रम राबविलेच गेले नसल्याने उपरोक्त कंपन्यांमध्ये हवे ते काम करणारे तरुण मिळू शकत नाही आणि आपल्या शिक्षणप्रणालीतून बेकारी मात्र वाढते आहे.

आजची शिक्षणपद्धती हीच मुळात समस्या झाल्याने ती बदलण्याची गरज भासू लागली आहे. शालेय स्तरावर व्यवसाय शिक्षण सक्तीचे केले पाहिजे. व्यवसाय शिक्षणातही बहुविधता निर्माण झाली आहे. साधा शिंप्याचा व्यवसाय घेतला तरी वेगवेगळ्या प्रकारचे, नवनवीन फॅशनचे कपडे शिवणे हे आव्हानात्मक काम झाले आहे. केशकर्तनाचा व्यवसाय स्वीकारला तर केसांना वेगवेगळे आकार देणे, रंगवणे, विग तयार करणे अशी कलात्मक कामे त्यात अंतर्भुत व्हायला लागली आहेत. स्त्रियांकरिता ब्युटीपार्लर चालवणे हे आता भरपूर कमाई करून देणारे आणि प्रतिष्ठेचे व्यवसाय बनू पाहत आहेत. वेगवेगळे रुचकर पदार्थ बनवून कार्यक्रमांकरिता पोचवून देणे, कार्यक्रमस्थळी तयार करणे, सजावट करून देणे, एखाद्या सोहळ्यानिमित्ताने मेंदी, रांगोळी काढणे अशाही व्यवसायांना आता मागणी येऊ लागली आहे. ह्या व्यवसायांची प्रारंभिक माहिती शालेय शिक्षणात मिळायला हवी. महाविद्यालयीन अभ्यासात त्यांची सांगड घातली जावी. शालेय पातळीवर शक्य नसेल तर किमान

महाविद्यालयीन पातळीवर यांत्रिक-तांत्रिक ज्ञान प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना मिळायला हवे. हे व्यवसाय शिक्षण म्हणजे काहीशा खर्चाची बाब असली तरी शासनाने कला, वाणिज्य शाखांना अनुदाने, शिष्यवृत्ती कमी केली तरी काही बिघडणार नाही; पण तंत्रशिक्षणाला विद्यार्थ्यांना मदत केली पाहिजे. असे शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी केवळ पदवीची पुंगळी घेऊन बाहेर पडणार नाही, स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या योग्यतेचा तो होऊ शकेल.

कलाविभागात नृत्य, गायन, शिल्पकला स्वयंपाकशास्त्र यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. ग्रामीण भागात चालणाऱ्या व्यवसायात शेती आणि शेतीला पूरक असणारे जोडधंदे यांचे वेगळे शिक्षण मिळाले पाहिजे, जेणेकरून ग्रामीण भागातला विद्यार्थी, जो अनेकदा शहराच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत टिकत नाही, तो ग्रामीण भागातच स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल. अन्यथा पोटासाठी ग्रामीण लोकसंख्येचा भार शहरी जीनावर वाढत राहील, खेडी उजाड होतील आणि ‘खेड्याकडे चला’ या गांधीजींच्या तत्त्वाला हरताळ फासला जाईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता लिहिली आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा विचार फार पूर्वीच मांडला. ग्रामीण शिक्षणातून शीलवान, वीर आणि उद्योगी तरुण निर्माण व्हावा, श्रम ही संपत्ती व्हावी, हे तुकडोजी



महाराजांनी पन्नास वर्षांपूर्वी सांगूनही शासनकर्त्यांचे डोळे अजून उघडलेले नाहीत.

सध्याच्या शिक्षणपद्धतीतून माणूस सुशिक्षित होतो आहे; पण तो सुजाण आणि सुसंस्कृत होतोच असे नाही. तो आत्मकेंद्रित, स्वार्थी आणि संकुचित प्रवृत्तीचा होतो आहे. हुंड्यासारख्या राक्षसी प्रथेमध्ये तो गुरफटतो आहे. वंशाला दिवा हवा, म्हणून पुत्रप्राप्तीसाठी भ्रुणहत्या करायला तो धजावतो आहे. स्त्रियांकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. त्यागाची वृत्ती लोप पावते आहे. स्वार्थासाठी अविवेकी होण्याची वृत्ती, गुन्हेगारी आता सुशिक्षितांमध्येच अधिक आढळायला लागली आहे. आज भारतीय तरुणाचा भावनिक, बौद्धिक आणि शारीरिक असा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षणपद्धतीत व्यापक बदल करणे गरजेचे झाले आहे. सुसंस्कार करणारे, देशावर प्रेम करण्यास शिकवणारे, सर्वधर्मसमभावाची संकल्पना रुजवणारे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भाकरी मिळवून देणारे व्यावसायिक शिक्षण आज हवे आहे. त्यातून खऱ्या अर्थाने व्यक्तिविकास होईल. व्यक्तिविकासातून समाजविकास आणि समाजविकासातून राष्ट्रविकास होईल. राष्ट्र सर्व दृष्टींनी संपन्न होईल.

एक टक्का बुद्धी आणि नव्याण्णव टक्के प्रयत्न असतात.
’

‘कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।’ फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करीत राहावे. अजिंठा, वेरूळच्या लेणी तयार करण्यासाठी हजारो कारागीर कित्येक वर्ष राबत राहिले. त्यामधून इतकी सुंदर लेणी तयार होतील, याची कल्पना तेव्हा त्यांना स्वतःलाही आली नसेल. प्रयत्नवाद हा स्थलकालातीत असतो. प्राचीन काळातील श्रीरामचंद्र काय किंवा हे कारागीर काय अथवा आज वेगवेगळे उपग्रह अवकाशात सोडणारे शास्त्रज्ञ काय हे सर्वच यत्नवादाचे निःसीम उपासक आहेत. हॉकीचे जादूगार ध्यानचंद, पहिले ऑलिंपिक सुवर्ण मिळवून देणारे कुस्तीपटू खाशाबा जाधव, आंतरराष्ट्रीय कीर्तीची धावपटू पी.टी. उषा, वयाच्या चौदाव्या वर्षी इंग्लिश खाडी पोहून जाणारी आरती प्रधान, सध्याच्या टेनीस विश्वात दबदबा निर्माण करणारे लिएंडर पेस, महेश भूपती, सानिया मिर्झा, क्रिकेटमधील सचिन तेंडूलकर, अंतराळात झेपावलेल्या कल्पना चावला, सुनीता विल्यम्स हे सर्व यत्नपंढरीचेच वारकरी नव्हेत काय?

बाबा आमटेंच्या आश्रमात गेल्यावर खरी कर्माची महती पटते. कालपर्यंत असाध्य वाटणारे कुष्ठरोगासारखे आजार बरे होऊ शकतात. आनंदवनात



त्यांनी केली असती, तर आपला देश कधीच स्वतंत्र झाला नसता.

पूर्वी वर्णानुसार किंवा जातीनुसार कर्माची विभागणी केली जायची. काळ बदलला आणि कुठलेही काम कोणत्याही जातीची व्यक्ती करू लागली. सानेगुरुजींच्या मते कुठलेही काम हलके किंवा नीच नसते. प्रत्येक कर्म हे आपापल्या परीने श्रेष्ठ असते. सेवेची सर्व कर्मे पवित्र असतात. त्यांची किंमत सारखीच असते. आपल्या आवडीच्या कर्मात रमायचे असते. प्रश्न एवढाच असतो, की कार्य करणारी व्यक्ती त्यामध्ये किती जीव ओतते? शरीराने कर्म करावे. त्या कर्मात हृदयाचा जिव्हाळा ओतायचा आणि ते कर्म करताना बुद्धी वापरायची. अशा रीतीने प्रत्येक व्यक्तीने शरीर, हृदय व बुद्धी या तिन्हींच्या योगाने समाजासाठी रात्रंदिवस झिजायचे. त्यातून खरी समाजसेवा होईल. कर्म करणारा प्रत्येक व्यक्ती थोर असतो. झाडू मारणाराही तितकाच थोर असतो, जितका की शिक्षक किंवा एखादा योद्धा. कामे तुच्छ नसतात, हृदय ओतून केलेले कुठलेही काम मोक्षप्राप्तीच्या योग्यतेचे असते. कामाची लाज नसावी. लाज वाईट गोष्टींची असावी. माणसाने सतत कर्म करावे. अडचणी आल्या तरी कर्मापासून दूर पळू नये. स्वराज्यस्थापनेच्या कार्यात छत्रपती शिवाजी महाराजांना अनेक अडचणी आल्या,

तरी त्यांनी यत्नदेवाची उपासना सोडली नाही. त्यांना यश मिळाले. महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. पाणक्या असलेला मुलगा राम अथःप्रयत्नांनी आपल्या भावी जीवनात रामशास्त्री प्रभुणे म्हणून ख्यातनाम न्यायमूर्ती झाला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नेत्यांनाही सतत प्रयत्न करावे लागले आणि त्यांच्या अथक परिश्रमाचे चीज झाले.

सतत कार्यरत राहणारी, कर्म करीत प्रयत्नाला परमेश्वर मानणारी माणसे 'असाध्य ते साध्य करिता सायास ।' या उक्तीवर विश्वास ठेवतात. प्रयत्न करीत राहतात. मार्ग सापडतो. 'धावत्याला शक्ती येई आणि रस्ता सापडे' या उक्तीची प्रचिती अनेक घटनांतून येते. नव्या जगाच्या शोधासाठी निघालेल्या कोलंबसाचा, वास्को दी गामाचा मार्ग चुकला; पण त्यांनी प्रयत्न थांबवला नाही. 'थांबला तो संपला' हे त्यांना माहीत असावे आणि म्हणूनच त्यांना नव्या भूमीचा शोध लागला. नेपोलियन बोनापार्टच्या मते 'अशक्य' हा शब्द केवळ मूर्खांच्या शब्दकोशात आढळतो. शाहणे लोक प्रयत्नांच्या बळावर 'करीन ती पूर्व' म्हणत असतात. अशा प्रयत्न करणाऱ्या भक्तांवर ईश्वरही कृपा करतो. 'नसे राऊळी वा नसे मंदिरी । जेथे राबती हात तेथे हरी ।।' या कविश्रेष्ठ माडगूळकरांच्या कवितेतील ओळी हाच आशय सांगतात.



भारतीय संस्कृतीतील प्रयत्नवादाची आणि कर्म करीत राहण्याची उदाहरणे बघितल्यास कर्माची महती सहज लक्षात येते. श्रीरामचंद्राने वानरसेनेच्या साह्याने सागरावर सेतू बांधला. बलसागर मारुतीने जलसागर उल्लंघला. भक्त प्रल्हाद आणि ध्रुवानेही प्रयत्नांच्या जोरावर व आत्मशक्तीच्या बळावर अढळपद मिळवले. अंगावर वारूळ निर्माण झाले तरी रामनामाचा जप न सोडणाऱ्या वाल्याचा वाल्मीकी झाला. स्वतःच्या कठोर परिश्रमांनी आकाशीची गंगा अवनीतलावर आणून स्वतःच्या शापित पितरांना मुक्ती देणारा भगीरथ अमर झाला. 'नर करणी करे तो नरका नारायण बन जाए' याची साक्ष या उदाहरणांवरून पटते.

'केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे ।।' समर्थ रामदासांचे हे सूत्र लक्षात ठेवून मानवाने कर्म करीत राहिले तर यश अवश्य मिळते. जगातील अत्युच्च शिखर सर करण्याचा विक्रम शेरपा तेनसिंहाने केला. गॅलिलिओ, आइन्स्टाईन, न्यूटन, जगदीशचंद्र बोस, सी.व्ही. रमण यांच्यासारख्या शास्त्रज्ञांनी विज्ञानात मोलाचे संशोधन केले. शास्त्रज्ञ म्हणून त्यांनी जो मान मिळवला, त्याकरिता त्यांना एक एक प्रयोग हजार वेळा करावा लागला. स्वतः एडीसन संशोधनाविषयी म्हणतो, 'मानवाच्या यशामागे

आहेत? या सर्व प्रकाराला जबाबदार कोण? शासन, सावकार, सहकारी पतसंस्था, बँका की खुद्द शेतकरी?

आपल्या काळ्या आईशी इमान राखणारा, घाम गाळून सोन्याच्या राशी निर्माण करणारा देशाचा पोशिंदा शेतकरी आज अत्यंत कठीण अवस्थेला पोचला आहे. आजही तो उन्हातान्हात कष्ट करतो. पायाने चिखल तुडवतो. तरीही त्याला आज सुखाने जगणे कठीण झाले आहे. कर्जाच्या ओझ्याखाली तो दबून गेला आहे.

पीकपद्धती, सिंचनाची सोय, अर्थपुरवठा, शेतमालासाठी बाजारपेठ, जोडधंदे आणि शासकीय मदत या गोष्टींशी शेतकरीजीवन निगडित असते. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब या राज्यांतही शेतकरी दैन्यावस्थेला पोचला आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे तेथील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा होय. महाराष्ट्रात सर्वाधिक कठीण अवस्था पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादकांची आहे.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांना कर्जवाटप सहसा सहकारी संस्थांमार्फत होते. मात्र राष्ट्रीय बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केल्याने सहकारी संस्था मोडकळीस आल्या. ग्रामीण भागात लहान शेतकऱ्यांना त्या कर्ज देऊ शकत नव्हत्या, म्हणून शेतकरी खाजगी सावकारांकडे वळले. तिथे त्यांची मोठी लूट झाली.



दृष्टीहीनांना फुटबॉल खेळताना पाहून आश्चर्याने तोंडात बोट घालावे लागते.

नदीचा वाहणारा प्रवाह अडविण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही, असे मनाशी ठरविले असते, तर एकही धरण बांधल्या गेले नसते. कुठल्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर कर्म करताना चिकाटी ठेवावी लागते. तिथे कामाच्या कठीणपणाची किंवा कमीपणाची पर्वा करायची नसते. कुठलीही एखादी गोष्ट आपल्याला साध्य होणार नाही, असे समजून प्रयत्न सोडून देणे म्हणजे पलायनवादी प्रवृत्तीचे द्योतक आहे. निराशावादी सिद्धांतांनी माणसाची प्रगती होत नाही. म्हणूनच सातासमुद्रापलीकडील इंग्रजांनी भारतावर राज्य केले. येथे रावाचे रंक होतात आणि रंकांचे राव होतात. जो व्यक्ती सतत कर्म करीत राहतो, तोच शून्यातूनही वैभव निर्माण करू शकतो. अशा व्यक्तीलाच यशश्री आपली माळ घालते. 'आधी कष्ट मग फळ, नाही कष्टचि ते निर्फळ' हे विसरू नये. अठराविश्वे दारिद्र्यातून आलेले डी. लक्ष्मीनारायण कठोर परिश्रमाने वैभवसंपन्न झाले आणि त्यांनी नागपूर विद्यापीठाला पुढे नेण्यासाठी मोठे अर्थसहाय्य केले. एक कवी म्हणतो,

'घनाचे घाव घालावे । गळावा घाम अंगीचा ।।
यशोदेवी तयासाठी । करी घे हार फुलांचा ।।'

मानवी जीवन छोटेसे आहे. जीवन समृद्ध व सुखी करायचे असेल तर वेळ न दवडता सतत कार्यरत राहणे गरजेचे आहे. आज आपण अणुयुगात राहतो, यंत्रयुगात राहतो. एका एका शोध ासाठी शास्त्रज्ञांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. डॉ. कोटणीसांनी चीनमधील तापासारख्या साथीवर लस शोधून काढण्यासाठी स्वतःचे प्राण खर्ची घातले. त्यामुळे हजारो लोकांचा मृत्यू टाळता आला. अशा सतत कार्यरत राहणाऱ्या थोरांचा कित्ता आपण गिरवायला हवा.

'भाग्याकरिता संकल्प करावे । दृढनिश्चया वाढवीत जावे ।।
तैसेची प्रयत्न करीत रहावे । आळस सोडोनी ।।
केल्यानेच भाग्य फळते । केल्यानेच स्वर्गसुख मिळते ।।
केल्यानेच सर्व काही होते । मानवाचे ।।'

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या रचनेनुसार माणसाने सदैव उद्योगी असावे. प्रयत्नांच्या बळावर नशिबाच्या रेघा बदलणारी माणसे जगात कमी नाहीत. 'नंतर करू' किंवा 'उद्या करू' असे म्हणणरा माणूस जीवनात काहीच करू शकत नाही. समुद्र शांत झाल्यावर स्नान करू म्हणणारा हास्यास्पदही ठरतो आणि निष्क्रियही ठरतो. मनुष्याने निराश न होता



प्रयत्नांची पराकाष्ठा करीत कर्म पार पाडावे आणि ते सतत करीत राहावे. थोर विचारवंत वॉशिंग्टन कार्व्हर म्हणतो -

Start from where you are
with what you have
Make something of it
Never be satisfied.

## ६. शेतकऱ्यांची दैन्यावस्था

सकाळी सकाळी वृत्तपत्र उघडले की नजर जाते ती आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झालेल्या आकड्यावर. गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेवर सातत्याने चर्चा होत आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी, दुष्काळ आणि अतिवृष्टी यांव्यतिरिक्त घरगुती भांडणे, इस्टेटीचे वाद, मानसिक असंतुलन, दारू, मटका, जुगार आदींच्या आहारी जाणे यांपैकी कोणती कारणे शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला कारणीभूत आहेत? एक मत असे आहे की, जागतिक व्यापार संघटना आणि अमेरिकेची मर्जी राखण्याच्या आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. तथ्य काय? शेतकरी दैन्यावस्थेला का पोचला? का बरे गावकरी गाव विकायला काढल्याच्या किंवा किडनी विकण्याच्या जाहिराती करीत

शेतकऱ्याला गैरमार्ग अवलंबावा लागतो. कष्ट करणारा शेतकरी सर्वत्र नागवला जातो. वैध सावकारीच्या नावाखाली व्याजाची रसीद दीड टक्क्यांची दाखवायची आणि बिनारसीद साडेतीन टक्क्यांनी वसूल करायचे, ह्या व्यवहारामुळे शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे.

मोठ्या हिमतीने, आशेने, कष्टाने शेतात पेरणी करावी आणि निसर्गराजाने फटका द्यावा. कधी अतोनात पाऊस, तर कधी कोरडा दुष्काळ. आभाळातले पाणी असे शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आणते. जिवापाड कष्ट करूनही पीक हाती आले नाही किंवा अपेक्षेपेक्षा खूपच कमी आले, तर त्याने बिचाऱ्याने घरातील मंडळींना काय खाऊ घालावे? आणि सावकाराचे कर्ज कसे फेडावे?

मुलांच्या, घरातील वृद्धांच्या किंवा पत्नीच्या अंगावर फाटकी लक्तरे पाहून तो विषण्ण होतो. अशातच मायबाप सरकारने खेडोपाडी दारूचे गुत्ते उघडून दिले आहेत. मग दुःख विसरण्यासाठी कुणीतरी या बापड्याला दारू दुकानाचा रस्ता दाखवतो आणि नंतर त्याच्या दुर्गतीला पारावारच उरत नाही. दारूच्या नशेत घरच्या बायकोमुलांना मारहाण, अद्वातद्वा शिविगाळ हे प्रकार नित्याचे होऊन जातात.

शेतीविषयक योग्य मार्गदर्शन गरीब शेतकऱ्यांना मिळत नाही. नवनवीन शेतीचे प्रयोग



सहकारी बँकांकडून मिळणाऱ्या कर्जाचा दर अधिक असल्याने तो कमी करण्याची गरज आहे. दर कमी केला तर संस्था मोडकळीस येतात आणि वाढवला तर शेतकरी. अशा अवस्थेत शेतकऱ्यांना प्राधान्य द्यायचे की सहकारी संस्थांना हे ठरविण्याची वेळ राज्यकर्त्यांवर आली आहे.

ज्या ठिकाणी एकपीकपद्धती आहे, तेथील शेतकरी तुलनेने गरीब आहेत. बरेच शेतकरी वर्षातून एकच पीक घेतात. दुहेरी पीक घेण्यासाठी पाण्याची गरज असते. पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. बरीचशी शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते. सिंचनात नवीन तंत्रज्ञान सहसा आढळत नाही. सिंचनाच्या सोयी कमी असल्यामुळे योग्य वेळी पिकाला पाणी मिळत नाही. परिणामी पीक कमी येते. काही वेळा बियाण्यांची प्रत चांगली नसते. भारनियमनामुळे शेतीला वेळेवर पाणी देता येत नाही. याशिवाय बहुतेक ठिकाणी उन्हाळा कडक असल्याने उन्हाळी पिकेही घेता येत नाहीत.

दैन्यावस्थेला पोचलेले शेतकरी बहुतेक कोरडवाहूचे कास्तकार आहेत. कर्जबाजारीही आहेत. जलसिंचनाचा अनुशेष असणाऱ्या जिल्ह्यांतील आहेत. मात्र ज्यांची शेते जलसिंचनक्षेत्रात येतात, ज्यांच्या शेताच्या कडेने पाटाचे पाणी वाहते, त्यांच्याकडे चाराही भरपूर

उपलब्ध असतो. त्यांनी गाईम्हशी आपल्या दाराशी बांधल्या आहेत. दूधदुभत्यासोबतच शेणखताचीही उपलब्ध ाता तेथे होते आहे. असे शेतकरी सधन कास्तकार म्हणून ओळखले जातात; पण ते मोजकेच आहेत.

विदर्भ पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. पश्चिम विदर्भातील कापूस हे प्रमुख नगदी पीक आहे. कापसाच्या जोडीला ज्वारी, तूर अशीही पिके घेतली जातात. कापसाची लागवड साधारणपणे जून महिन्यात केली जाते. सहा ते सात महिन्यांनी पीक हाती येते. परिणामी त्या जमिनीत रब्बी हंगामात दुसरे पीक घेता येत नाही. ज्वारीवर अवेळी पावसाचा आणि तुरीवर किडीचा बऱ्याचदा दुष्परिणाम होतो व पिके बुडतात, म्हणून ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात नाहीत.

शेतमालाचा उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न अल्प अशी स्थिती झाली आहे. अल्पस्वल्प जमीन असणारे गरीब शेतकरी - त्यातही कोरडवाहू शेती असली, तर नेहमीच अडचणीत येतात. शिक्षणाचा अभाव असल्याने शेतीत राबण्याशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. कुटुंबनियोजनाची जाणीव नसल्याने दोनपेक्षा अधिक संतती असलेल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह २-४ एकर शेतीच्या भरवशावर होणे कठीणच! तरीही थोडेफार कष्ट करू शकणारे सगळेच स्वतःच्या शेतावर



राबत असतात. गरिबीमुळे बीबियाणे विकत घेणे, नांगरवखर भाड्याने आणणे ह्यासाठी आणि शेतीच्या मशागतीसाठी पैसा लागतो. राष्ट्रीय बँका सहसा अशा शेतकऱ्यांना कर्जाऊ रक्कम देत नाहीत. सहकारी बँका, पतसंस्था स्वतःचे हित पाहून भरपूर व्याज आकारून कर्ज देतात. येथेही शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे टपून बसलेले असतात. कमी रक्कम शेतकऱ्याच्या हाती सोपवून जास्त रकमेच्या कर्जावर सही घेतली जाते आणि मग असे भरमसाठ वाढत गेलेले कर्ज व्याजासह फेडणे जवळजवळ अशक्य होते.

राष्ट्रीय बँका किंवा सहकारी संस्थांकडे कर्ज थकित झाल्यावर दीनवाणा शेतकरी खाजगी सावकराची पायरी चढतो. इथेही तो भरपूर नागवला जातो. कर्जाची रक्कम चक्रवाढ व्याजाने वाढत जाते. स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन शेतकरी जमेल तेवढी रक्कम व्याजापोटी सावकाराच्या खिशात घालतो, तरीही मुद्दल फिटत नाही. अखेरीस त्याची शेतीही सावकार हडपतो. मग शेतकऱ्याला मरण जवळ करण्याशिवाय पर्याय राहत नाही.

एकंदरीत भ्रष्ट यंत्रणा, व्यापारी, दलाल, कारखानदार, लुटणाऱ्या सहकारी बँका, पतसंस्था, सावकार या सर्वांनी शेतकऱ्याला गुलाम बनवून त्याचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. कर्ज घेण्यासाठी

संस्थांनी दिलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे हा स्वाभिमानी शेतकरी हतबल झाला आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांची तरुण मुले थोडासा शाळा-कॉलेजचा वारा लागला की इतर श्रीमंत विद्यार्थ्यांप्रमाणे स्वप्ने रंगवू लागतात. शेतीत कष्ट करण्याऐवजी पानाच्या टपरीवर, दारूच्या गुत्त्यावर, तीनपत्ती वगैरेच्या अड्ड्यावर रममाण होतात. त्यामुळे शेतकऱ्याला एकट्यालाच राबावे लागते. परिणामी उत्पादन वाढत नाही आणि शेती तोट्यात येते. पूर्वी शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या. आता शहरीकरणामुळे आणि अनुकरणामुळे ग्रामीण भागातील नवीन पिढीच्या गरजा वाढल्या आहेत. वडिलोपार्जित शेतीमध्ये विभाजन होऊन शेतीची दरडोई उपलब्धता कमी झाली आहे. परिणामी बरेच शेतकरी अल्पभूधारक झाले असून शेतीतून मिळणारे उत्पन्न त्यांना पुरत नाही, हा मुद्दाही लक्षात घेतला पाहिजे. काही वेळा सिंचनाकरिता, कालव्यांकरिता अथवा रस्ते-महामार्ग निर्माण करण्याकरिता शासनातर्फे, कालवे व पाटबंधारे विभागातर्फे शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात. त्यांचा पुरेसा मोबदला दिला जात नाही आणि तोही वेळेवर कधीच नाही. कितीतरी वेळा संदर्भित कार्यालयांच्या पायऱ्या चढल्यावर, वर्षानुवर्षांच्या कोर्टकचेऱ्या केल्यावर नाममात्र रक्कम मिळते. विविध कृषीमालाची भाव ठरविण्याची पद्धतही सदोष असून



शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाहीत. सामाजिक प्रदूषण, राजकीय कंत्राटदारी यांमुळे अनैसर्गिक दुष्काळासारखी स्थिती निर्माण होते. अडाणी, अशिक्षित शेतकरी परंपरेने माहीत असलेली पिके घेत असतो. त्याऐवजी त्याच्या शेतीत इतर काही लागवड करून अधिक उत्पादन मिळविणे शक्य आहे किंवा नाही, हे कृषी खात्यातील मंडळी सांगू शकतात; पण खेड्यापाड्यांतून अशा कार्यालयात काम करणारे तज्ज्ञ सहसा श्रीमंत शेतकऱ्यांची 'हांजी हांजी' करून स्वतःच्या खिशात अतिरिक्त रक्कम टाकण्याच्याच विचाराचे असतात. भरपूर पैसे देईल त्या शेतकऱ्यालाच योजनांचा लाभ देणारे हे अस्तनीतले निखारेही काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला जबाबदार आहेतच.

शेतमालाचे भाव वाढत असल्याची भीती दाखवत आयात केली जाते. त्यामुळे देशात शेतमालाचे भाव पडतात. जगात कुठेही मुक्त अर्थव्यवस्था नाही. ती आहे म्हणणे म्हणजे शुद्ध फसवणूकच म्हटली पाहिजे. तो केवळ आभास आहे. डेन्मार्कमध्ये शेतकऱ्यांना एक गाय पाळण्यास वार्षिक अकरा हजारांचे अनुदान मिळते. अमेरिकेत कापूस उत्पादकांना भरपूर अनुदान दिले जाते. भारतात मात्र अनुदान देण्यात कुचराई केली जाते. यातूनच शेतकरी तोट्यात जातो.

शेतकऱ्याला महागडे संकरित बियाणे

वापरावे लागते. संकरित बियाणांना रासायनिक खतांशिवाय पर्याय नाही, असा प्रचार केला जातो. घरचे दागदागिने गहाणात अडकल्याने मिळेल त्या भावात गोधन कसायास विकावे लागते. परिणामी शेणखत उपलब्ध होत नाही. काही वेळा मजुरांचे अडेल तट्टू धोरण आणि पिकवलेल्या मालाला अल्प बाजारभाव अशा अनेक कारणांमुळे कर्जबाजारीपणाला सुरुवात होते.

मोजके धनदांडगे शेतकरी सोडले तर बहुतेकांना शेतीसाठी दरवर्षी कर्ज काढावे लागते. शेतीत सुधारणा करण्यासाठी मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाचीही आवश्यकता असते. ही कर्जे सहज उपलब्ध व्हावीत. मात्र आपली अर्थव्यवस्था जागतिक बाजारांवर सोपविल्या गेलेली आहे. भारतात चैनीच्या वस्तू शून्य टक्क्यांपासून सहा टक्के व्याजदरापर्यंत मिळतात. गृहकर्जासाठी किंवा गाडी घेण्यासाठी केवळ सात ते नऊ टक्के व्याजदरात कर्जपुरवठा होतो. अनेक व्यावसायिक भांडवलदारांना नऊ टक्के व्याजदराने कर्ज मिळते. शेतीला मात्र प्रसंगी १८ टक्क्यांपर्यंत व्याजदर लावला जातो. याउलट बहुतेक विकसित देशांमध्ये शेतीला दोन ते तीन टक्के व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो. चीनमध्ये हा कर्जपुरवठा शून्य टक्के व्याजदराने होतो. विकसित देशात शेतीसाठी दररोज जवळ जवळ एक



अब्ज डॉलरचे अनुदान दिले जाते. युरोपियन देशात शेतमालाच्या किमतीच्या ३१ टक्के अनुदान शेतकऱ्यांना दिले जाते आणि आपल्या देशात दामदुपटीने कर्जवसुली केली जाते. पाश्चिमात्य देशात शेतकऱ्यांना खत, बीबियाणे यांवर अनुदान तर मिळतेच; पण पाऊस झाला नाही किंवा अतिवृष्टी झाली तरी अनुदान मिळते. सरकारने शेतमालाचा कमी भाव ठरवला, तरीही त्या भावावर अनुदान देऊन सरकार शेतमाल खरेदी करते. आपल्याकडे सगळेच उलटे आहे.

एवढा मोठा कापूस आपल्या प्रदेशात निर्माण होत असूनही जागतिक बाजारपेठेत भारत हा सर्वात मोठा कापूस आयातदार देश आहे. जागतिक बाजारपेठेत कापसाचे भाव फार कमी झाले आहेत. तिथे मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते; पण आपल्या देशातील विशेषतः कापूस उत्पादकाने जगावे तरी कसे, हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

आजच्या शेतकऱ्यांत पूर्वीच्या कष्टकऱ्यांसारखी कष्ट करण्याचीही तयारी दिसत नाही. कमी श्रमात जास्त मोबदला मिळविण्याची हाव माणसाला अधोगतीला नेते. पूर्वी अर्धपोटी, उपाशी राहून राबणारा शेतकरी शासकीय मदतीविना, पॅकेजविना धान्याच्या राशी निर्माण करीत होता; परंतु लाचारीने जगत नव्हता. आज सहकारी बँकांनी किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या

परावलंबी राहिलेला आहे. स्वतःच्या उत्पादनाची किंमत त्याला ठरविता येत नाही. हे परावलंबित्व संपविण्यासाठी नव्या धोरणांचा विचार व्हावा. एकंदरीत, अशा उपाययोजना केल्या नाहीत तर आधीच दारिद्र्याने गांजलेला, कर्जबाजारी झालेला, फसवणुकीने आणि भ्रष्टाचाराने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याची दैन्यावस्था दूर होणे कठीण आहे.

⃠⃠⃠

## ७. धर्मनिरपेक्षता : काळाची गरज

प्राचीन काळात मनुष्य हा एकटादुकटा राहत होता. त्याचे जीवन असुरक्षित होते. म्हणून तो समूह करून राहू लागला. हा समूह सुव्यवस्थित व सुखाचा राहावा म्हणून कुटुंबसंस्था उदयास आली. कुटुंबसंस्थेच्या विकासातून समूहाचा समाज बनला. पुढे या समाजाला 'राष्ट्र' नावाचे प्रतिष्ठित रूप प्राप्त झाले.

भारत हे एकात्म राष्ट्र आहे. अनेक जाती, जमाती, विविध भाषा, वेगवेगळे प्रांत आणि निरनिराळे धर्म या विविधतेने भारत नटला आहे. एक भाषा, एक जात, एक धर्म व एक पंथ असलेले अन्य



ती बदलणे गरजेचे आहे. शेतमालाच्या भावाचा संबंध महागाईच्या निर्देशांकाशी जुळविल्या जावा.

दुष्काळ दबक्या पावलांनी माणसांच्या आयुष्यात येतो आणि तो जीवन जगण्याची ऊर्मीच संपवतो. कोट्यवधी रुपये जलसंधारणासाठी येतात; पण त्यांचा योग्य विनियोग होत नाही. संपूर्ण गाव कर्जबाजारी असते; पण पैसा कुठे गेला हे कुणीच सांगत नाही.

'गाव विकणे आहे', 'किडनी विकणे आहे' अशा प्रकारच्या जाहिराती जोर धरत आहेत. गुराढोरांच्या पाठीवरही 'विकणे आहे'चे फलक लागलेले दिसतात. राष्ट्रपतींकडे कर्जबाजारीपणामुळे इच्छामरणाची मागणी करणारे शेतकरीही आढळतात. या सर्वांतून शेतकरी जीवनाचेच नव्हे, तर संपूर्ण ग्रामीण भागातील विदारक, स्फोटक चित्र समोर येते. ग्रामीणांचे दुखणे, त्यांच्यातला असंतोष प्रकट करण्याकरिता त्यांनी निवडलेला हा प्रतिकात्मक मार्ग आहे.

काही शेतकरी शेतीच्या नावाने कर्ज घेतात आणि त्यातून कधी मुलीचे लग्न, कधी घरातील तेरवी, कधी वर्षश्राद्ध, कधी एखादा मोठा सण, कधी वाढदिवस भव्य प्रमाणात साजरा करून त्या कर्जाचा दुरुपयोग करतात. शेतीसाठी तो पैसा वापरलाच जात नाही. मग उत्पादन नाही, म्हणून कर्ज फेडणे

शेतकऱ्याच्या जिवावर येते. शेतकऱ्यांची ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी मनापासून कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. शासनाकडून आणि समाजसेवकांकडून त्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे. कृषी महाविद्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्यामार्फत शेतकरी मेळावे घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना दिली जावी. शेतीविषयक होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची आणि योजनांची माहिती शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातच मिळाली तर सोयीचे होईल. त्यासाठी शेतकरी शिक्षित असणेही महत्त्वाचे. पदवी मिळवल्यानंतर शेतकऱ्यांची तरुण मुले शेतीत कष्ट करण्याऐवजी नोकरीसाठी शहरात धावतात. शेतीत कष्ट करून माझ्या ज्ञानाचा फायदा सर्वांना करून देईन, असा संकल्प तरुण शेतकऱ्यांनी केला पाहिजे. शेतकऱ्यांनी वर्षातून किमान दोन पिके घेतली पाहिजेत. सध्या सोयाबीनकडे वाढता कल आहेच. संत्र्याच्या मध ये गहू पेरणारेही शेतकरी आता दिसू लागले आहेत. खरीप हंगामात गहू, हरभरा, भाजीपाला, फळे, फुले अशी पिकेही घ्यावीत. कडक उन्हाळ्यामुळे शेतकऱ्यांसाठी शीतगृहे उभारण्यासाठी शासकीय अनुदान मिळावे, जेणेकरून शेतकरी उन्हाळ्यात भाजीपाला, फळे, फुले अशी पिके घेऊ शकतील. शासनाची मदत किंवा विविध



ा योजना शेतकऱ्यांपर्यंत खऱ्या अर्थाने आणि पूर्ण लाभाने पोचल्या पाहिजेत. मध्यस्थांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे आवश्यक आहे. बोगस बीबियाणे, निःसत्त्व खते किंवा फवारणीची औषधे यांबाबत गुन्हेगारांना मोठमोठ्या शिक्षा झाल्या पाहिजेत. शासनाने कापसाचा भाव वाढवून द्यावा. परदेशी कापूस भारतात येऊ नये, म्हणून आयात कर वाढवावा. बीबियाणे, खते, रसायने सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्याच्या मालाचे पैसे हप्ते न पाडता एकरकमी व वेळेवर द्यावेत. सर्वप्रकारच्या कर्जाची माफी शासनाने करावी. विनामूल्य नाही; पण शेतीकरिता नाममात्र दरात भारनियमनाविना वीज पुरवावी. राजकीय नेत्यांनी समाजकारणावर जोर देऊन जनतेचे प्रश्न सोडवावे. सिंचनाच्या सोयी वाढवाव्यात. शेततळे, गावतलावांची निर्मिती व्हावी. कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग - जसे जिनिंग, प्रेसिंग, सूतगिरणी इत्यादींमध्ये शेतकऱ्यांना सहभागी करावे, म्हणजे त्यातून मिळणारा नफा त्यांच्याही वाट्याला येईल. विमा योजना योग्य पद्धतीने राबविली जावी. शासकीय संस्थांनी, बँकांनी, सहकारी संस्थांनी आणि वैध सावकारांनी कर्जवसुली करताना संयम बरतावा. शेतकऱ्यांचे मनोधैर्य खचेल, असे कुठलेही पाऊल उचलू नये. शेतकऱ्याला विक्रीव्यवस्थेचे आजही पुरेसे ज्ञान नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या असो किंवा व्यापारी व्यवस्था, शेतकरी कायम विक्रीबाबत

करायला हवे; पण ते राजकारण्यांच्या हातातील बाहुले बनले तर राष्ट्रहिताकडे सहज दुर्लक्ष होते. घटनेने शासनाला अधिकार दिला असूनही राजकीय स्वार्थासाठी धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा लादण्याचा प्रयत्न करताना कोणताच पक्ष दिसत नाही, हे या देशाचे दुर्दैव आहे.

'खरा धर्म मानवता धर्म होय. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे' या उक्तीनुसार जे माझे दुःख ते इतरांचे दुःख व जे दुसऱ्यांचे दुःख ते माझेही दुःख या भावनेतून सर्व जातीय, धर्मीय लोकांनी व्यवहार केला तर सर्वधर्मसमभाव स्थापित होण्यास विलंब लागणार नाही.

राज्यकारभार चालविताना कोणताही धर्म आड येता कामा नये. आज काही जातीजमातींना सवलती दिल्या जातात. त्यातूनही द्वेषप्रवृत्ती उदयाला येते. सर्वांनाच समान सवलती, समान अधिकार, समान स्वातंत्र्य मिळाले तर ह्या विद्वेषाचे मूळ नाहीसे होऊ शकेल. इतर धर्मांबद्दल, जातींबद्दल मनोमन आदर बाळगून आपापल्या धर्मानुसार आचरण केले तर ते सर्वांच्या भल्याचे सिद्ध होईल.

प्रत्येक राष्ट्राची संस्कृती, परंपरा वेगवेगळी असू शकेल. प्राचीन काळी असलेल्या वर्णव्यवस्थेमुळे अजूनही लोकांच्या मनात स्वधर्म, स्वजातीच्या श्रेष्ठत्वाची भावना पुसली गेली नाही.



कोणतेही राष्ट्र भिन्न कसे ठरेल? ते सर्वदृष्टींनी एक असेल; पण एकात्म असेलच असे नाही. भारताचे मात्र उलट आहे. भारतात भिन्न धर्म, भिन्न पंथ, भिन्न भाषा, भिन्न जाती आहेत. एका अर्थाने भारत एकात्म आहे. तो सुखाने नांदत आहे. आपण सारे एक आहोत, याची जाणीव त्याला आहे. विविधतेतून जी संस्कृती बनलेली आहे, ती भावनेने, परंपरेने एक आहे. एकंदरीत धर्मनिरपेक्ष असे हे राष्ट्र आहे.

लोकशाहीतून धर्मनिरपेक्षतेची कल्पना युरोपात सोळाव्या शतकानंतर उदय पावली. भारतात ती इंग्रजी आमदानीत प्रथम प्रसृत झाली. १९४७ नंतर भारतासाठी धर्मनिरपेक्ष शासनव्यवस्थेसाठी संविधान तयार करण्यात आले. त्यामध्ये प्रत्येकाला स्वतःच्या धर्माचे आचरण आणि उपासना करण्यास पूर्ण मुभा देण्यात आली; परंतु सामाजिक व्यवहारात मात्र सर्व धर्मीयांना नियमानुसार आणि संविधानानुसारच वागणे आवश्यक करण्यात आले. सर्वांनाच समान सामाजिक आणि राजकीय हक्क प्रदान करण्यात आले.

भारत हा एक विशाल देश आहे. त्यात विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात. अशा वेळी ते सर्व राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र बांधले जाणे महत्त्वाचे ठरते. आपल्या देशाची प्रतिष्ठा टिकवणे, तिचा सन्मान राखणे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. त्यातूनच

एकविचाराची, बंधुत्वाची भावना निर्माण होईल व राष्ट्राच्या प्रगतीतील अडथळे दूर होतील.

अत्यंत प्राचीन संस्कृती हे भारताचे वैशिष्ट्य आहे आणि त्यामुळे विविध धर्मांचेही प्राबल्य येथे आढळते. त्यातूनच जातिव्यवस्था निर्माण झाली आहे. ज्या जातीत मनुष्य जन्माला येतो, त्या जातीचे संस्कार, आचारविचार, रीतिरिवाज तो मरेपर्यंत पाळत असतो. हिंदू, मुस्लीम, शिख, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध, जैन असे अनेक धर्माचे लोक वर्षानुवर्षे भारतात राहत आहेत.

पूर्वी ज्या धर्माचा राजा त्या धर्माची प्रजा हा संकेत असल्यामुळे पूर्वी ज्या ज्या धर्माच्या राजांनी भारतवर्षात राज्य केले, ते ते धर्म येथे स्थिर झाले. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताच्या घटनेप्रमाणे राष्ट्राच्या एकसंघतेसाठी धर्मनिरपेक्ष भारत ओळखला जाऊ लागला. यामध्ये कोणत्याही धर्माच्या आचरणामुळे दुसऱ्या धर्माचा अधिक्षेप होऊ नये म्हणून सर्व व्यक्तींचे समाजहित पाहणे आवश्यक होते. व्यक्तीचे हित जसे महत्त्वाचे तसेच किंबहुना अधिक महत्त्व राष्ट्राच्या हिताला दिले पाहिजे. राष्ट्रहितासाठी समाजातील सर्वच व्यक्तींनी आपापसातील दुजाभाव परस्पर वैर, जातिभेद, धर्मभेद, उच्चनीचता किंवा व्यक्तिगत स्वार्थाच्या गोष्टी दूर ठेवल्या पाहिजेत.



'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत' या केशवसुतांच्या कवितेत वर्णन केल्याप्रमाणे राष्ट्रातील आम्ही सर्वच कोणत्याही धर्माचे असलो तरी, विविध जातींचे असलो तरी परस्परांचे बंधू आहोत. सर्वांचे हित जपणे हेच आमचे आद्यकर्तव्य आहे. विशिष्ट जातीचा, धर्माचा अभिमान बाळगून दुसऱ्या धर्माच्या, जातीच्या लोकांना हीन लेखू नये. कुणाचे वैर करू नये.

धार्मिक श्रद्धा, विचार, आचार आणि प्रचार यांचे भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य आहे. मात्र शांतता व सुव्यवस्था, आरोग्य आणि नीतिमत्ता यांच्या संरक्षणासाठी धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा हक्कही घटनेने शासनाला दिला आहे. मिरवणुकांच्या कारणांवरून काही धर्मांमधील ताणतणाव, काही समाजांची अन्यायाच्या कारणाने होणारी चळवळ,काहींचे अडाणी, अज्ञानी गरिबांना धर्मांतरित करण्याचे प्रयत्न हे सर्वधर्मसमभावाला बाधक ठरतात. एखाद्या जातीच्या किंवा धर्माच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी हिंसक कारवाया करणे, संप, मोर्चे, आंदोलने, मालमत्तेचा विध्वंस करणे यासाठी राजकारणी लोक तत्पर असतात. सामान्यतः अपरिपक्व विद्यार्थ्यांना हाताशी धरून अशी दुष्कृत्ये घडत असतात. त्यामुळे समाजात असंतोष पसरतो. विद्यार्थ्यांनी प्रथमतः आपले विद्यार्जन मनापासून

आपला देश बहुतांशी खेड्यात वसलेला आहे. बराचसा ग्रामीण भाग हा तसाच शिक्षणापासून वंचित राहिलेला आहे. कुठे चौथ्या वर्गापर्यंत शाळा आहेत, कुठे मॅट्रिकपर्यंत. काही ठिकाणी तर चौथ्या वर्गापर्यंतच्या शाळा एकशिक्षकी सुरू आहेत. अशा भागातील बरेच विद्यार्थी चौथीपुढे सरकत नाहीत. काही मॅट्रिकला गळतात. गळणाऱ्या विद्यार्थ्यांची किंवा नापास होण्याऱ्या विद्यार्थ्यांची त्यामागची कारणे बघितल्यास लक्षात येते की त्यांना इंग्रजी हा विषय झेपत नाही. उच्चशिक्षणातील बऱ्याच शाखा ह्या इंग्रजी माध्यमाच्याच आहेत. एकतर परकी भाषा असल्याने ती अवगत करणे विद्यार्थ्यांना कठीण जाते. दुसरे म्हणजे अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सुदृढतेची गरज असते. मातृभाषेकडे पाठ फिरवून इंग्रजी माध्यमाचा स्वीकार करून विद्यालये आणि विद्यापीठे चालवणे म्हणजे भांडवलीशाहीचाच उदोउदो करणे होय. हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी द्रोह ठरणार आहे. मोजक्या उच्च पातळीवरील आणि आर्थिकदृष्ट्या सुदृढ अशा शहरी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ह्या योजना आहेत. बहुसंख्य ग्रामीण विद्यार्थ्यांचे मात्र हाल आहेत. एकीकडे श्रीमंतांची इंग्रजीचे कौतुक करणारी संस्कृती तर दुसरीकडे ग्रामीण बहुजनांची मराठी संस्कृती असा नवा वाद पुढे येऊ लागला



त्यामुळे त्यांना राष्ट्रनिष्ठेपेक्षा, देशाच्या हितापेक्षा आपली जातधर्माची निष्ठा श्रेष्ठ वाटते. पूर्वी भारतीय समाजजीवनाचे प्रत्येक क्षेत्र धर्माधिष्ठित होते. त्यामुळे धर्मनिरपेक्ष पायावर समाजजीवनाची रचना करणाऱ्यांना सतत धार्मिक परंपरांविरुद्ध लढा द्यावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, राजा राममोहनराय आदी मागील शतकातील थोर पुढाऱ्यांनी समाजसुधारणांना अग्रक्रम दिला तो देशहिताच्या दृष्टीतूनच. समान समाजरचनेतून धर्मनिरपेक्ष लोकशाही निर्माण होऊ शकते. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी तयार केलेल्या राज्यघटनेत ध र्मनिरपेक्षतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे.

आज भारताने विकासाभिमुख पावले उचललेली आहेत. जीवनाच्या अनेक अंगांनी आपला विकास परिपूर्णतेच्या मार्गावर आहे, हे आपण दैनंदिन प्रगतीच्या आलेखावरून पाहू शकतो; परंतु शासनकर्तेही जर निवडणुकांच्या निमित्ताने जातीयता, धार्मिकता यांचा आधार घेऊन आपला स्वार्थ साधत असतील तर ते योग्य नाही. शासन आणि धर्म यांची फारकत होणे ही आजच्या काळात नितांत गरजेची बाब आहे. आपले अनेक पुढारी सांगत होते की मी प्रथम भारतीय आहे आणि त्यानंतरही कोणत्या धर्माचा किंवा कोणत्या जातीचा नसून भारतीयच आहे. या भारतात राहणारे

सर्व माझे बंधू आहेत. तेव्हा त्यांच्या हिताचे काम करणे हे आमचे आद्यकर्तव्य आहे. ह्या नेत्यांनी, त्यांच्या अनुयायांनी आणि एकूणच सर्व जनतेने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जोपासना केली पाहिजे. सार्वजनिक व्यवहारात धर्माचा हस्तक्षेप होऊ देता कामा नये. आपण सर्व एक आहोत, ही भावना उराशी बाळगून आपल्या विचारांना, आचारांना भेदभावाच्या, धर्मबंधनाच्या चौकटीतून मुक्त करण्याची गरज प्रकर्षाने निर्माण झाली आहे. अनेकतेतही एकता हे ब्रीद व्हायला हवे. धर्माची नव्हे तर राष्ट्रीयतेची भावना आपल्यामध्ये निर्माण होण्याची, प्रज्वलित होण्याची आवश्यकता आहे. धर्मच मानायचा असेल तर तो एकच - मानवतेचा. अन्यथा आम्ही फक्त भारतवासी आहोत, धर्मनिरपेक्ष आहोत, हे जगाला पटायला हवे, तेव्हाच 'माझा भारत महान' ही उक्ती अर्थपूर्ण ठरेल.

⦸⦸⦸

# ८. मातृभाषेचे महत्त्व



फार पूर्वी मनुष्य जेव्हा समूहाने राहू लागला, तेव्हापासूनच भाषा अस्तित्वात आली. स्थलकालपरत्वे भाषेची रूपे बदलत गेली. प्रारंभी बोलीरूपात असणारी भाषा कालांतराने लिखित स्वरूपात आली, लिपिबद्ध झाली. तिने विविध रूपे धारण केली. आपला आशय इतरांपर्यंत पोचविण्याचे महत्त्वाचे कार्य करणाऱ्या या भाषेने संस्कृतीचेही जतन केले.

भारत हा धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. येथे अनेक धर्मांची, अनेक जातींची माणसे राहतात. विविध धर्म, जातींच्या माणसांच्या भाषाही वेगवेगळ्या आहेत. काही केवळ बोलीस्वरूपात आहेत तर बऱ्याच भाषांची स्वतंत्र लिपी अस्तित्वात आहे. पहाडी आदीवासींसारख्या काही जमातींच्या भाषा मात्र अजूनही लिपिबद्ध झालेल्या नाहीत. पण भाषा विनिमयात त्यांना कधी अडचण जात नाही. त्यांच्या मातृभाषेत मौखिक स्वरूपात ते सर्व व्यवहार पार पाडतात.

स्वातंत्र्योत्तर काळात भाषेच्या कारणाने काही वाद उत्पन्न झाले. हे वाद कधीकधी डोके वर काढतात. ह्या वादांचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सामूहिक विचार करणे गरजेचे आहे. जगाच्या पातळीवर कधी कोणाला प्रश्न पडला नसेल, तो आज आपल्याला पडला आहे. आपल्या शिक्षणाचे माध्यम कोणते असावे?

त्याकरिता भरपूर पैसाही खर्च केला जातो. पुढे जर ते डॉक्टर किंवा इंजिनियर झाले तर त्याचा परिणाम काय होतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

मूल पाळण्यात असते, तेव्हा त्याच्या कानांवर अंगाईगीत पडते, ते त्याच्या आईच्या भाषेतूनच. प्रत्येक मुलाला बाळगुटीबरोबर मातृभाषाही मिळत असते. त्याचे पहिलवहिले शब्द, उच्चारणेही त्याच्या मातृभाषेतच असतात. तो विचारही मातृभाषेतच करतो. आपले बालहट्टही तो त्याच भाषेतून करतो. मायबोलीतून शिकताना तो सहज शिकत जातो. त्याला त्यात आनंद वाटतो. तो केवळ परीक्षार्थी न राहता ज्ञानार्थी होतो. त्याची भाषा, त्याचे व्याकरण, शब्दसंपदा यांवर तो प्रभुत्व मिळवू शकतो. मातृभाषा बालकांवर सुसंस्कार करते. या संस्कारांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलते, विकसित होते. पण परक्या भाषेत सगळेच उलटे चित्र दिसू शकते. आज मातृभाषेतून शिकून पुढे उच्चपदस्थ झालेली मंडळी मोजता येणार नाहीत, इतकी आहेत. तरीही त्यांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. त्यांनी प्रयत्नपूर्वक अभ्यास करून ती अवगत केली. त्याचप्रकारे ती अवगत करावी; पण तिचे गुलाम होऊ नये. आपल्या मातृभाषेचा अपमान करू नये.

यशवंतराव चव्हाणांनी 'थ्री लँग्वेज फॉर्म्युला' सुचवला होता. पहिली भाषा मातृभाषा, तिच्या जोडीला राष्ट्रभाषा हिंदी आणि तिसरी आंतरराष्ट्रीय



आहे. भांडवलशाहीचे गडगंज संपत्तीधारक ठेकेदार आणि मोलमजुरी करणारे, कष्ट करून सामान्य जीवन जगणारे असे दोन तट आता स्पष्ट दिसू लागले आहेत.

भारताचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. शेती करणारे शेतकरी आणि त्यांची मुले ग्रामीण भागात राहतात; पण कृषी विज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या बहुतेक महाविद्यालयांमध्ये माध्यम इंग्रजी आहे. १९६८–६९ साली अकोला येथे 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ' स्थापन झाले. त्यावेळी या विद्यापीठातून दिले जाणारे शिक्षण हे मराठी भाषेत असावे, अशी शासनाची, लोकप्रतिनिधींची अपेक्षा होती.विद्यापीठाच्या कायद्यात स्पष्ट म्हटले आहे, की विद्यापीठाने माध्यम म्हणून मराठीला उत्तेजन द्यावे. त्यापुढील पाच वर्षांत आवश्यक ती पुस्तके तयार करून द्यावीत; पण पुस्तके तयार झाली नाहीत. ही स्थिती अनेक विद्यापीठांत आढळते. शिकवणारे प्राध्यापक इंग्रजी माध्यमातून शिकलेले. तेव्हा ते मराठीत कसे शिकवणार? शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना, कृषितज्ज्ञांना तयार करणारे शिक्षण मातृभाषेतून न मिळाल्याने शेतीची आणि शेतकऱ्यांची दुरवस्था तशीच राहिली.

महाराष्ट्रात जनसामान्यांची भाषा ही मराठी आहे. यशवंतराव चव्हाण यांनी ही बाब जाणली होती. त्यांनी मराठी विद्यापीठाचे स्वप्न पाहिले होते. उच्चशिक्षण मातृभाषेतून असावे हा त्यांचा आग्रह होता.

प्रत्येक शाखेतील संशोधन मातृभाषेतून व्हावे, ही त्यांची इच्छा होती. बहुजनांना मुख्य प्रवाहात सामील करून घ्यायचे तर त्यांना ज्ञान अवगत झाले पाहिजे. हे ज्ञान कोणाची मक्तेदारी न राहता सामान्य जनांपर्यंत पोचवायचे तर त्याचे माध्यम हे मातृभाषाच असले पाहिजे. जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी लोकांना इंग्रजीचा गंधही नाही. तरी ते उच्चविद्याविभूषित होतात. त्यांच्या मातृभाषेत शिक्षण घेतात आणि ज्ञान, तंत्रज्ञानाच्या कुठल्याही क्षेत्रात जगात आघाडीवर राहतात. जगातील अनेक लहान लहान देशही त्यांच्याच मातृभाषेत शिक्षण घेतात, तीच भाषा बोलतात. त्यांना त्यांच्या मातृभाषेचा अभिमान आहे, तो भारतीय जनमानसात यावयास हवा.

पुष्कळदा असा आरोप केला जातो की मूलभूत पुस्तके, संशोधन हे इंग्रजीत आहे, ते नव्या पिढीला मातृभाषेत कसे शिकवावे? अनेक शब्दांना मराठी भाषेत पर्यायी शब्द नाहीत. याचाच अर्थ ते निर्माण करण्यात आपण असमर्थ ठरलो, असाच नव्हे काय? खरेतर नवनवीन शास्त्रीय शब्द निर्माण करणे कठीण नाही. त्याचप्रमाणे काही आंतरराष्ट्रीय पारिभाषिक शब्द त्याच स्वरूपात वापरले तरी काही बिघडणार नाही; पण मूळ अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही मातृभाषेत होणे गरजेचे आहे. इंग्रजी शब्दाला संस्कृतमधील पर्यायी शब्द वापरायला मराठी विज्ञान



परिषदेची मान्यता आहे, याची कितीतरी उदाहरणे सांगता येतील. निझामाच्या राजवटीत वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण उर्दू माध्यमातून घेणारे अनेक लोक होते. त्या काळात सार्वत्रिक शिक्षणाचे तेच माध्यम होते. त्या माध्यमातील शिक्षण घेतलेले अनेक यशस्वी डॉक्टर झाले. तेव्हा मराठी भाषेतून शिक्षण घेता येणार नाही, असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. मातृभाषेतून शिक्षण देणे हे आव्हान समजून जिद्दीने स्वतंत्र वाटा चोखाळणारे अभ्यासक या देशाला हवे आहेत. विज्ञानशाखेचे अकरावीपासून पुढील शिक्षण हे इंग्रजी माध्यमात असते. त्यामुळे तत्पूर्वी मराठी माध्यम असणारे विद्यार्थी सहसा विज्ञान शाखेकडे वळत नाहीत. दुसरीकडे आपल्या पाल्यांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखांकडे पाठवायचे ठरवून आरंभापासूनच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत त्यांना टाकणारे पालक पहायला मिळतात. ते बहुधा ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत किंवा श्रीमंतांनी काढलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकतात. ज्या वयात 'श्रीगणेशा' गिरवायचा, त्या वयात बालकांना ए, बी, सी, डी शिकावी लागते. बहुधा ही मुले पाठांतरावर शिकतात. खऱ्या अर्थाने ज्ञानी होत नाहीत. वस्तुतः बऱ्याच कुटुंबांमध्ये इंग्रजीचे वातावरण नसल्याने त्यांचे पाल्य या इंग्रजी शाळांमध्ये माघारतात आणि मग त्यांना पुढे आणण्याकरिता अनेक गैरप्रकार केले जातात.

समस्या दिसून येतात, त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्रिभाषा सूत्र स्वीकारून उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत या तीनही भाषांचा पुरस्कार व्हायला हवा; पण परकीय भाषा इंग्रजी कठीण असे समजून तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणे हेही अयोग्य ठरेल. ती आंतरराष्ट्रीय भाषा आहे, हे विसरता येणार नाही. दक्षिणेकडील लोकांनी हिंदीचा राग करण्यात त्यांचेच नुकसान आहे. ती आपली राष्ट्रभाषा आहे, याची जाणीव ठेवून त्यांनी ती कामापुरती तरी अवगत केली पाहिजे. पण ह्या सर्वांपेक्षा खऱ्या अर्थाने सशिक्षित, सुदृढ आणि संस्कारक्षम तसेच विद्वत्पूर्ण भारत घडवायचा असेल तर मातृभाषेतून शिक्षण देणे गरजेचे आहे. राष्ट्राच्या विकासात भाषेचे महत्त्वाचे योगदान असते. ज्ञानाच्या कक्षा हृदयापर्यंत जाऊन भिडण्यासाठी शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हेच असायला हवे, याला पर्याय नाही.

⃠⃠⃠

# ९. लोकसंख्येचा भस्मासुर

लोकसंख्यावाढीच्या भीषण समस्येने आज काही देशांना ग्रासले आहे. भारत हा त्यापैकीच एक. लोकसंख्या नियंत्रणाच्या संदर्भात व्यापक प्रमाणात अभ्यास आणि उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. जगात लोकसंख्येचा अभ्यास पूर्वापार



भाषा इंग्रजी जी काही काळ तरी या देशात राहणे आवश्यक आहे. ते म्हणतात, 'मी इंग्रजी हटावोवाला नसून इंग्रजी पाहिजे म्हणणारा आहे. पण त्याचबरोबर मी हेही सांगू इच्छितो की आमच्या देशातले उच्च शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे.'

भारतात उत्तरेकडे इंग्रजीवर बहिष्कार टाकण्याची भाषा केली जाते, तर दक्षिणेत हिंदीला नाकारले जाते. असे भाषिक वेड विकासाला मारक ठरते. हे वेड दूर करून नाजुकतेने हा प्रश्न हाताळला गेला पाहिजे. म्हणूनच त्रिभाषा सूत्र या देशात आवश्यक झाले आहे.

मातृभाषेचे महत्त्व प्रतिपादन करणे किंवा मातृभाषेचा पुरस्कार करणे याचा अर्थ त्या देशाचा किंवा त्या प्रांताचा अभिमान बाळगणे असा नाही. देशातल्या शेवटच्या स्तरातला माणूस ज्ञानी बनला पाहिजे, तरच या देशाचा विकास शक्य होईल आणि शेवटच्या स्तरापर्यंत ज्ञान पोचवायचे असेल, तर ते परकीय भाषेत कसे शक्य होईल? ज्ञानाची भाषा ही मातृभाषा असेल तरच ते ज्ञान थेट सामान्य माणसापर्यंत जसेच्या तसे पोचेल. इंग्रज देश सोडून गेले आणि इंग्रजीही सोडून गेले; पण शेकडा चार टक्के लोकांना पुरेशी इंग्रजी येते. बाकीच्या शहाण्णव टक्के लोकांची शक्ती ही परकीय भाषा शिकण्यात खर्च होते आहे.

इंग्रजी ही ज्ञानभाषा बनली आहे आणि मातृभाषा ही दुर्लक्षित झाली आहे. त्यामुळे सामान्य लोकांपर्यंत खरे ज्ञान पोचू शकले नाही. मूठभर लोकांच्या हाती भाषेचे वर्चस्व राहिले, ज्ञानाची मालकी राहिली आणि सत्ताही राहिली तर त्यांचे विचार, त्यांचे संस्कार सामान्यांवर थोपविले जातील, हा एक फार मोठा धोका आहे.

तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी 'माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके' असे म्हणत जनसामान्यांना न समजणारी गीता मराठीत आणली. नाथांनीही समाजाचा विरोध सहन करून मातृभाषेत काव्यरचना करण्याचा आग्रह धरला. तुकोबांनी आपले परखड तत्वज्ञान मांडण्याकरिता सर्वांना समजेल अशी मातृभाषाच निवडली. खरेतर भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे आणि हे विचार परकीय भाषेत भाषांतर केल्याने प्रभाव पाडू शकत नाही, तर मातृभाषेतूनच ते प्रकट केले पाहिजेत, तेव्हाच ते जिवंत वाटतात.

जे महत्त्वाचे वाङ्मय अद्यापही इंग्रजीत आहे, ते मराठीत येणे गरजेचे आहे. पां.वा. गाडगीळांनी राजकारण, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान अशा विषयांवरील इंग्रजी वाङ्मय मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. मार्क्सचा 'कॅपिटल' हा गुंतागुंतीचा ग्रंथ, जो इंग्रजीतसुद्धा सहज समजत नाही, तो गाडगीळांनी



मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. आज खेड्यातला कार्यकर्तासुद्धा मार्क्सवादावर आणि समाजवादावर शेतकऱ्यांना समजेल, इतक्या सोप्या भाषेत व्याख्याने देतो. अशा शास्त्रीय साहित्याला मातृभाषेत रूपांतरित अथवा भाषांतरित करण्याचे आव्हान विद्वानांनी स्वीकारले पाहिजे.

सरकारी कचेऱ्या, कोर्ट यांमधूनसुद्धा मातृभाषेतून व्यवहार झाले पाहिजे. सामान्य माणसांचाही कोर्टाशी संबंध येतो. परकीय भाषेत त्यांना न्याय समजत नाही. म्हणून तेथेही मातृभाषेतून व्यवहार होण्याची गरज आहे. मराठी भाषा राजभाषा झाली ती १९६० मध्ये; पण आजही तिला हवा तो मान मिळालेला नाही. तिला ज्ञानमंदिरात मानाचे स्थान मिळणे, हे आवश्यक झाले आहे.

आपल्याला जखम झाली किंवा लागले की आपण 'आई गं' असे म्हणतो. अशा आपल्या मनातील भावना आपल्या मायबोलीतूनच बाहेर पडतात. म्हणूनच मातृभाषा ही मातेप्रमाणे, मातृभूमीप्रमाणे प्रिय, वंदनीय व महत्त्वाची ठरते. 'भाषा लक्ष शिका, परी सतत द्या लक्ष स्वभाषेकडे' ही आर्या केवळ गुणगुणण्यापुरती मर्यादित न ठेवता आचरणात आणणे आवश्यक झाले आहे.

एकंदरीत, भारतात भाषेसंबंधी ज्या

मोठ्या प्रमाणात झुकते माप देण्यात आले आहे. अशा अवस्थेत नैराश्याकडे झुकणारा ग्रामीण समाज शिक्षणापासून वंचित राहतो आहे. देशातील अनेक समस्यांची त्याला जाण नाही; आणि असल्यास या समस्यांशी आपले काही घेणे देणे नाही, अशी वृत्ती त्याच्यामध्ये निर्माण होऊ लागली आहे. भारतात हरितक्रांती झाली; पण सामान्य माणूस सामान्यच राहिला. वाढती लोकसंख्या सोबत 'टंचाई' घेऊन येतच राहिली.

भारतातील लोकसंख्यावाढीची प्रमुख कारणे म्हणजे येथील हवामान, आर्थिक स्थिती, सामाजिक व धार्मिक कारणे, अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव, रूढी, परंपरा व वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन होय. भारत उष्णकटीबंधीय प्रदेश असल्यामुळे मुले-मुली लवकर वयात येतात. विवाह लवकर होतात. संतती उत्पादनाकरिता जास्त काळ मिळतो. त्यामुळे जन्मदर वाढतो. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबात मुले जन्माला घालून हाताशी कामाला येतील व उत्पन्न वाढेल ही भोळी आशा ठेवून अधिक अपत्ये जन्माला घातली जातात. काही ठिकाणी, काही समाजात अजूनही कायदे मोडून बालविवाह केले जातात. परिणामी मातृत्वाचा काळ अधिक मिळणाऱ्या ह्या मुली अधिक अपत्यांना जन्म देतात. धार्मिक दृष्टिकोनातून प्रत्येकाने संतती



होत आला आहे. मात्र एक समस्या म्हणून अठराव्या शतकापासून अभ्यासकांचे लक्ष त्याकडे वेधले आहे. लोकसंख्येचा विचार माल्थसपूर्वी प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी केलेला आढळतो. प्रत्येक शहरात लोकसंख्या किती असावी, या दृष्टीने विचार मांडले गेले. माल्थसने लोकसंख्येच्या तत्त्वावरील प्रबंध १७९८ मध्ये प्रसिद्ध केला. कोणत्याही प्रकारचे प्रतिबंधक उपाय न योजल्यास प्रत्येक २४ वर्षांनी लोकसंख्या दुप्पट होते. परंतु लोकसंख्येच्या तुलनेत जमीन व अन्नधान्याची उपलब्ध ाता जर झाली नाही, तर गंभीर समस्या निर्माण होत जाते.

भारताची पहिली जनगणना १८७१ साली झाली. १९७१ मध्ये जगाची लोकसंख्या ३७१ कोटी आणि भारताची ५४.८२ कोटी होती. जागतिक क्षेत्रफळाच्या २.४ टक्के भारताचे क्षेत्रफळ आहे आणि जागतिक लोकसंख्येच्या १६.१ टक्के लोकसंख्या भारतात आहे. अन्नधान्याचे उत्पादन मात्र जगाच्या तुलनेत केवळ १०.४ टक्के आहे. १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या २३.८ कोटी होती. ती १९९१ मध्ये ८४.४ कोटी झाली आणि आज १०५ कोटींच्या घरात आहे. लोकसंख्या वाढली मात्र अन्नधान्याचे उत्पादन मात्र त्या प्रमाणात वाढले नाही. या आकडेवारीवरून भारतात लोकसंख्यावाढ ही किती भीषण समस्या झालेली

आहे, याची कल्पना येते.

जागतिक पातळीवर विचार केल्यास भारताची लोकसंख्या ही दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोकसंख्येच्या बाबतीत चीनच्या खालोखाल भारताचा क्रमांक लागतो. जगातील लोकसंख्येत दर दहा माणसांमागे एक भारतीय माणूस इतकी आपली लोकसंख्या आहे. आज भारताने १०५ कोटींचा आकडा पार केला आहे. दर दहा वर्षांनी होणाऱ्या जनगणनेच्या आकडेवारीत झपाट्याने वाढ होते आहे. ही वाढ रोखण्याकरिता प्रभावी उपाय न केल्यास तर लवकरच चीनला मागे टाकून भारत सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जाईल. या लोकसंख्या स्फोटामुळे संपूर्ण भारतात अंदाधुंदी माजली आहे, गोंधळ निर्माण झाला आहे. लोकसंख्येच्या भस्मासुराचा विळखा वाढतोच आहे. त्याच्या दुष्परिणामांची जाणीव जोपर्यंत या देशातील प्रत्येक नागरिकाला होणार नाही, तोपर्यंत हा भस्मासुर येथे अस्तित्वात राहील आणि असंख्य समस्यांना जन्म घालत राहील. त्यातून संपूर्ण मानवजातच नष्ट होईल की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.

आज भारताच्या शेजारील राष्ट्रांमधून भारतात स्थलांतरित झालेल्यांची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे इथल्या लोकसंख्येत भर पडली आणि या वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पादनाच्या तुलनेने मागणी



वाढत गेली. उत्पादन आणि लोकांची मागणी किंवा गरज यांचा मेळ जमला नाही. जवळपास अर्धी जनता ही उत्पादनक्षम तर अर्धी जनता ही परावलंबी आहे. कार्य करणारे किंवा उत्पादननिर्मितीची शक्ती असणारे आणि अकार्यक्षम यांचे प्रमाण सारखेच झाले आहे. त्यामुळे आपल्या मूलभूत गरजा - अन्न, वस्त्र व निवारा यांची कमतरता भासू लागली आहे. वाढती लोकसंख्या पाणी व जमीन यांचा अभाव निर्माण करते. त्यातून बेरोजगारी, दारिद्र्य, निरक्षरता, प्रदूषण, कर्जबाजारीपणा, नैराश्य इत्यादी अपत्ये जन्माला आली आहेत.

वरवर लोकशाही दिसत असली, तरी भांडवलशाहीची पाळेमुळे अजूनही घट्ट रोवलेली आहेत. गरिबांचे, कष्टकऱ्यांचे शोषण सुरूच आहे. ग्रामीण स्तरापर्यंत केंद्रातून पाठविलेला रुपया पोचेपर्यंत काही पैशांमध्येच उरतो. एकीकडे चैनीत जगणारा शहरी भाग सर्वच सोयीसुविधांनी युक्त असलेला आणि दुसरीकडे उपाशीपोटी अनेक समस्यांना तोंड देत जगणारा ग्रामीण भाग या तफावतीमुळे लोकांच्या झुंडी ग्रामीण भागातून शहराकडे झेपावत आहेत. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या अधिक असली तरी लोकसंख्येची घनता ही मोठ्या शहरांतच जास्त आहे. शुद्ध पाणी, वीज, दळणवळणाच्या सुविधा अशा सगळ्या बाबतीत ग्रामीण भागाच्या तुलनेने शहरी भागाला फार

आहेत. दैनंदिन जीवनपयोगी वस्तूंच्या उत्पादनासाठी जागोजागी कारखाने उभारले गेले आहेत. त्यातून दिवसाकाठी प्रचंड प्रमाणात विषारी वायू आणि द्रव्ये बाहेर सोडली जातात. स्वार्थासाठी माणसाने पर्यावरण संतुलन बिघडवून टाकले आहे. निर्जीव, सजीव, हवा, पाणी, जमीन अशा सगळ्यांवरच याचा विपरित परिणाम होत आहे. लोकसंख्या नियंत्रण केले नाही तर येत्या काही वर्षांतच प्राणवायूही मिळणार नाही. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात गरजांची पूर्ती होणार नाही. आणि एक दिवस अखिल मानवजात नष्ट होईल. हे सगळं केवळ वाढत्या लोकसंख्येमुळे घडणार आहे. म्हणूनच लोकसंख्या नियंत्रण ही काळाची गरज ठरली आहे.

लोकसंख्या कमी करण्याकरिता काही उपाय करता येतील. कुटुंब नियोजन, शिक्षणातून समाजपरिवर्तन, विवाहाचे योग्य वय व स्त्री जागृती, स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचे प्रयत्न, सामाजिक परंपरा, रूढी व अंधश्रद्धांचे निर्मूलन हे प्रमुख उपाय



निर्माण केली पाहिजे, हा जुना संकेतही लोकसंख्यावाढीस कारणीभूत ठरतो.

वंशाला दिवा हवा ही अंधश्रद्धा बाळगून अनेक मुलींना जन्म घालणारे अशिक्षित व काही सुशिक्षित मायबापही या देशात आढळतात. मुलगा मरून गेला तर कसे, असा प्रश्न करून कुटुंब नियोजनापासून दूर राहणारे, काही कुटुंब नियोजनाला पाप मानणारेही महाभाग आहेत. ही समस्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत आढळते. ग्रामीण भागात कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी नीट होत नसल्यामुळे ही समस्या अधिक व्यापक झालेली आहे. कमावणारे हात कमी आणि खाणारे जास्त यामुळे गरिबी वाढते आहे.

ज्ञानाची क्षितिजे रूंदावत गेली. नवे शोध लागत गेले. वैद्यकीय क्षेत्रात क्रांती झाली. नवीन औषधे निर्माण झाली. बालमृत्यू रोखण्यात यश आले. अपमृत्यूचे प्रमाण कमी झाले. साहजिकच आयुमर्यादा वाढली आणि वैद्यकीय क्षेत्रातील क्रांतीचे वरदान शाप ठरेल की काय, असे वाटू लागले. नवनवीन तंत्रज्ञानातून फायदे तर झाले; पण लोकसंख्यावाढीचा धोकाही निर्माण झाला. वयोमर्यादा वाढली. मृत्यूचे प्रमाण घटले; पण जन्मदर कमी करण्यासाठी या तंत्रज्ञानाला हवे तितके यश आले नाही. जननप्रमाणावर नियंत्रण ठेवता न

आल्याने मृत्युदर कमी आणि जन्मदर वाढता राहिला. वैद्यकीय क्षेत्राने क्रांती केली असली, तरी जनमानसाच्या विचारांमध्ये पुरेशी क्रांती होऊ शकली नाही.

मुख्यत्वेकरून अतिरिक्त लोकसंख्येचे जे दुष्परिणाम होतात, ते म्हणजे निम्न राहणीमान, अन्न, वस्त्र, निवाऱ्याची कमतरता, शिक्षण, औषधे व मनोरंजनाची कमी किंवा अडचणी, हवा व पाण्याचे प्रदूषण हे होत. लोकसंख्यावाढीने राष्ट्रीय उत्पन्न वाढलेले नाही. दरडोई उत्पन्नही कमीच आहे. त्याचा अन्न, वस्त्र निवासाच्या सोयीसुविधांवर परिणाम होतो आहे. त्यांची कमतरता भासू लागली आहे. राहणीमान घसरत चालले आहे. घरातील सदस्यांची संख्या वाढलेली व उत्पन्न कमी किंवा कमावणारे हात कमी या कारणाने मुलांच्या शिक्षण, औषधोपचार व मनोरंजनाच्या सोयीसुविधांवर कात्री चालू लागली आहे. हे खर्च परवडेनासे झाल्याने मोठ्या कुटुंबांचे हाल होत आहेत. समस्या वाढत्या असल्याने शिक्षणावर लक्ष केंद्रित होत नाही व पुढची पिढीही प्रगती करू शकत नाही. डॉक्टरांची फी किंवा महागडी औषधे खरेदी करणे हे या कुटुंबांना अशक्य होत असल्याने सरकारी डॉक्टर व रुग्णालयांवर ते अवलंबून राहतात. तेथे योग्यप्रकारे उपचार न मिळाल्याने आरोग्याची समस्या अधिकाधिक गंभीर होत चालली आहे. मूलभूत सोयींचीच जेथे



पूर्तता होत नाही, तेथे मनोरंजनाची अपेक्षा काय करणार? मनोरंजन नाही, मानसिक विकास नाही, शारीरिक तर नाहीच; या कारणांनी अधिक मुले असणाऱ्या व आर्थिक स्थिती पर्याप्त नसलेल्या कुटुंबातील मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळण्याची दाट शक्यता असते. लोकसंख्यावाढीने हे युग स्पर्धेचे झाले आहे. शिक्षण घेतल्यानंतर आर्थिकतेचे साधन उपलब्ध झाले नाही तर तरुणांमध्ये नैराश्य उत्पन्न होते. नकळत गुन्हेगारी क्षेत्रात पाऊल टाकण्यास तरुण प्रवृत्त होतात. लुटमार, दरोडे, फसवेगिरी, बुवाबाजी, अपहरण यांसारखी प्रकरणे नित्याची होतात. काही वेळा आत्महत्येचा मार्ग स्वीकारला जातो. गरिबीमुळे शौचालये, स्नानगृहे यांची निर्मिती घरोघरी होत नाही. लहान लहान घरे, तेथे अनेकांचे राहणे, पाळीव प्राणी असल्यास त्यांचीही तेथेच व्यवस्था, उजेडाची पुरेशी सोय नसणे, मोकळी हवा नसणे, मलमूत्र त्याच परिसरात साचून राहणे या कारणांनी आरोग्यावर फार मोठा परिणाम होतो. डास, कीटक यांची निर्मिती होते. रोगराई फैलते आणि याहीपेक्षा त्या परिसरातील विहिरींसारख्या जलस्रोतांमध्ये आणि वातावरणामध्ये प्रदूषण निर्माण होत जाते, ज्यामुळे रोगांचा प्रसार आणखी सपाट्याने होतो व वारंवार आपला विळखा घालत राहतो.

आज निवासासाठी जंगले उजाड झाली

कैकेयी युद्धशास्त्रात कुशल होती.

पुरुषाची अर्धांगिनी म्हणून स्त्रीकडे बघितले गेले, तरी तिला पुरुषाच्या बरोबरीने कधीच वागू दिले गेले नाही. 'चूल आणि मूल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र. परिणामी ती शिक्षणापासून कायम दूर राहिली. पुरुषाने बाहेरची काम करायची आणि स्त्रीने चार भिंतींच्या आड राहून प्रपंच सांभाळायचा. सगळ्या गोष्टी पुरुषांवर अवलंबून. त्याची मर्जी तिने सांभाळायची. थोडक्यात काय तर स्त्रीला पुरुषाची गुलाम म्हणून जगावे लागत होते.

भारतात इंग्रजी राजवट आली आणि स्त्री जीवनाला गुलामगिरीतून बाहेर पडण्याच्या वाटा मोकळ्या होऊ लागल्या. प्रचंड विरोध होऊनही हळूहळू स्त्री शिक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. इंग्रजांच्या या मताशी सहमत असलेल्या सुधारणावादी भारतीयांनीही स्त्री शिक्षणावर जोर दिला आणि 'अबला'कडून 'सबला'कडे असा स्त्रीचा प्रवास सुरू झाला. दुरचित्रवाणीवरून एक जाहिरात दाखवली जाते. त्यात एका छोट्याशा बालिकेच्या तोंडाला चिकटपट्टी लावलेली असते. तिचे हातपाय बांधलेले असतात. तिचे वडील तिथे येतात आणि तिच्या तोंडावरची पट्टी काढतात व हातापायाची दोरी सोडून तिला मोकळी करतात. बंध नमुक्त करतात. स्त्रीमुक्तीचे हे प्रतीक आहे. आज



आहेत. या उपायांनुसार दोन अपत्यांपेक्षा अधिक अपत्यांना जन्म देता कामा नये. सक्तीने कुटुंबनियोजन केले गेले पाहिजे. सर्व धर्मांकरिता हा कायदा लागू व्हावा. कुटुंबनियोजनाच्या सुसज्ज अशा संस्थांची, आरोग्य केंद्रांची शहरांपासून खेडोपाडी निर्मिती व्हावी. तज्ज्ञांची तेथे नेमणूक व्हावी. साक्षरतेचा प्रसार तर व्हावाच; शिक्षणात लोकसंख्या शिक्षण, कुटुंबनियोजन यांचाही समावेश व्हावा. याकरिता दूरचित्रवाणी, आकाशवाणी या माध्यमांद्वारे माहितीपट अथवा जाहिरातींचा उपयोग करावा. पोस्टर्स लावावीत, लहान लहान पुस्तिकांचे वितरण केले जावे. पथनाट्ये अथवा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन व्हावे. विवाहाचे वय वाढविले जावे. या संदर्भातील कायदे पाळले जावेत. विवाहपूर्व स्त्री जागृती शिबिरे घेतली जावीत. स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढावयास हवा. त्यांना प्रत्येक क्षेत्रात काम करण्याची संधी दिली पाहिजे. एक स्त्री सुशिक्षित झाली तर सूंपर्ण कुटुंब सुशिक्षित होते, याचा विसर पडता कामा नये. अंधश्रद्धा व पूर्वापार चालत आलेल्या चुकीच्या परंपरा, रूढी यांपासून समाजाचे मन वळविण्याकरिता प्रयत्न केले जावेत.

एकंदरीत लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या समस्या निवारण करण्याकरिता जन्मदर नियंत्रित व्हायला हवा. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्येचा मेळ

घातला गेला पाहिजे. बाहेरून आलेल्या निर्वासितांना परत पाठविले पाहिजे. ग्रामीण भागातला माणूस ग्रामीण भागातच राहावा, यासाठी तेथे त्याला सर्व सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत. नोकऱ्या असोत किंवा कारखाने किंवा उत्पादनाच्या यंत्रणा या सर्वांची विभागणी ग्रामीण आणि शहरात सारखी व्हायला हवी. प्रत्येकाला काम मिळायला हवे, या हेतूने जनसंख्यावाढ रोखायला हवी. त्यावर नियंत्रण अत्यावश्यक झाले आहे. कुटुंबनियोजनाच्या सोयीसुविधा व माहिती खेड्यापाड्यांतही पोचली पाहिजे. वंशाला दिवा हवा, यासारख्या रूढीपरंपरांपासून माणसाला मुक्त होणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या भीषण समस्येविषयी संपूर्ण देशभरात जनजागृती करणे निकडीचे आहे. कायदे करून काही होणार नाही. समाजप्रबोधनातून समाजपरिवर्तन करणे गरजेचे आहे. सरासरी आयुर्मान कमी करणे शक्य नाही. जन्माचे प्रमाण कमी करणे, हे मात्र आपल्या हातात आहे. समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्राच्या तज्ज्ञ लेखिका इरावती कर्वे यांनी तर अत्यंत विद्रोही विचार मांडून काहींना जन्मालाच घालू नये आणि काहींना पन्नास वर्षांपर्यंत नाहीसे करावे, असे सांगितले आहे. योजनाबद्ध रीतीने चिठ्ठ्या काढून किंवा गुप्तरीतीने पन्नाशी गाठलेल्यांचे प्रत्येकाचे नंबर काढून त्यांना त्या त्या वर्षात लस टोचून किंवा



औषध देऊन किंवा काही खायलाप्यायला देऊन संपविण्याचा भयंकर उपाय त्यांनी सुचविला आहे. हा उपाय जरी स्वीकारणे शक्य नसले, तरी शहरापासून खेड्यांपर्यंत जनजागृती करून जन्मदर कमी करता येईल. लोकसंख्येच्या भस्मासुराला आपणच भस्म करून टाकू; पण त्याकरिता प्रामाणिकपणे हे कार्य करण्याची तयारी या देशातील प्रत्येक नागरिकाची असायला हवी.

⃠⃠⃠

## १०. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व

'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' असे सांगून मनूने स्त्रियांवर फार मोठा अन्याय केला. पुराणकालीन सनातन, कर्मठ संस्कृतीमुळे स्त्रीचे स्वातंत्र्य नाहीसे होऊन ती परावलंबी झाली. तिच्या जन्मजात अधिकारांपासून तिला वंचित ठेवण्यात आले. अतिशूद्र म्हणूनच तिच्याकडे बघितले गेले. बालपणी पित्याच्या, यौवनात पतीच्या आणि वृद्धापकालात पुत्राच्या सहाऱ्याने तिने जीवन जगले पाहिजे, असाच संकेत रूढ झाला. मात्र फार पूर्वीची स्त्री वेदशास्त्रसंपन्न होती. तिला शिक्षणाचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी, आपाला, लीलावती यांच्यासारख्या अनेक स्त्रिया वेदशास्त्रपंडित होत्या. शस्त्रास्त्र चालविण्यातही स्त्रिया तरबेज होत्या.

पूर्वी अडाणीपणामुळे हुंड्यासारख्या घृणास्पद प्रथेतून हुंडाबळीही जात होते. काही सुशिक्षित, उच्चभ्रू समाजांतही हुंडा प्रतिष्ठेचा मानला जाई. गरिबीमुळे अनेक मुलींना हुंड्याअभावी म्हाताऱ्या, रोगी किंवा विधुर पुरुषाशी लग्न करावे लागे. पती मेला तर पत्नीने सती जायचे; पण पत्नी मेली तर पती दुसरे लग्न करायला मोकळा. स्त्रीच्या या भयंकर जिण्याला कारणीभूत तिचा अशिक्षितपणा होता.

स्त्री सुशिक्षित झाली तर ती आपल्या घरासाठी, समाजासाठी आणि राष्ट्रासाठीही कर्तव्यदक्ष राहू शकते. या संदर्भात पुरातनकाळापासून आजतागायत अनेक उदाहरणे देता येतील. शिक्षणामुळे स्त्रिया आपल्या जबाबदाऱ्या अधिक चांगल्याप्रकारे पार पाडू शकतात. पुरुषांपेक्षाही त्या अधिक कर्तव्यतत्पर व प्रामाणिक आहेत.

महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन राय, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक अशा महान समाजसुधारकांमुळे मुलींना, स्त्रियांना शिक्षण मिळू लागले. महात्मा फुल्यांनी आपल्या पत्नीला - सावित्रीबाईंना प्रथम शिकवले आणि पुण्यात भिड्यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. राजा राममोहन रॉय यांनी सतीची चाल बंद करवून घेतली. तसा कायदा करविला. लॉर्ड बेंटिंग यांचे सहकार्य घेऊन स्त्रीला पुढे आणण्यासाठी



आपल्या देशात स्त्रीला पुरुषांप्रमाणे समान हक्क दिले आहेत. स्त्रियांना मोफत शिक्षण, नोकरीत आरक्षण, संपत्तीचा वारसा हक्क देण्यात आला आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या काळात स्त्रियांना आपले छंद, ध्येय जोपासण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रोत्साहन मिळते आहे आणि त्यातून तिचा सर्वांगीण विकास घडून येतो आहे.

शहरी वातावरणापासून दूर किंवा काही विशिष्ट समाजात स्त्रियांना समान दर्जा किंवा हक्क अद्यापही मिळालेले नाहीत. तिच्या जागृतीकरिता स्त्रियांच्या संघटना, चळवळी निर्माण होत आहेत. त्यांना कायद्याचे ज्ञान दिले जात आहे. घटस्फोटित, परित्यक्ता, विधवा, निराधार स्त्रियांना सन्मानाने जगता यावे म्हणून मार्गदर्शन केले जात आहे.

एक पुरुष शिकला तर तो एकट्यापुरता शिकतो; पण एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते असे म्हणतात. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी' असे एक वचन आहे. जन्मलेल्या बालकाला कर्तृत्ववान पुरुष किंवा स्त्री बनविण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. आई जर सुशिक्षित, सुसंस्कारित असेल तर ती आपल्या मुलांनाही उत्तम नागरिक बनवू शकेल, चांगल्याप्रकारे घडवू शकेल. शिक्षणामुळे आजची स्त्री सर्वच क्षेत्रात धडाडीने पुढे जात आहे.

आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून ती यशाचे शिखर गाठते आहे. मुलाबाळांचे पालनपोषण अधिक चांगल्या रीतीने करण्यास ती समर्थ होते आहे. उद्याच्या पिढीची ती कर्णधार आहे. पाळण्याची दोरी ओढत राहणारी स्त्री वकील होऊन कोर्टात उभी आहे, डॉक्टर होऊन अनेकांचे प्राण वाचवत आहे. प्रशासकीय अधिकारी झालेली आहे. रेल्वे इंजिनिअर होऊन राष्ट्रविकासात हातभार लावत आहे. रेल्वेचे इंजिन चालवते आहे. विमान उडवते आहे. गिर्यारोहण करते आहे. खेळांचे मैदान गाजवते आहे; एवढेच काय तर अंतराळात सफरही करते आहे. हा एवढा प्रचंड बदल कालच्या आणि आजच्या स्त्रीमध्ये कुठून आला? शिक्षण हेच त्यामागचे कारण नाही का?

देश पारतंत्र्यात होता, तेव्हा गांधीजींसारख्या नेत्यांनी स्त्रियांमधील साहसाला जागृत केले. त्यांचा आत्मविश्वास जागृत केला आणि स्त्रिया स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी झाल्या. त्यांनी लाठीमार सहन केला, उपवास केले, तुरुंगातही गेल्या. या सगळ्यांच्या लढ्यामुळे देश स्वतंत्र झाला. शिक्षण मग ते पुस्तकी असो किंवा देशप्रेमाच्या धड्यांचे असो, ते सारखेच महत्त्वाचे ठरते.

स्त्री अशिक्षित होती, तेव्हा तिच्यावर अन्याय, अत्याचार मोठ्या प्रमाणावर होत होते.



बालपणीच तिचा विवाह व्हायचा. विवाह ठरविताना ती घरकाम किती करते, तिने कोणते घरगुती छंद व कला जोपासल्या आहेत, हे पाहिले जायचे. विवाहानंतर कला व छंद दुर्लक्षिले जात, घरकाम मात्र वाढत जायचे. अल्पवयात तिच्यावर मातृत्व लादले जायचे. संसारातील जबाबदाऱ्या, बाळंतपण, मुलांचे संगोपन यांमुळे ती चोवीस तास बांधली जात असे. मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अपरिपक्व असलेल्या या स्त्रीला स्वतःकडे लक्ष द्यायला कधी वेळच मिळाला नाही. माजघरात पडद्याआड राहणाऱ्या या स्त्रीला सतत दुय्यम दर्जाच देण्यात आला. तिच्या भावनांचा कधी विचारच झाला नाही. पुढे कुवत असूनही घरात बंदिस्त झाल्याने असंख्य स्त्रियांना बाहेरच्या जबाबदाऱ्या, पदे नाकारावी लागत. सार्वजनिक क्षेत्रात नावलौकिक मिळविण्यासाठी तिला संसारातील अतिरिक्त जबाबदाऱ्यांमधून जराशी मोकळीक मिळायला हवी. तिच्या गुणांना वाव मिळायला हवा. त्याकरिता शिक्षणापासून तिला दूर ठेवणे, मोठी चूकच ठरेल. आज पती-पत्नी दोघांनाही नोकरी किंवा व्यवसाय करण्याची आवश्यकता भासू लागली आहे. अर्थार्जनाकरिता स्त्रीलाही बाहेर पडावे लागते आहे. वास्तविक स्त्रीला नोकऱ्यांमध्ये आरक्षण, प्रसूतिरजा, स्तनपानरजा व अन्य सवलती देण्याचे कायदे आहेत; परंतु या कायद्यांचे ज्ञान तिला आहे का?

वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक जाहिरातींनी खचाखच भरलेले असतात. कधीकधी तर वाचनीय मजकुरापेक्षाही जाहिरातींचे प्रमाण त्यात अधिक असते. रेल्वे, बसगाड्या, त्यांची स्थानके, घरांच्या भिंती, झाडांचे बुंधो, रस्त्याच्या कडेला असणारे खांब, आकाशात सोडले जाणारे फुगे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट अशी सर्वच क्षेत्रे जाहिरातदारांनी काबीज केली आहेत; पण यातील सर्वच जाहिराती खऱ्या असतीलच असे नाही. काही भ्रामकही असतात. आकर्षक जाहिरातींना बळी पडून खरेदी करणाऱ्यांची संख्या या देशात कमी नाही. कधीकधी तर असं वाटतं की खरेदी करण्याच्या मोहाला ग्राहकांनी बळी पडावं, म्हणूनच जाहिरातींची निर्मिती केली जाते. कवी सुधाकर गायधनी म्हणतात,

'आम्ही चिंध्या पांघरून सोने विकायला बसलो
तर कोणी ढुंकूनही पाहीना
आणि सोने पांघरून चिंध्या विकल्या
तर गर्दी पेलता पेलवेना.'

जाहिरातींचंही असंच आहे. सहजपणे अगदी उत्तम माल कुणाला घ्या म्हटले, तर कुणी गिऱ्हाईक मिळत नाही आणि एखाद्या निकृष्ट मालाची आकर्षक जाहिरात केली, तर लगेच त्याला भरपूर मागणी येते. जाहिरातींसाठी लाखो रुपये खर्च करावे लागत असल्याने तो पैसा वसूल करण्यासाठी स्वस्तात



प्रयत्न केले.

आज स्त्री शिकली आहे. पुरुषांच्या तुलनेत ती कुठेही कमी पडत नाही. बाहेर ती नोकऱ्या, व्यवसाय करू लागली आणि त्याचबरोबर ती घरही सांभाळते आहे. या दोन्ही भूमिका पार पाडताना तिची जरा कुतरओढ होत असली तरी खंबीरपणे स्वतःच्या पायावर अभिमानाने उभी झाली आहे. स्वाभिमानाने जगते आहे.

शिक्षणक्षेत्रात तिने नावलौकिक मिळवला आहे. दहावी, बारावी, पदवी किंवा अन्य क्षेत्रातील परीक्षांमध्येही उत्तीर्ण होण्याचे प्रमाण आणि गुणवत्ता यादीत येण्याचे प्रमाण मुलांच्या तुलनेत मुलींचेच अधिक आहे. शिक्षिका, प्राध्यापिका, बँक अधिकारी या क्षेत्रांतही स्त्रियांचेच प्रमाण वाढते आहे. त्यात ती यशस्वीही झाली आहे. स्व. इंदिरा गांधींसारख्या स्त्रीने या देशाचे पंतप्रधानपदही भूषविले आहे. अनेक स्त्रिया मंत्रीही झाल्या आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वैमानिक, शास्त्रज्ञ, आ.ए.एस., आय.पी.एस. होणाऱ्या स्त्रियांचीही संख्या कमी नाही. कलेक्टर, तहसिलदार, पोलीस इंस्पेक्टर इत्यादी पदे भूषविणारी स्त्री आता संगणक क्षेत्र आणि सैनिकी क्षेत्रातही पोचली आहे. सुवर्णकन्या पी.टी. उषा, टेनिसपटू सानिया मिर्झांसारख्या कितीतरी स्त्रिया आता खेळांतही निपुण

झाल्या आहेत. कल्पना चावला, सुनीता विल्यम्ससारख्या स्त्रिया अंतराळातही झेपावल्या आहेत.

हा सगळा परिणाम स्त्री शिक्षणाचा आहे. स्त्री शिकली म्हणून पुढे गेली. स्वतःबरोबरच कुटुंबालाही तिने शिक्षित केले. तिच्या हक्कांची, अधिकारांची जाणीव तिला शिक्षणानेच करून दिली. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैवाहिक अशा प्रत्येक क्षेत्रातील पूर्वीची अन्यायकारक बंधने तोडून ती स्वावलंबी होऊन पुरुषसमान पातळीवर येऊन पोचली आहे. स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट करण्यास तिचे शिक्षणच उपयोगी ठरले आहे. एकंदरीत भारताला जगभरात नावलौकिक मिळवून देण्यासाठी, समाजोद्धारासाठी, प्रगतीसाठी स्त्री-शिक्षण अत्यंत गरजेचे झाले आहे. शिक्षणाने पुढे आलेल्या भारतीय स्त्रीचा जगभरात सन्मान केला जाईल आणि 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' हे सुभाषित प्रत्यक्षात येईल.

⃠⃠⃠

## ११. जाहिराती : किती भ्रामक? किती खऱ्या?

आजपर्यंत भारतीय संस्कृतीत चौसष्ट कला मानल्या जात होत्या; परंतु गेल्या काही वर्षांपासून एक पासष्टावी कला जन्माला आली आहे. त्या कलेचं



नाव आहे - जाहिरात. आज ही कला मानवी जीवनाचे एक आविभाज्य अंग होऊन बसली आहे.

तसे पाहिले तर जाहिरातींची प्रथा संपूर्णतः आधुनिक नाही. देवादिकांच्या काळातही थोड्याफार प्रमाणात जाहिरातबाजी ही होती. राजेमहाराजांच्या शौर्याची व पराक्रमाची जाहिरात करण्यासाठीच अश्वमेध यज्ञाचे आयोजन केले जाई. मुलीच्या स्वयंवरासाठी राजेमहाराजे इतर राजांना त्याकाळी निमंत्रणे पाठवीत असत. हासुद्धा जाहिरातीचाच एक प्रकार होता; पण त्याकाळात आजच्यासारखा जाहिरातींचा सुळसुळाट झाला नव्हता आणि त्यात भ्रामकताही नव्हती.

आज औद्योगिक आणि वैज्ञानिक प्रगतीमुळे साऱ्या जगातच जाहिरातबाजीला महत्त्व आले आहे. अगदी छोट्याशा टाचण्यांपासून तर भल्या मोठ्या इमारतींपर्यंत जाहिराती केल्या जातात. कोणत्याही मालाची आकर्षक जाहिरात केली की मालाचा हातोहात खप होतो, याची जाणीव उत्पादकांना झाली आहे. आतातर जाहिराती तयार करणाऱ्या कंपन्याही अस्तित्वात आल्या आहेत. अनेक विद्यापीठांमध्ये जाहिरातनिर्मिती प्रशिक्षणाचाही अंतर्भाव करण्यात आला आहे.

जाहिरातींच्या या युगात जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी कुठेही आपल्याला जाहिराती आढळतात.

त्या साबणाच्या कंपनीशी तो भांडला, तेव्हा कंपनीने सांगितले की 'कातडी सोलवटून काढण्याची आम्ही किंमत घेतलीच नाही. फक्त गोरे होण्यासाठी किंमत घेतली व तुम्ही कातडी सोलवटून का होईना, पण गोरे तर झालात ना?'

आजकाल स्मरणशक्ती वाढविण्यासाठी काही औषधे बाजारात मिळतात. असेच एक महोदय वाढत्या वयानुसार विसरभोळे होत चालले होते. त्यांनी हे स्मरणशक्ती वाढविण्याचे औषध घेण्यास प्रारंभ केला. त्यांना अनेकांनी सांगितले की औषधाने स्मरणशक्ती वाढविता येत नसते; पण त्यांना काही पटले नाही. सतत तीन महिने ते औषध घेतल्यावर त्यांची स्मरणशक्ती इतकी वाढली की आपण स्मरणशक्तीच्या औषधाची बाटली कुठे ठेवली आहे, हेच त्यांना स्मरेनासे झाले.

काही जाहिरातींमध्ये गॅरंटी दिली जाते. दीर्घकालीन गॅरंटी, वॉरंटी म्हणजे वस्तू चांगली, असे आपण समजतो; पण एखादे वेळी गॅरंटी पिरेडमध्येच ती वस्तू खराब होते व आपल्याच पैकी एखादा मनुष्य तावातावाने विक्रेत्याकडे जातो. विक्रेता पावती, गॅरंटीकार्ड वगैरे मागून घेतो व सांगतो की आम्ही कंपनीला कळवू. काही महिने जातात. ग्राहक विक्रेत्यांकडे चकरांवर चकरा मारतो. नंतर एक दिवस कंपनीतून



निर्माण होणाऱ्या वस्तूंच्याही किमती भरमसाठ वाढविल्या जातात. जनसामान्यांच्या हे लक्षात येत नाही. ते जाहिरातींना फसतच जातात.

जाहिरातीची कला ही मोठी गमतीदार आहे. आता कूलरचंच उदाहरण घ्या. आपल्या पूर्वजांनी कधीतरी विजेवर चालणारा कूलर वापरला नसेल; पण जाहिरातदार अशी जाहिरात करतात, की कूलर आणि तोही एखाद्या विशिष्ट कंपनीचा, आपल्याला किती जीवनावश्यक आहे आणि तो आपण वापरला नाही, तर आपल्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होईल. अशी जाहिरात पाहून अनेक लोक तो कूलर खरेदी करतात; पण इथे त्यांच्या लक्षात येत नाही की आपल्या पूर्वजांनी असे कूलर कधीही वापरले नाहीत आणि त्या काळात वीजही नव्हती. तरीही त्यांची प्रकृती आपल्यापेक्षा कितीतरी सुदृढ होती.

भ्रामक, फसव्या जाहिरातींमुळे अनेक सामान्य लोक फसले जातात, नाडले जातात. प्लॉटच्या, घरांच्या व्यवहारात हे प्रमाण अधिक आढळते. ग्राहक मंच चळवळीतून असे अनेक खटले जनतेपुढे येतात. खोट्या जाहिराती करणाऱ्यांना शिक्षा व दंडही केला जातो.

काही जाहिराती नीतिमत्तेला सोडून असतात. त्यातून लहान मुलांवर कुसंस्कार होऊ शकतात. त्यांच्या मनावर विपरीत परिणाम घडू शकतो.

कमी वयात भ्रम निर्माण करून मुलांच्या मनावर व जीवनावर दूरगामी परिणाम करणाऱ्या अशा जाहिरातींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

जाहिरातींची एक चांगली बाजूही आहे. हल्ली विवाहयोग्य वधुवरांच्या जाहिराती करण्याचं फॅड आहे. त्यामुळे निवडीसाठी मोठा वाव मिळतो. आपली पूर्ण माहिती व अपेक्षा जाहिरातीत दिल्या की योग्य जोडीदार मिळवणे सोपे जाते व माहितीविना मुली पाहण्याचे जे मोठमोठे कार्यक्रम पूर्वी आयोजित केले जायचे, भरमसाठ खर्च केला जायचा, त्याला आळा बसू लागला.

शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी ज्या जाहिराती निघतात, त्यातून शैक्षणिक संस्थांची वैशिष्ट्ये पाहून विद्यार्थी प्रवेशअर्ज भरतात व परिणामी शिक्षणाचा व गुणवत्तेचा दर्जा उंचावता येतो.

अशाच काही समाजोपयोगी जाहिराती प्रसारमाध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोचतात. जसे वनसंवर्धन, कुटुंबनियोजन, व्यसनमुक्ती, बालविवाह, बालविवाह प्रतिबंध, हरवलेल्या व्यक्तींविषयी तसेच चोर, डाकू यांच्या शोधासंबंधी, रक्तदानासंबंधी अशा जाहिरातींमुळे अनेक समस्या सुटू शकतात. अशा जाहिरातींत भ्रामकता नसते.

खरंतर आज चांगल्या मालाची



जाहिरात करून मालाचा खप वाढविणे, व्यापारी दृष्टिकोनातून अगदी आवश्यक झाले आहे. तयार झालेली वस्तू लोकोपयोगी कशी आहे, हे जनतेला कळण्यासाठी जाहिरात ही आवश्यक आहेच; पण ती ग्राहकांमध्ये भ्रामकता निर्माण करणारी नसावी.

एखादी खोटी जाहिरात असली व ती ग्राहकांपुढे वारंवार प्रसारित केली, तर कालांतराने ती ग्राहकांना खरी वाटू लागते. हिटलरचा ग्लोबेल्स नावाचा एक प्रचारमंत्री होता. तो हिटलरच्या भ्रामक नीतितत्त्वांचा असा काही प्रचार वारंवार करायचा की कालांतराने लोकांना त्याचे म्हणणे पटू लागे. आपल्याही देशात काही व्यक्तींना पुढेक आणण्यासाठी अशी प्रचारतंत्रे प्रयोगात आणली जातात. एखाद्याला पुढे आणणे, घडविणे किंवा खाली पाडणे, संपविणे हे आता जाहिरातीच ठरवू लागल्या आहेत.

सेल सेल म्हणायचे व आधीच वस्तूंच्या किमती तिप्पट वाढवून अर्ध्या कमी करायच्या व ग्राहकांना अर्ध्या किमतीत वस्तू मिळाल्याचे समाधान द्यायचे, ही व्यापारी नीती सामान्यांच्या लक्षात येत नाही.

एका साबणाची जाहिरात होती की तो वापरला की मनुष्य गोरा होतो. एका व्यक्तीने तो भरपूर फासला आणि त्याची कातडी सोलवटून निघाली.

घेऊन, महिला सबलीकरण वर्ष साजरे करून किंवा स्त्रीजागृती कार्यशाळा घेऊन तिच्या पुढ्यात उभ्या समस्या सुटणार नाहीत.

स्त्रीला स्वातंत्र्य मिळाले. ती सुशिक्षित झाली. पण तिचा स्वाभिमान आजही पायदळी तुडविला जातो. प्राचीन काळी अज्ञानी, अशिक्षित स्त्रीवर अन्याय झाले. तिला ते सहनही करावे लागले. ती अज्ञानापायी झालेली चूक होती. आज ज्ञान असूनही चुका होत आहेत. हे स्त्री जातीला आव्हान आहे. त्यात बदल घडवून आणणे जरुरी आहे. शतकानुशतके ज्या रूढीपरंपरांमध्ये अडकलेल्या समाजाने तिला बंदिस्त केले होते, त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी आज केवळ कायदे पुरेसे नाहीत. त्यासाठी जनजागृती होणे अत्यंत महत्त्वाची आहे.

एक वेळ जरी असे मानले, की सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैवाहिक, धार्मिक बाबतीत स्त्रीवर आजपर्यंत लादलेल्या अन्यायी विषमतेच्या विळख्यातून ती पूर्णतः बाहेर पडलेली आहे. रूढी, परंपरांच्या प्रवाहात आजवर प्रवाहपतीत बनलेली स्त्री प्रवाहाचे बांध फोडून मुक्त वातावरणात विहार करू लागली आहे. आजची स्त्री पुरुषावर अवलंबून नाही. त्यामुळे आज तिच्यावरची जबाबदारीही वाढली आहे; पण त्याचबरोबर अनेक समस्यांनी आजही तिला ग्रस्त



ती वस्तू दुरुस्त होऊन येते व त्याबरोबरच स्पेअरपार्ट बदलल्याचे अथवा सर्व्हिस चार्जेस अथवा ट्रान्सपोर्टींगचे भरमसाठ बिलही येते. ग्राहक वाद घालतो तेव्हा 'स्पेअर पार्टची गॅरंटी नाही, सर्व्हिस व ट्रान्सपोर्टींग चार्जेस ग्राहकाकडे' अशी गॅरंटीकार्डवर खाली बारीक अक्षरांत छापलेली सूचना त्याच्या निदर्शनास आणून दिली जाते. मग गॅरंटी नेमकी कशाची आहे, हा त्याचा भोळा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

टक्के म्हणजे शंभरात प्रमाण किती, या अर्थाने हा शब्द वापरला जातो. शंभर टक्के हा आकडा सर्वाधिक असतो. त्याचा अर्थ संपूर्ण असा गृहीत ध ारला जातो. पण काही जाहिरातींमध्ये एकशे वीस टक्के, एकशे पंचवीस टक्के अशा प्रमाणात शुद्धतेचा, शुभ्रतेचा वगैरे असा उल्लेख असतो. आता हे शंभराच्या वरील टक्केवारीचे गणित कसे काय, ते त्या जाहिरात करणाऱ्या गणिततज्ज्ञांनाच माहिती असेल.

आजचं युग हे जाहिरातींचं युग आहे. अगदी खाद्यपदार्थांपासून रोजच्या वापरातील वस्तू, चैनीच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधने, वैद्यकीय सोयीसुविधा, औद्योगिक यंत्रे एवढेच नव्हे तर नेत्यांची, वक्त्यांची भाषणे, सभा, नाटके, चित्रपट किंवा समाजोपयोगी अशा सगळ्याच प्रकारच्या जाहिराती आज आपल्याला सर्वत्र आढळतात. पण त्यातील खऱ्या कोणत्या आणि

भ्रामक कोणत्या हे ओळखणं फारच अवघड आहे. अनेकदा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय ते सांगताच येत नाही. जाहिरात ही जीवनाचे आवश्यक अंग झाली आहे, असे जरी मानले तरी त्यातील सत्यासत्यता तपासण्यासाठी एखादं प्रबळ असं सेन्सॉरबोर्ड निर्माण होणं गरजेचं आहे. ग्राहक मंच अथवा कंझ्युमर फोरमसारख्या संस्थांची निर्मिती झाली आहे; पण त्यांचे कार्य, अधिकार आणि कर्मचारी संख्या मर्यादित आहे. भ्रामक जाहिरातींना बळी पडून आपली होणारी फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक मनुष्याने आपली पूर्वानुभूती पडताळून व तर्कशक्ती पणाला लावून कोणत्या जाहिराती खऱ्या आहेत, कोणत्या भ्रामक हे ओळखायला स्वतःच शिकले पाहिजे.

⦸⦸⦸

## १२. स्त्रियांपुढील आव्हाने बदलते स्त्रीजीवन



महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजा राममोहन राय अशा अनेकांच्या अथक प्रयत्नांमुळे स्त्री शिकू लागली. साक्षर झाली, सुशिक्षित झाली आणि सुविद्यही झाली. आज तिने सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. पंतप्रधान, आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकारी, अंतराळवीर, गिर्यारोहक, खेळाडू अशी अनेक क्षेत्रे आणि पदे तिने पादाक्रांत केली आहेत.

प्राचीन काळातील भारतीय स्त्रियांच्या पार्श्वभूमीवर आजची भारतीय स्त्री नव्या रूपाने घडत आहे. वैज्ञानिक युगात जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत तिची कर्तबगारी गाजते आहे. चूल फुंकणारी व पाळण्याची दोरी हातात धरणारी स्त्री आज वकील म्हणून कोर्टात पक्षकाराची बाजू मांडते आहे. इंजिनिअर बनते आहे. रेल्वे इंजिन ड्रायव्हर, वैमानिक होते आहे. संगणक हाताळते आहे. सैन्यात जाते आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. आज बहुपत्नीत्व, सतीप्रथा, बालविवाह इत्यादी परंपरागत चुकीच्या चालीरीतींना कायद्याने प्रतिबंधा घातला गेला आहे. विधवाविवाहाला मान्यता दिली जात आहे. एकंदरीत स्त्रीच्या उत्कर्षाला प्रारंभ झाला आहे; पण दुर्भाग्याची गोष्ट अशी की, स्त्री-स्वातंत्र्याचा लढा अजूनही खऱ्या अर्थाने संपला नाही. तिच्यापुढील आव्हाने अजून संपलेली नाहीत. केवळ महिला मेळावे

नाकारणारे मातापिता या जगात आहेत. कायदे गुंडाळून पडद्याआड लिंगचाचणी आणि भ्रूणहत्या करणारे डॉक्टर्सही अस्तित्वात आहेत. मुलीच्या जन्माबद्दल अजूनही स्त्रीलाच जबाबदार धरले जाते. वंशाला दिवा हवा, म्हणून स्त्रीला वारंवार अपत्यांना जन्म द्यावा लागतो. काही समाजात आजही बालविवाह होतात. मुलींची लग्ने लवकर होतात. काही प्रांतांत पतीच्या निधनानंतर सती जाण्याची सक्ती केली जाते.

कायद्याने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे. शाळा, महाविद्यालये, सरकारी व निमसरकारी कार्यालये यांमधील नोकऱ्यांमध्ये स्त्रियांचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो आहे. लिपिक, शिक्षिका, बालसेविका, ग्रामसेविका अशा पदांवर ती आरुढ झालेली आहे. इंदिरा गांधींच्या रूपाने पहिली स्त्री पंतप्रधान या देशाने पाहिली. आज अनेक स्त्रिया मंत्रीपदावर आरूढ झाल्या आहेत. पण काही क्षेत्रांत स्त्रियांचे प्रमाण अत्यल्प आहे. कंडक्टर, पोलीस, रेल्वे इंजिन ड्रायव्हर, तहसिलदार, कलेक्टर, वैमानिक अशा क्षेत्रांत स्त्रियांचे धाडस कमी पडते आहे, असे वाटते. त्या दृष्टीने आता स्त्री पुढे आली पाहिजे. घरच्याचे प्रोत्साहन तिला मिळायला हवे. घरच्यांनी कामाच्या जबाबदाऱ्यांची वाटणी करावी. तिच्या लहान बाळांना सांभाळायला पाळणाघरे निर्माण होत आहेत. नोकरीच्या ठिकाणी



केले आहे. आज स्त्री-आरक्षण, विवाहितांच्या आत्महत्या, कुमारिकांच्या आत्महत्या, विवाहपूर्व जीवन आणि गुरगुरणारा हुंड्याचा कुत्रा ह्या नाना प्रकारच्या समस्यांमध्ये ती गुरफटली जात आहे. आज ह्या समस्या प्रश्नचिन्ह बनून आहेत. कारण त्या समस्या समाजात सारख्या रेंगाळत राहिल्या आहेत.

भारतात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत भारतीय स्त्री जीवन बंदिस्त होते. स्त्रीपुरुषांच्या कामाच्या कक्षा ठरलेल्या होत्या. पुरुष बाहेरची कामे करी व स्त्रीला घराच्या चार भिंतीआड राहून आपला प्रपंच करावा लागे. चूल आणि मूल हे तिचे कार्यक्षेत्र बनले होते. इंग्रजांचे साम्राज्य भारतीय स्त्रीला फलदायी ठरले. ब्रिटिशांच्या काळात युरोपीय संस्कृतीशी तिचा परिचय झाला व तिला दृष्टी प्राप्त झाली. स्वातंत्र्याची जाणीव झाली. शतकानुशतकांची गुलाम बनलेली, अबला म्हणून समजली गेलेली स्त्री जागी झाली. ती शिक्षणाकडे वळली. साहस तिच्या अंगी संचारले. आत्मविश्वास जागृत झाला. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीला तिच्या कर्तृत्वामुळे घटनेने आपोआपच समान दर्जा दिला. ती जशी जशी पुढे सरकत आहे, तसतशा तिच्या गरजा वाढल्या आहेत. स्वाभिमानी स्त्री म्हणून ती जगू पाहते आहे.

स्त्रीजीवनात कायद्याने किंवा नियमांनी

परिवर्तन घडवून आणले आहे. त्यामुळे स्त्री काही प्रमाणात सुरक्षित झाली आहे. मात्र पूर्ण सुरक्षितता तिला प्राप्त झालेली नाही. म्हणून स्त्री आरक्षणाची आजही गरज आहे. आरक्षण कुणाला दिले जाते? जिला संरक्षणाची आवश्यकता असते तिला. आपण स्त्रीपुरुष समान कायदा असूनही त्या कायद्याचे पालन करीत नाही. त्यामुळे आरक्षणाची गरज पडते. म्हणूनच स्त्रियांना पन्नास टक्के आरक्षण दिले गेले पाहिजे; पण स्त्री आरक्षणाचा कायदा संमत करायला संसदेला वर्षानुवर्षे लागतात, ही या देशाच्या लोकशाहीची शोकांतिका आहे.

आज स्त्रियांच्या संघटना बऱ्याच प्रमाणात जोर धरीत आहेत. निरनिराळी भगिनीमंडळे, महिला मंडळे आपापल्यापरीने स्त्रियांच्या कल्याणाची कामे करीत आहेत. परंतु पाश्चात्यांच्या तुलनेत या स्त्री संघटनांची प्रगती नगण्य आहे. कारण तिकडे तरुण स्त्रिया कामानिमित्त बाहेर पडू लागल्या तेव्हा त्यांच्या अडचणी, धोके, गरजा लक्षात घेऊन तेथील स्त्री संघटनांनी आवश्यक त्या सोयी भराभर केल्या. आपल्याकडेही स्त्रियांच्या अनेक अडचणींकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे. गरज संघटनांचीच आहे. स्त्री संघटनांची आंदोलने चौफेर पसरली पाहिजेत. स्वतः त्यांच्या ठिकाणी स्वयंभू नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. पूर्वीपेक्षा बऱ्याच प्रमाणात स्त्री आज जीवनाच्या



अनेक आघाड्यांवर यशस्वी होत आहे, अग्रेसर होत आहे. तथापि तिच्या कार्याला वेग येणे अत्यावश्यक झाले आहे.

आज अनेक मुलींना मनासारखं शिक्षण मिळत नाही. कसंबसं मिळालं तर नोकरी मिळत नाही. मग तिला लग्नाच्या बाजारात उभं केलं जातं. तिथेही हुंड्याशिवाय चांगला नवरा मिळत नाही. हुंडा पद्धतीचे प्रस्थ फार बोकाळले आहे. लाखो कोवळ्या, तरुण मुलींची आयुष्ये हुंड्याच्या मुळावर लटकत राहतात. ही समस्या आज भयानक रूप घेताना दिसते. ह्या हुंडा पद्धतीला जबाबदार कोण? 'हुंडा प्रतिबंधक कायदा' झाला तरीही गुपचूप हुंडा कसा घेतला जातो? काही समाजात तो प्रतिष्ठेचा मानला जातो. वरून नवविवाहितांना हुंड्यासाठी जाळण्यातही येते. कायदे बोथट झाले आहेत. कायद्यांनी कागदांची शोभा वाढली. हुंडा जिवंतच राहिला. एखादी रूढी काही कारणांनी जन्म घेते. तिचं विकृतीकरण होतं आणि एखादा रोग अंगात मुरावा तशी ती समाजाच्या रक्तात मुरते. तशी ही परिस्थिती आहे. आज हुंड्याचा राक्षस समूळ उपटणे गरजेचे झाले आहे.

विवाहानंतर अपत्यप्राप्तीसाठी स्त्रीचा छळ केला जातो. मुलगा व मुलगी यात फरक नाही, असे म्हटले जात असले, तरी आजही मुलीच्या जन्माला

राहत होता. त्याचे जीवन असुरक्षित होते. म्हणून तो समूह करून राहू लागला. हा समूह सुव्यवस्थित व सुखाचा राहावा म्हणून कुटुंबसंस्था उदयास आली. कुटुंबसंस्थेच्या विकासातून समूहाचा समाज बनला. पुढे या समाजाला 'राष्ट्र' नावाचे प्रतिष्ठित रूप प्राप्त झाले.

मनुष्याच्या सुखासाठी ज्या राष्ट्रीय कल्पनेची निर्मिती झाली, त्या राष्ट्राला एकात्मतेची गरज निर्माण झाली आहे. त्याच्या विकासाला अडथळे आणणाऱ्या प्रवृत्ती वेळोवेळी उफाळतात. त्यामुळे मानवी सुखशांतीचा हा विकसनक्रम खंडित होतो. तसा तो होणे ही मानवतेची भयानक हानी आहे. आज एकतेलाच आव्हान दिले जात आहे. एकाच भारतमातेची मुले परस्परांचा जीव घ्यायला उठली आहेत. परकीय आक्रमणाचा धोकाही वाढतो आहे.

भारत हे एकात्म राष्ट्र आहे. इतिहास याला साक्षी आहे. अनेक जाती, जमाती, विविध भाषा, वेगवेगळे प्रांत आणि निरनिराळे धर्म या विविध तेने भारत नटला आहे. एक भाषा, एक जात, एक ध र्म व एक पंथ असलेले राष्ट्र भिन्न कसे ठरेल? ते सर्वदृष्टींनी एक असेल; पण एकात्म असेलच असे नाही. भारताचे मात्र उलट आहे. भारतात भिन्न धर्म, भिन्न पंथ, भिन्न भाषा, भिन्न जाती आहेत. एका



स्त्रियांची वसतिगृहे दिसू लागली आहेत. या सर्व यंत्रणेचा योग्य उपयोग स्त्रीने करून घेण्याची आवश्यकता आहे.

काही स्त्रियांना अजूनही घरात डांबून ठेवणारे महाभाग आहेतच. स्त्रीचे श्रेष्ठत्व त्यांना मान्य होत नाही. स्त्रीला मानवतेच्या पातळीवरून स्वातंत्र्य हवे आहे. स्वाभिमान जागृत ठेवून आत्मविश्वास तिला पादाक्रांत करायचा आहे. पुरुषांच्या बरोबरीचा मान तिला संसारातही हवा आहे. संसाररथाची दोन समान चाके म्हणून पती-पत्नीकडे बघितले जावे. कुटुंबाप्रमाणेच बाहेरही सर्वच क्षेत्रात तिला मान मिळायला हवा.

स्वतंत्र विचारांच्या स्त्रीवर आज फार मोठ्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. केवळ शिक्षणाने, नोकरीने आपण पुरुषांच्या बरोबरीत आलो, असा वृथा अभिमान बाळगण्यात अर्थ नाही. जीवनाची अनेक क्षेत्रे आजही तिच्याकडे आशेने पाहत आहेत. उमलत्या पिढीवर संस्कार करून त्यांना देशाचे आदर्श नागरिक बनविण्यासाठी, देशातील सर्व प्रकारचा भ्रष्टाचार, अत्याचार खणून काढण्यासाठी त्यांनी निर्धाराने पुढे आले पहिजे. सामाजिक जीवनातील सुखासीनता, भ्रष्ट प्रवृत्ती अशाच सुरू राहिल्या तर स्त्रियांचे स्वातंत्र्यही धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून निदान सुशिक्षित स्त्रीने बदलत्या काळाची

पावले ओळखून आपले पाऊल टाकावे व गतिशील व्हावे, अशी वेळ आली आहे.

स्त्रीच्या स्वातंत्र्याला निसर्गानेच लक्ष्मणरेषा आखून दिली आहे, याचे भान स्त्रियांनी ठेवावे. नीतीकल्पना व शरीरनिष्ठ चारित्र्याची जोपासना तिने करावी. चित्रपटसृष्टीचा विपरीत परिणाम होऊ देऊ नये. सावध राहून संयमाने आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा. बालपणी पित्याच्या, तरुणपणी पतीच्या आणि वृद्धावस्थेत पुत्राच्या बंधनात अडकलेल्या स्त्रीने बंधने झुगारून मुक्त संचार करावा, हे जरी योग्य असले तरी तो स्वैरसंचार ठरू नये. तात्पर्य कालप्रवाह ओळखून तारतम्याने व संयमाने वागण्यात स्त्रीजीवनाचे सार्थक आहे.

आज समोर असलेली सर्व आव्हाने स्त्रियांना स्वीकारावीच लागतील. एकविसाव्या शतकातील ह्या स्त्रीने बहुतेक आव्हाने स्वीकारली आहेत. आपल्या कर्तृत्वाने तिने आपले घर आणि नोकरी अथवा व्यवसायही सांभाळला आहे. स्वतःच्या करियरसोबतच ती आपल्या मुलांच्या भवितव्याविषयी जागरूक झाली आहे. तिचा आत्मसन्मान जागा झाला आहे. ती आता 'पायातील वहाण' राहिलेली नाही. हात उगारणाऱ्या नवऱ्याचा, सासूचा ती हात धरू लागली आहे. संसाराची धुळधाण करणाऱ्या दारूच्या दुकानांना बंद करण्यासाठी



मोर्चे काढू लागली आहे. मात्र तिला आपली शक्ती, क्षमता वाढवायला हवी. स्त्रियांनी संघटित होऊन त्यांच्या हक्कासाठी, उद्धारसाठी लढणे आज आवश्यक झाले आहे. पुरुषाने आक्रमिलेली सर्व क्षेत्रे तिने आक्रमावी. पुरुषांशी स्पर्धा करून आपण त्यांच्यापेक्षा कमी नाही, हे दाखवून द्यावे. तरच महात्मा फुले, राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या समाजसुधारकांचे उद्देश सफल होतील व खऱ्या अर्थाने स्त्री स्वतंत्र होईल आणि मग तिची जबाबदारी पार पाडण्यात कुठलीही उणीव राहणार नाही.

⃠⃠⃠

# १३. राष्ट्रीय एकात्मता

सर्वदूर पसरलेला भारत देश राष्ट्रीयत्वाने बांधला जाणे आवश्यक आहे. भारतीय भूखंडावरील सर्व मानव हे एकाच राष्ट्राचे आहेत हे मानणे, त्यावर निष्ठा ठेवणे म्हणजे राष्ट्रीयत्व. तिचा मान, तिची शान टिकवणे, वृद्धिंगत करणे, त्याकरिता झटणे म्हणजे राष्ट्रीयत्व. ही भावना सर्वांनी उराशी बाळगून बंधुत्वभावाने, एकविचाराने राहणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता.

प्राचीन काळात मनुष्य हा एकटादुकटा

एकत्रित येणाऱ्या सीमाप्रांतात नक्षलवादी कारवाया वाढत आहेत. राजकारण्यांचे अपहरण, पंतप्रधानांचा वध, संसदेवर हल्ला, रेल्वेंमधील बॉम्बस्फोट ह्या गोष्टी कशाच्या द्योतक आहेत?

राष्ट्रीय आपत्तीत मोडणारी दुसरी जटिल समस्या म्हणजे लोकसंख्या. भारताची लोकसंख्या एकशेपाच कोटींच्यावर गेली आहे. जिथे पर्यावरणाचा नाश होतो, निसर्गाचे तंत्र बिघडते, तिथे लोकसंख्यावाढीचे संकट भयंकर ठरते. होणारे अनिष्ट परिणाम टाळण्याकरिता एकात्मता निर्माण करणे आवश्यक ठरते. आम्ही सर्व एक आहोत. आमचे राष्ट्र एक आहे. आम्ही राष्ट्राचे आहोत, राष्ट्र आमचे आहे, ही परस्परपूरक भावना जागृत व्हायला हवी. सर्वांना समान कायदे असावेत आणि कुटुंबनियोजन सक्तीचे करण्यात यावे. कोणत्याही धर्माच्या वा जातीच्या व्यक्तीला त्यातून सूट देता कामा नये. म्हणजे लोकसंख्या नियंत्रितही होईल आणि विशिष्ट समाजाला विशिष्ट सवलती दिल्या जातात, याचे दुःखही राहणार नाही.

आपले राष्ट्र लोकशाही राष्ट्र आहे. लोकांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ह्या तत्त्वत्रयींची जोपासना करणे महत्त्वाचे आहे. त्यातल्या त्यात बंधुतेची आवश्यकता जास्तच आहे. व्यक्तीला स्वातंत्र्य



अर्थाने भारत एकात्म आहे. तो सुखाने नांदत आहे. आपण सारे एक आहोत, याची जाणीव त्याला आहे. विविधतेतून जी संस्कृती बनलेली आहे, ती भावनेने, परंपरेने एक आहे. अशा एकात्म राष्ट्राला मात्र एकजुटीची आता नितांत गरज आहे. आपण सर्व मानव एकाच राष्ट्राचे आहोत, तेव्हा परस्परांच्या सुखदुःखाची जाणीव ठेवणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. या एकात्मतेच्या जोरावरच भारत पारतंत्र्यातून बाहेर पडून स्वतंत्र झाला. सारे एकजुटीने लढले म्हणूनच संकटावर मात केली गेली.

कारगील युद्धाच्या रूपाने आणि बांगला देशाच्या घृणीत कृत्याने भारतावर कोसळलेले संकट विसरता येणार नाही. पाकिस्तानला वारंवार समजावून आणि अमेरिकेसारख्या देशाकडून त्याच्यावर दबाव आणूनही ते मागे सरत नाही. काश्मीरवरील आक्रमणे सतत चालूच आहेत. शस्त्रसाठ्यासह घुसखोरी सुरूच आहे. परकीय आक्रमणाच्या संकटकाळी भारतीय एकात्मता भंग पावली तर ते शत्रूला आयतेच निमंत्रण दिल्यासारखे होईल. घटनेने अल्पसंख्यकांना आरक्षण दिले, संरक्षण दिले, ते बहुसंख्यकांनी त्यांच्यावर अत्याचार करू नये, त्यांनी देशाच्या मुख्य प्रवाहात एकरूप व्हावे म्हणून; पण या सवलतींची ढाल करून बरेचदा फितूरवृत्ती, परधार्जिणेपणा, धार्मिक तणाव या गोष्टी

वाढत आहेत. क्रिकेटमध्ये भारत हरला, पाकिस्तान जिंकला की काही वस्त्यांमध्ये फटाके फुटतात. भारताचा राष्ट्रध्वज भारतातच जाळला जातो. राष्ट्रगीताला, वंदे मातरमूला विरोध होतो. सहिष्णुतेच्या नावाखाली राष्ट्राचा हा अपमान सहन केला जातो. यांतूनच अशा वृत्ती फोफावतात. काही वेळा राजकीय स्वार्थासाठी नेते बेजबाबदार भाषणे करून जनभावना भडकवतात. प्रसारमाध्यमेही काही वेळा दिशाभूल करतात. अशा आपत्तींबरोबरच देश नैसर्गिक आपत्तींत गुरफटल्या जात आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी तर कधी भूकंपांचे हादरे इत्यादी आपत्तीत राष्ट्रीय एकात्मतेची नितांत गरज असते.

भारतीय संस्कृतीने अखिल मानव समाजाला शांततेचा संदेश दिला आहे. नेहरू शांतीचे दूत व गांधीजी अहिंसावादी तत्त्वज्ञ. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर एकात्मतेची भावना जागृत केली. भारताला जगाच्या शिखरावर पोचविण्याचे काम या राष्ट्रपित्याने केले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी जनतेला एकत्र आणण्यासाठी गणेशोत्सव, शिवजयंती असे सामूहिक ऐक्याचे कार्यक्रम सुरू केले. त्याच राष्ट्राच्या एकात्मतेला आज भेगा पडत आहेत. परकीय राष्ट्रांच्या चिथावणीने काही देशबांधवांनी दहशदवाद स्वीकारला आहे. राजकारणासाठी धर्मभावना भडकवण्याचे काम काही



देशद्रोही करीत आहेत. गांधीजींच्या अहिंसक भारतात हिंसेने थैमान घातले आहे. भाषावार प्रांतरचना स्वीकारल्यावरही राज्याराज्याच्या सीमाप्रश्नांनी रक्ताचे पाट वाहताना पाहिले आहेत. नद्यांच्या पाणीवाटपाच्या प्रश्नावरूनही दंगली उफाळत आहेत. मूर्ती विटंबना आणि त्यानंतर निघणारे मोर्चे, दगडफेक, जाळपोळ आता नवीन राहिलेली नाही. अशा देशविघातक कारवायांमुळे पुन्हा फाळणी तर होणार नाही, अशी शंका आता व्यक्त केली जाते आहे.

अनेक समस्या आज राष्ट्रात आहेत. सर्वात मोठे संकट कोणते असेल तर भारताचा आविभाज्य घटक काश्मीर. काश्मीर प्रश्न हा चिघळलेला आहे. काश्मीरचे वेगळेपण राष्ट्रीय एकात्मतेला घातक ठरत आहे. अतिरेक्यांनी तिथे हाहाकार माजवला आहे. सामान्य लोकांचे जगणे कठीण झाले आहे. नुकत्याच झालेल्या कारगील युद्धात भारताने विजय मिळवला आहे. मात्र त्याचा धोका टळलेला नाही. सर्वत्र दहशतीचे वातावरण पसरलेले आहे. काश्मीरात एकात्मतेची अधिक गरज आहे. पंजाबातही रक्ताचे पाट वाहत होते. पुन्हा केव्हा तशी परिस्थिती निर्माण होईल, हे सांगता येत नाही. आसाम, बंगाल, मिझोराम, त्रिपुरा ही ईशान्यपूर्व राज्ये पोखरली जात आहेत. बोडो, उल्फा आणि आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व झारखंडच्या

भारतीय संस्कृती विकृतीत परावर्तीत होत होती. समाजातील काही घटक कायम उपेक्षित राहू लागले.

भारत देश स्वतंत्र झाला आणि डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वानांनी घटना तयार केली. भारताचे पारतंत्र्यातील चित्र आणि आजचे स्वतंत्र भारताचे चित्र बघता त्यातील जमीनअस्मानाचे अंतर स्पष्टपणे जाणवते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेल्या भारताने २६ जानेवारी, १९५० रोजी घटना अंमलात आणली. घटनेनुसार स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांना महत्त्व दिले आहे. घटनेमध्ये सर्वांना समान पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न केले गेले. लोकशाहीचा खरा अर्थ समजावून सांगण्यात आला. निर्माणकर्त्याने मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले असून सर्वांना समान हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे, असे महात्मा फुल्यांनीही लोकशाहीविषयी म्हटले आहे. अर्थात 'लोक' हे लोकशाहीचे केंद्र असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच ही शासनप्रणाली राबविण्यात येते.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही लोकशाहीची मूळ तत्त्वे आहेत. ती मान्य करणारी पद्धती म्हणजे लोकशाही होय. भारत देशात लोकशाही नांदते आहे. भारताचा इतिहास बघितला तर लक्षात येते की, बौद्धपूर्वकालातही ती अस्तित्वात होती. खरी लोकशाही घटनेतील कायद्यावर नव्हे तर लोकांच्या तदनुकूल



उपभोगता येईल. समान कायदा करून समताही जोपासता येईल. पण बंधुत्वाची भावना अनेक धर्म, जातींमुळे समाजात निर्माण होणे कठीण असते. बंधुत्व जोपासणे लोकशाहीला वाचवणे आहे. तेच खरे एकतेचे बळ आहे.

देशात वर्गभेदाचे स्वरूप वाढत आहे. अमीर-गरीब, कामगार-भांडवलदार हे भेद प्रखरतेने जाणवतात. त्यामुळे परस्परांतील प्रेमभावना नष्ट होत चालली आहे. आत्मीयता, जिव्हाळा यांचे सहजस्पर्शही कुठे जाणवत नाहीत. प्रत्येक गोष्टीच्या व कृतीच्या पाठीमागे स्वार्थ दडलेला आहे. ह्या सर्व गोष्टींमागे एकात्मतेचा अभाव कारणीभूत आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादी घटनांमागे असामाजिक तत्त्वे आहेत. तस्करी करणे, लाच खाणे, राष्ट्रध्वज जाळणे, राष्ट्रगीताचा अपमान करणे, देशाची मौलिक गुपिते परदेशी पोचवणे आदी राष्ट्रद्रोही कारवाया करणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा ताबडतोब दिली गेली पाहिजे. समाज प्रबोधन आणि मानवी मूल्यांचा प्रखर पुरस्कार हाच राष्ट्रीय एकात्मता राखण्याचा श्रेष्ठ उपाय आहे. केशवसुतांनी 'नवा शिपाई' या कवितेत समर्पक वर्णन केले आहे -

'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत
ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ अम्हातून वाहे.'

सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव आणि निर्भयतेतून राष्ट्रीयत्व जोपासता येते. भारतीय संस्कृतीचे नुसते गोडवे न गाता राष्ट्राचा सन्मान, प्रतिष्ठा वाढविण्यासाठी कार्य करणे गरजेचे आहे. परस्परांशी समसमान व्यवहार करणे, दुजाभाव, वैर, जातिभेद, प्रांतभेद, भाषाभेद यांच्या भिंती पाडून बंधुभावाचा विचार वाढविणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता ठरेल. स्वार्थत्याग, शिस्त, राष्ट्रभक्ती, देशाच्या उत्थानासाठी पडतील ते कष्ट सोसण्याची तयारी जर तरुणांत असेल, तर राष्ट्रीय एकात्मतेचा मार्ग सुकर होईल. राष्ट्रीय एकात्मतेतूनच पुढे 'हे विश्वचि माझे घर' ही विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागेल.

भारत हे एकात्म राष्ट्र आहे; कारण भारताचा प्राण एक आहे. आत्मीयता, बंधुता, समता, मानवता, सर्वधर्मसमभाव या मानवी मूल्यांच्या आधारे एकात्मतेचा प्रश्न सहज सोडवता येईल. 'देश हा देव असे माझा' या भावनेतून देशाकडे पाहिले गेले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव देणारे प्रभावी सामूहिक नेतृत्व उदयाला येणे जरुरी आहे. प्रत्येक माणसात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण व्हायला हवी. त्याचे बाळकडू प्रत्येकाला मिळाले पाहिजेत. तेव्हाच कोणी आपली गुपिते शत्रूराष्ट्राला विकणार नाही, भ्रष्टाचार करणार नाही, तस्करी करणार नाही. भारत हे अनेक मूल्यांचे



माहेरघर आहे. गौतम बुद्धांपासून महात्मा गांधींपर्यंत मानवी मूल्यांचा प्रकाश देणारे सूर्य याच महान देशात उगवले आहेत. म्हणून एकात्मता राष्ट्रीय संकटात असली तरी या संकटावर मात करणे भारतासारख्या महान राष्ट्राला कठीण जाणार नाही, हे निश्चित!

⃠⃠⃠

# १४. आजची लोकशाही

भारतात पूर्वी चातुर्वर्ण्य व्यवस्था होती. या व्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र असे वर्गीकरण या व्यवस्थेत होते. परिणामी उच्चवर्णीय वगळता इतरांना प्रगतीची दारे आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी जवळ जवळ बंद झाल्या होत्या. धर्ममार्तंड, धर्माभिमानी, पुरोहित यांच्या संकुचित आणि स्वार्थी तत्त्वांवर समाजव्यवस्था स्थापित झाली होती. जातीजातीत भेद पाळला जाई. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद प्रखरपणे दिसत होते. मनुस्मृतीचे स्तोम माजले होते.

गुलाम होतो. लोकशाही गुलामगिरी नसते. त्याकरिता आपण कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी व्यक्तिस्वातंत्र्याची फुले वाहू नयेत. पूजा करायची झाल्यास देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्यांची करावी. थोरांबद्दल अभिमान बाळगावा, पण स्वाभिमान सोडू नये.

लोकशाहीच्या समता, स्वातंत्र्य व बंधुतेच्या तत्त्वाआड जातिभेदाची भिंत येते. सामाजिक जीवनात ऐक्याचे अमृतसिंचन जर कोणते तत्त्व करीत असेल तर ते बंधुभावाचे तत्त्व होय. हे तत्त्व दररोजच्या व्यवहारात यशस्वी रीतीने पाळणे मोठे कार्य आहे. भारतात अनेक जाती आहेत. देशविघातक तत्त्वे जाती-जातींमध्ये तेढ, मत्सर, तिरस्कार निर्माण करतात. आज आपल्याला लोकशाही टिकवायची असेल तर जातीय अडचणींना दूर केले पाहिजे. बंधुभाव निर्माण व्हायला हवा. तेव्हाच समता आणि स्वातंत्र्याच्या अस्तित्वाला अर्थ राहील.

राष्ट्रीय एकात्मता हा लोकशाहीचा आधार असतो. जेव्हा राष्ट्रीय एकात्मतेला तडा जातो, तेव्हा लोकशाही धोक्यात येते. जम्मूकाश्मीरवरील पाकिस्तानचे आक्रमण, अतिरेक्यांची घुसखोरी, सार्वजनिक स्थळी बॉम्बस्फोट, पुतळ्यांची विटंबना, धार्मिक मिरवणुकांमधील दंगली राष्ट्रीय एकात्मतेस ध



प्रवृत्तीवर अवलंबून असते. लोकशाही शासनपद्धतीला बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले आहे. बुद्धभिक्षूंचे संघ म्हणजे लोकसभाच होत्या. भारतात सामाजिक समता निर्माण करण्यात लोकशाही अत्यंत महत्त्वाची ठरली.

लोकशाहीची परिभाषा व्यक्तीचा विकास ह्या अर्थानेच केली आहे. लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या मान्य केली गेली. आधुनिक प्रगतीच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचे ठरत आहे. व्यक्ती स्वतंत्र तर देश स्वतंत्र, त्यामुळे लोकशाहीला सर्वोत्तम प्रणाली म्हटले गेले. लोकशाहीव्यतिरिक्त अन्य कोणतीही शासनप्रणाली उत्कृष्ट ठरली नाही. म्हणूनच इतक्या वर्षांपासून भारतात लोकशाही टिकून आहे. याउलट अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराक अश काही देशांतील हुकुमशाहीने त्या राष्ट्रांचे किती नुकसान झाले, हे जगाने पाहिले आहे.

लोकशाही म्हटली की निवडणुका येतातच. लोकशाहीप्रधान राष्ट्राच्या निवडणुकांमध्येही तृटी आढळतात. निवडणुका म्हणजे राजकारण. साम, दाम, दंड, भेद अशा सर्वप्रकारे स्वार्थाचा विजय साधणारेही आलेच. मतदानाच्या वेळी मोठा भ्रष्टाचार होतो.

मतांसाठी पैसे वाटले जातात. सत्तेसाठी निवडून आलेल्या उमेदवारांची खरेदी होते. सुरुवातीला अपक्ष म्हणून उभे राहणारे आणि मग एखाद्या पक्षाकडून पैसे घेऊन माघार घेणारेही आहेत. उमेदवार पळवणे, घातपात करणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, गुंडगिरी करणे असे सर्व प्रकार आता होऊ लागले आहेत. राजकारण हा धंदा झाला आहे. अशा लोकशाहीला खरोखर काही चांगले भवितव्य आहे का?

काही निवडणूक आयुक्तांनी, अधिकाऱ्यांनी अपप्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. निवडणुक खर्चाची मर्यादा दिली. काही सार्वजनिक जागी पत्रके लावण्यास मज्जाव केला. प्रचारावर नियंत्रणे आणली. निवडणुकीची आचारसंहिता कडक केली. नियमभंग करणाऱ्यांना निवडणुकीतून बाद करण्याचे जाहीर केले. खोटे मतदान होऊ नये, म्हणून ओळखपत्रे तयार करण्यात आली. सत्तेवरील उमेदवारांना शासकीय वाहनाने, खर्चाने निवडणुकीसाठी प्रचार करण्यावर बंदी आली. तरीही राजकीय पक्ष आणि उमेदवार या आदेशांची चोरीछुपे पायमल्ली करताना आढळतात.

निवडणुकांत मतदान कमीच होते. दलित, शोषित, गरीब लोकांच्या झुंडी मतदान केंद्रावर दिसतात. भांडवलदार, व्यापारी, लब्धप्रतिष्ठित मतदानाला जाताना कमीच दिसतात. घरबसल्या



लोकशाहीच्या गप्पा मारणारा वर्ग लोकशाहीला चिरडून टाकतो आहे. पुष्कळदा अनेकांची नावे मतदारयादीत नसतात. खरेतर सर्व स्तरातील, सर्व धर्म, पंथ, जाती, समाजातील भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे आणि सर्व स्तरातून मतदान होऊन लोकप्रतिनिधी निवडले जावे, ही अपेक्षा असते; पण तसे होत नाही. काही ठिकाणी विशिष्ट समाजाची गठ्ठा मते असतात. अनपेक्षित निकाल जाहीर होतात. कोणत्याही पक्षाला बहुमत मिळत नाही. मग कोणत्याही पक्षाची कोणाशीही युती होते. कधीकधी तेरा-तेरा पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन करतात. प्रत्येकाचे विचार, आचार वेगळे असतात. असे भिन्न मतप्रवाह असलेल्या पक्षांचे प्रतिनिधी दीर्घकाळ सत्ता राखू शकतील का, हा खरा प्रश्न आहे.

आजची लोकशाही द्विधावस्थेत टाकणारी आहे. कारण लोकशाहीत सनदशीर समाजपरिवर्तन, व्यक्तिपूजांवर बंदीची आवश्यकता आहे. जातीयतेसाख्या गोष्टी घातक आहेत. असनदशीर मार्गाने लोकशाही टिकत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही टिकवण्यासाठी व्यक्तिपूजा सोडली पाहिजे. आपल्या देशातील जनता साधीभोळी आहे. राजकारणात ती व्यक्तिपूजेला महत्त्व देते. व्यक्तिस्वातंत्र्य हे लोकशाहीचे भूषण आहे. व्यक्तिस्वातंत्र्य काढून घेतले तर व्यक्ती

असतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात शासनाने शिक्षणप्रसारासाठी अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. खाजगी संस्थांना शाळा, महाविद्यालये चालविण्याची परवानगी दिली. प्रौढशिक्षणाचे वर्ग चालविले. समाज सुशिक्षित झाला की सुबत्ता त्यापाठोपाठ येते, या अपेक्षेने शिक्षणाची साधने सर्वत्र पसरली. अगदी खेड्यापाड्यांतून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या तरी प्रत्यक्षात खरे शिक्षण सर्वांनाच मिळत आहे, असे दिसत नाही. हजेरीपटांवर विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी असते आणि प्रत्यक्षात उपस्थिती अगदी नाममात्रच असते.

अशा शिक्षणप्रणालीतून तयार झालेले, येनकेनप्रकारेण पदव्या प्राप्त करणारे युवक-युवती मोठ्या पगाराच्या व कमी श्रमाच्या नोकरीची अपेक्षा करतात. घरबसल्या करोडपती होण्याची स्वप्ने पाहतात. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी हे जे समीकरण होते, ते आज उलट झाले आहे. शेतातील कष्ट नकोत, व्यापारातील अनिश्चितता नको, कायम सुरक्षित असलेली हलकी नोकरी असली तरी चालेल अशी अपेक्षा केली जाते.

औद्योगिकीकरणामुळे प्रत्येक वस्तू यंत्रामार्फत तयार करणे सुरू झाले. माणसांची गरज



ोका ठरू शकते. अनेक धर्म या देशात नांदतात. त्या सर्व धर्मांनी एकोप्याने राहणे गरजेचे आहे; पण राजकीय स्वार्थापोटी अनेक प्रश्न चिघळत ठेवल्याने राष्ट्रीय एकात्मतेबरोबरच लोकशाहीला धोका पोचतो आहे.

समाज परिवर्तनशील असतो. भविष्याविषयीचे मत आशावादी असावे लागते. वास्तविक, राष्ट्राची उन्नती व्हावी, लोकशाही नांदावी याविषयी आपले मत ठाम असावे. तेच खरे जिवंतपणाचे लक्षण आहे. त्यासाठी मात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. तरुण पिढीने ह्या आव्हानात्मक कार्याचे व्रत घ्यायला हवे. लोकशाहीकडे एक शासनप्रकार म्हणून न पाहता समाजजीवनाची एक आदर्श प्रणाली म्हणून पाहावे. व्यक्तिपूजा टाळाव्या. नाहीतर सत्तापिपासू वृत्ती बळावत जातील. न्याय, सत्य, सदाचार यांना महत्त्व द्यावे. तरच येथे भारतीय लोकशाही टिकून राहील. निवडणुकांमध्ये चारित्र्यसंपन्न उमेदवाराला निवडून दिले पाहिजे. त्याच्यावर कुठलेही गुन्हे आणि आरोप नसावेत. तो संपूर्ण समाजाकरिता, देशाकरिता कुठलाही भेदभाव न ठेवता प्रामाणिकपणे कार्य करणारा असावा. मतदान सर्व स्तरांतून आणि प्रत्येक नागरिकाने करावे. म्हणजेच योग्य असा उमेदवार निवडून येईल. निवडणुकांमध्ये अर्थकारण होता कामा नये. लोकशाही ही व्यापक अशी राजकीय प्रणाली आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही तत्त्वे एकमेकांपासून वेगळी करता येत नाहीत. ती वेगळी झाल्यास लोकशाहीचे जीवनसत्त्व नष्ट केल्यासारखे होते. समतेपासून स्वातंत्र्य अलग करता येत नाही. स्वतंत्रता आणि समता यांना बंधुत्वापासून अलग करता येत नाही. या त्रयींवर आधारित लोकशाही आहे. लोकशाही एक आदर्श शासनप्रणाली आहे. लोकशाहीत देशाबद्दल लोकांची निष्ठा वाढीस लागते. धर्मनिरपेक्ष, आदर्श भारताचे स्वप्न साकार करण्याकरिता लोकशाही चिरंतन टिकून राहण्यासाठी परिपक्व विचार कृतीत आणणे गरजेचे आहे. समग्र भारतीयांना संविधान आकलन होणे गरजेचे आहे. अन्यथा भांडवलदार हे लोकशाहीचे ठेकेदार होतील. त्यात पीडित, शोषितांचा बळी जाईल. म्हणून लोकशाहीचा खरा अर्थ आणि तत्त्वे आत्मसात करणे जनतेचे प्रथम कर्तव्य आहे. असे झाले तर संपूर्ण भारतीय समाज एक होईल. देशावरील कुठल्याही संकटात लोकांचे सहकार्य मिळेल. देशाच्या उन्नतीकरिता प्रत्येक घटक कार्यरत होईल. ही सर्व उद्दिष्टे सफल होण्याकरिता आजची लोकशाही समजावून घेणे आणि सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.

⃠⃠⃠



# १५. बेकारीची समस्या

नैसर्गिक संकटांमध्ये समग्र भारतीय एकत्र येताना दिसतात; पण एका समस्येच्या निराकरणाकरिता ते अद्यापही एक होत नाहीत, ती म्हणजे बेकारी. बेकारीची समस्या ही भारतात अत्यंत ज्वलंत स्वरूपात आहे. ज्या माणसाला नोकरी, उद्योगधंदा किंवा उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही, त्याला 'बेकार' म्हटले जाते. आज महागाईमुळे माणसाला जगणे कठीण झाले आहे. त्यातून बेकार असेल तर हातातोंडाची गाठ पडणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना! त्याला कुटुंबाचे पालनपोषण नीट करता येत नाही आणि कुपोषणाची समस्या उभी ठाकते. या समस्येच्या मुळाशी काही असेल तर ती म्हणजे वाढती लोकसंख्या.

बेकारांचे दोन प्रकार आहेत - सुशिक्षित बेकार आणि अशिक्षित बेकार. सुशिक्षित बेकार शिक्षण घेऊन नोकरीसाठी वणवण फिरतात. वशिला आणि देणगी हे दोन्ही नसेल तर त्यांना चांगली नोकरी मिळत नाही. हलकी कामे करायची तयारी नसल्याने ते बेकारच राहतात. जीवनमानाचा दर्जा टिकवण्याची धडपड करतात. त्यातून नैराश्याकडे झुकतात. तरी अशिक्षित बेकारांपेक्षा त्यांना अधिक संधी असतात. अशिक्षित बेकारांना नोकरी किंवा श्रमाच्या संधी मर्यादित असतात. सुशिक्षितांकडे दोन्हींकडे जाण्याच्या संधी

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या, रूढीपरंपरांना चिकटून राहिलेल्या अशा काही समाजांत आहे.

'रिकामे मन, सैतानाचे घर' असे म्हटले जाते. जर ह्या बेकारीच्या समस्येवर त्वरित ठोस पावले उचलली गेली नाहीत, तर गुन्हेगारी वाढत जाईल. तरुण पिढी व्यसनाधीन होईल. देशात सतत दंगली, वाद, हाणामाऱ्या, जाळपोळ, मोर्चे, टोळीयुद्ध असे अराजक माजेल. दहशतवादी, नक्षलवादी कारवायांमध्ये थोड्याशा पैशांसाठी ही पिढी शामील होईल. भारताच्या प्रगतीचे स्वप्न बघणाऱ्यांनी वेळीच जागृत होणे गरजेचे आहे.

या बेकारीमुळे देशातील बुद्धिमान तरुण परदेशात जात आहेत. तेथेच शिक्षण, तेथेच नोकरी, तेथेच स्थायिक होणारी ही नवी पिढी 'या देशाशी काही घेणेदेणे नाही' असे म्हणू लागली आहे. परदेशातील सुखसोयी, भरपूर पगार, स्वस्थ व बिनात्रासाचे जीवन यांमुळे त्या देशांचे नागरिकत्वही घेऊ लागली आहे. तिकडेच विवाह करून किंवा विवाहानंतर जोडीदारालाही परदेशी नेऊन, होणाऱ्या अपत्यांना तिकडेच जन्म देतात आणि त्याचे ग्रीन कार्ड मिळवतात. या सर्व प्रकाराला कारण म्हणजे येथील राजकारण्यांनी स्वार्थासाठी कायमस्वरूपी ठेवलेला हा बेकारीचा प्रश्न. आज ही समस्या एवढी फोफावली आहे, की त्यांच्याही



कमी झाली. संगणकही अनेक माणसांचे व अधिक वेळ लागणारे काम अत्यंत कमी वेळात करू लागले. 'रोजगार हमी योजना', 'ग्रामीण रोजगार योजनां'सारख्या योजना स्थापन करून सरकारने ग्रामीण भागातील बेकारांन वर्षातून काही दिवस काम मिळावे, यासाठी प्रयत्न केले. बेकारांना 'बेरोजगार भत्ता' सुरू केला. पण या सर्व योजना अपयशी ठरल्या. बेकारी वाढतेच आहे.

वास्तविक अन्नधान्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होते आहे. तरीही शासनाची उदासीनता, वीजेचे भारनियमन, नकली बियाणे, बोगस खते, सावकारी पाश, व्यापाऱ्यांची लूट आणि कष्टांच्या तुलनेत अत्यल्प मोबदला या कारणांनी वडिलोपार्जित शेती विकून टाकणे किंवा त्या जागेवर प्लॉट्स पाडण्याकडे युवकांचा कल वाढला आहे.

नोकरी म्हणजे दुसऱ्याची ताबेदारी; परंतु महिन्याच्या अखेरीस ठरावीक रक्कम मिळण्याची शाश्वती म्हणून युवा पिढी नोकरीचा शोध घेते. एका एका जागेसाठी हजारोंनी अर्ज केले जातात. लाखो रुपयांचे डोनेशन देण्याची तयारी असते. शिक्षण घेतानाही डोनेशन आणि नोकरी मिळवण्यासाठीही डोनेशन. परिणामी आपल्या कार्यात ती व्यक्ती प्रामाणिक राहत नाही. नोकरी आहे म्हटल्यावर वधूपक्षाकडील मंडळी मुलांचे दोष-दुर्गुण न पाहताही मुली देऊन टाकतात.

नोकरी करणारा जोडीदार मिळणे, हे आता भाग्याचे लक्षण समजले जाऊ लागले आहे.

व्यवसाय करण्याकरिता जवळ पैसा असावा लागतो. आता वित्तीय संस्था कर्जही देतात; पण तरुणांमध्ये धडाडी, हिंमत, रात्रंदिन कष्टाची तयारी आणि दूरदृष्टी असावी लागते. एका युवकाकडून व्यवसाय करणे कठीण वाटत असल्यास चार मित्र सहकारी मिळूनही व्यवसाय उभा करता येऊ शकतो. मात्र आज व्यवसाय टाकला आणि उद्याच विपुल पैसा मिळावा अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे लक्षण आहे. आत्मविश्वास, चिकाटी, जिद्द आणि श्रम यांवर व्यवसायातील यश अवलंबून असते. तसे पाहिले तर 'सांगणे सोपे आणि करणे कठीण' असते. व्यवसायाकरिता जागा, भांडवल, स्पर्धा असे अनेक प्रश्न असतात. सरकारी परवाने लागतात. त्याकरिता पुष्कळदा नाइलाजाने भ्रष्ट वाटा चोखाळाव्या लागतात. सामान्य तरुणांना ह्या वाटांवरून जाणे म्हणजे एक तर परिस्थिती नसते, दुसरे म्हणजे या वयात अशा गुन्हेगारीविरुद्ध ते पेटून उठतात. शेवटी काहीच हाती लागत नाही आणि बेकारांत भरती होते. बरेचदा ते आखाती देशांत नोकरीकरिता जाण्याची स्वप्ने बघतात; पण बहुतेक वेळा तेथे फसवणूक होते. मधले दलाल पैसे घेऊन पळून जातात किंवा या तरुणांना त्या देशात



पाठविण्याची व्यवस्था करतात; पण तिथे त्यांनी कुठलीही व्यवस्था केलेली नसते किंवा अत्यंत हलक्या कामाची नोकरी तिथे दिली जाते.

स्वतंत्र भारतातील तरुणांमध्ये गुणांची कमतरता आहे, असे खेदाने म्हणावे लागते. मोजके अपवाद सोडले तर पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे युवा पिढी चैनविलासात रमणारी होत चालली आहे. चंगळवाद फोफावला आहे. खुर्चीवरचा साहेब होण्याची स्वप्ने पाहणारी ही पिढी नैराश्याकडे झुकत चालली आहे. परिणामी, दारू, सिगारेटी आणि मटकाजुगाराच्या आहारी गेलेली ही पिढी खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाली आहे का, की केवळ साक्षरच झाली आहे, असा प्रश्न पडतो. स्वतंत्र भारतातील युवकांना पारतंत्र्यातील अन्याय-अत्याचारांची, कष्ट, दुःख, गरिबी यांची जाणीव नाही, हेही खरेच!

एके काळी असा समज होता की, शिक्षण घेतले की आपल्याला नोकरी मिळते; परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वांना नोकरी शक्य कशी होणार? लोकसंख्या नियंत्रण हा एक प्रभावी उपाय बेकारीवर होऊ शकतो; पण कायदे कडक करून काही होत नाही, समाजमनात परिवर्तन झाले पाहिजे. त्याकरिता जनजागृती होणे गरजेचे आहे. छोट्या कुटुंबाचे फायदे लोकांना समजले पाहिजेत. ही समस्या विशेषतः

बाशिंग बांधून नव्या बोहल्यावर उभा राहण्यास तयार होतो.

हुंडा का घेतला जातो? श्रीमंतांना आणखी श्रीमंत व्हावेसे वाटते. मध्यमवर्गीयांना आपले श्रीमंती चोचले भागवायचे असतात. कधी आपला मुलगा लाखात एक आहे, एवढा हुंडा मिळाला, ही (खोटी) प्रतिष्ठा दाखविण्यासाठी घेतला जातो. हुंडा हा वरपक्षाच्या प्रतिष्ठेचा मोजकाटा समजला जाऊ लागला आहे. एखाद्या घरी अशिक्षित, कुरूप मुलगी असेल तर तिचे न्यूनत्व झाकण्यासाठी वरास संपत्तीची लालूच दाखवली जाते. पैशाची हपापलेली माणसे या जगात कमी नाहीत. आम्ही तुमच्या मुलीला आयुष्यभर सुखासमाधानात ठेवणार आहोत, अशी भावना निर्माण करूनही हुंडा मागितला जातो. परंतु हुंडा देणारे आहेत, म्हणून हुंडा घेणारे आहेत, हेही लक्षात घ्यावे लागते.

मुलगी पसंत करताना तिचे रूप, गुणांबरोबरच तिच्या पित्याची सांपत्तिक स्थितीही बघितली जाते. त्यावरून हुंड्याची अपेक्षा ठरते. हुंडा घेणे म्हणजे स्वतःला विकणे, स्वतःची किंमत करणे होय. आज मुली सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यांनी त्यांची पात्रता सिद्ध केली आहे. पुष्कळदा तर लग्न करून सासरी आलेली मुलगी घर पोसताना दिसते. उत्पन्नात भर घालताना दिसते. अडचणींमध्ये घर



हाताबाहेर गेली आहे.

एकंदरीत, भारतात झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या तुलनेत नोकऱ्या निर्माण होणार नाहीत. नव्या पिढीला नव्या वाटा चोखाळाव्या लागतील, नव्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. शासकीय नोकऱ्यांच्या अपेक्षा सोडून पुन्हा शेतीकडे वळावे लागेल. शासकीय योजना आणून आधुनिक तंत्रज्ञानाने शेती व्यवसाय करावा लागेल. ग्रामविकासावर लक्ष केंद्रित करावे लागेल. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व तरुणांना पटवून द्यावे लागेल. शिक्षणपद्धती पारंपरिकतेपेक्षा व्यावसायिकतेकडे अधिक झुकवावी लागेल. समाजाच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याकरिता नवनवीन उद्योगधंदे सुरू करावे लागतील. शासनाची सबसिडी, कर्ज हे तर मिळवावे लागतीलच; पण जाहिराती आणि मार्केटिंगच्या नव्या वाटा चोखाळाव्या लागतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनाने बेरोजगारीवर मात करण्यासाठी ‘व्होट बँक’ राजकारण करीत नोकऱ्यांची खोटी आश्वासने देण्यापेक्षा युवापिढीला शेती, व्यवसाय आणि देशविधायक कार्यात समाविष्ट करून घेण्यासाठी सकारात्मक पावले उचलणे गरजेचे आहे.

# १६. हुंडा : एक कलंक

कुठलेही वृत्तपत्र वाचायला घेतले की एखादी तरी हुंडाबळीची बातमी असतेच. दररोज कितीतरी नववधू हुंडापद्धतीच्या शिकार होतात. कित्येक आत्महत्या करतात. कित्येकींना संपविण्यात येते. कित्येकींची घरे उद्ध्वस्त होतात. या सगळ्याला कारण म्हणजे हुंडापद्धतीचा पसरणारा भस्मासुर.

समाजाला ग्रासणारी एक सामाजिक समस्या म्हणून हुंड्याकडे बघितले जाते. संपूर्ण भारतात वेगवेगळ्या समाजांत ही अमानुष, अघोरी प्रथा आजही सुरू आहे. भारतीय समाजव्यवस्थेला लागलेला तो एक कलंक आहे. पुरातन ग्रंथांतून, रामायण, महाभारतातूनही हुंड्याचा उल्लेख आढळतो. 'आंदण' देण्याच्या प्रथेतून 'हुंडा' अस्तित्वात आला. प्राचीन काळी विवाह म्हणजे 'कन्यादान' समजले जाई. मुलीला दागदागिन्यांनी नटवून, सजवून दिले तर त्याला 'सालंकृत कन्यादान' म्हटले जाई. मुलीची सासरी पाठवणी करताना तिच्याबरोबर दास-दासी, धन-धान्य, गाई वगैरे दिल्या जात. हे सर्व आनंदाने स्त्रीधन म्हणून दिले जाई. त्यात कुठे अडवणूक नसे. वरपक्ष स्वतः भीक मागत नसे. मुलगी सासरी गेली की त्या घरची होत असे. पुढे ती तिथली मालकीण होत असे. अतिप्राचीन काळात स्त्रिया केवळ शिकलेल्याच नव्हत्या तर ऋषीमुनींप्रमाणे विद्वानही होत्या. वादविवाद, चर्चांमध्ये सहभागी व्हायच्या. विवाह लवकर व्हायचे.



त्याकाळी कन्यादान करताना वराला दिलेले धनधान्य वगैरे 'वरदक्षिणा' म्हणून दिले जाई.

काळ बदलला आणि स्त्रियांवर बंधने आली. शिक्षणापासून तिला दीर्घकाळ वंचित ठेवले गेले. त्यामुळे स्त्रीधन तिच्या उपजीविकेचे साधन झाले. मुलांचे कूळ, शिक्षण, नोकरी, व्यवसाय अशा गोष्टींवर हुंडा ठरू लागला. मुलाचा पोशाख, वरपक्षाकडील मंडळींचा मानपान, त्यानंतर लग्नाच्या दिवसाचा खर्च असा विविध प्रकारचा खर्च वधुपित्याकडून घेतला जाऊ लागला.

आज हुंडापद्धतीला विकृत वळण मिळाले आहे. मुलांचा विवाह म्हणजे 'कमाई' करण्याचे साधन झाले आहे. माणसातली माणुसकी संपली आहे. स्वार्थापोटी लग्नाच्या वेळी वधुपित्याकडून अनेक मागण्या केल्या जातात. पुष्कळ वधुपिता त्या कबूल करतात. मुलीला सासरी त्रास होऊ नये म्हणून ते स्वतःला विकून, कर्जबाजारी होऊन वरपक्षाकडील मागण्या पूर्ण करतात. पण एकदा मागण्या करण्याची सवय लागलेल्या मुलीच्या सासरची मंडळी पुढेही सतत काहीना काही मागण्या रेटत राहतात. त्या पूर्ण न झाल्यास मुलीचा छळ सुरू होतो. तिला आत्महत्येस प्रवृत्त केले जाते किंवा तिची हत्याही केली जाते. कधी पाण्यात बुडवून, कधी विषप्रयोग करून, कधी जाळून. पुन्हा पती गुढग्याला

निर्माण व्हायला हवी. पुष्कळदा हुंडा मागणारी, देणारी ही स्त्रीच असते. विवाहित स्त्रीच्या छळाला तिची सासू वा नणंदच कारणीभूत असते. हुंडा घेणाऱ्या वा मागणाऱ्या पुरुषाशी विवाहच करायचा नाही, असे स्त्रियांनी ठरविले पाहिजे. हुंड्याची मागणी करणाऱ्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकला जावा. समुद्रात हिमनग पाण्याच्या जितका वर दिसतो, त्याच्या कितीतरी पटीने तो पाण्यात असतो. हुंड्याच्या समस्येचे स्वरूप असे छोटे व सहज दिसत असले तरी पृष्ठभागाखाली फार व्यापक झाले आहे. म्हणूनच अनेक नवविवाहितांच्या नौका त्यावर आपटून फुटतात.हुंडापद्धतीमुळे समाजाची घडी विस्कटत आहे. कौटुंबिक शांतता संपते आहे, प्रौढ कुमारिकांचे प्रमाण वाढते आहे, अनैतिकता वाढते आहे.

हुंडा ही समाजाला लागलेली कीड आहे. जळूप्रमाणे ती चिकटली आहे. वधू-पक्षाचे रक्त शोषते आहे. आज शासनाच्या सोबत सामाजिक संस्थांनी विचारपरिवर्तनाकरिता प्रभावी उपाययोजना आखायला हव्यात. नारी अत्याचार विरोधी मंच, स्त्रीमुक्ती संघटना, युवक संघटना अशा संस्थांच्या चळवळी प्रखर व्हावयास हव्यात. दूरचित्रवाणी, आकाशवाणी, वृत्तपत्रे अशा प्रसारमाध्यमांनी अधिकाधिक जनजागृतीपर कार्यक्रमांचे, जाहिरातींचे प्रसारण करावे, साहित्याची प्रसिद्धी करावी. हुंडा न घेण्याच्या व देण्याच्या शपथा संवेदनशील युवा



सावरताना दिसते. अशा स्वतःच्या पायावर उभ्या मुलीकडूनही हुंड्याची अपेक्षा करणारे महाभाग आहेतच. या सर्व प्रकारात 'स्त्री'ची सतत अप्रतिष्ठा होत राहिली आहे. मनूने तर म्हटले आहे -

'पिता रक्षति कौमार्ये, भर्ता रक्षति यौवने
स्थविरे रक्षति पुत्रः, न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।'

स्त्रीला विवाहापूर्वी पिता, तारुण्यात पती, म्हातारपणी पुत्र संरक्षण देतो. इतकी ती अबला आहे. तिला कुठलेही स्वातंत्र्य नाही. पूर्वीपासून तिला केवळ भोगवस्तू समजले गेले. अशा पातळीवर स्त्रीला इथल्याच संस्कृतीने पोचवले, ही शोकांतिका आहे. एकीकडे 'मातृदेवो भव' म्हणायचे, 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' म्हणायचे आणि दुसरीकडे हुंड्याच्या रूपाने तिचा गळफास तयार करायचा. तिच्यावर अत्याचार करायचे, असेच सर्वत्र सुरू आहे.

हुंड्याची प्रथा गरीब, मागासलेल्यांमध्येच आहे, असे नसून ती श्रीमंतांमध्ये फार जास्त प्रमाणात दिसते. श्रीमंत स्वखुशीने हुंडा देतात आणि त्यांच्यामध्येच जास्त हुंडाबळी जातात. धनाची अतिरेकी लालसा याला कारणीभूत ठरते. हुंड्याचे दर ठरतात. मुलगा डॉक्टर, इंजिनियर, वकील असेल तर अधिक दर आकारला जातो. अगदी साधा चपराशी असेल,

तोही हुंड्याची मागणी करतो. काही तर बेकार असून कमावती वधू पाहतात आणि तिलाही हुंडा मागतात.

वास्तविक स्त्री आणि पुरुष ही रथाची दोन चाके आहेत, असे आपण मानतो. मग एका चाकाने दुसऱ्या चाकाकडून संसाररथ ओढण्याकरिता हुंड्याची अपेक्षा का करावी? मुलीचा जन्म म्हणजे मातापित्यांच्या कपाळावर आठ्या पडतात. सुनेने मुलीला जन्म दिला तर सासरची मंडळी हिडीसफिडीस करतात. मुलीला या जगात येण्यास प्रतिबंध केला जातो. जन्मलेल्या मुलींचा गळा घोटला जातो. मुलगा जन्मला की आनंदोत्सव आणि मुलीच्या जन्मावर शोक का व्यक्त केला जातो? त्यामागे हुंड्याचा भस्मासुरच कारणीभूत असावा. एखाद्या कुटुंबात दोनपेक्षा अधिक मुली असल्या तर पहिलीचे लग्न बऱ्यापैकी केले जाते; पण इतर मुलींच्या लग्नात हुंड्यामुळे कितीतरी अडचणी उभ्या राहतात. वधुपित्याची आर्थिक स्थिती हलाखीची होते आणि शेवटी धाकट्या मुलीला आजन्म अविवाहित राहण्याची पाळी येते.

हुंडा विरोधात कायदे आहेत. १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा लागू झाला. हुंडाबळी घेणाऱ्यांना फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे; पण कायद्यांना पाळणारे कमीच आहेत, कायद्यातही पळवाटा आहेत. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांच्या वीस कलमी



कार्यक्रमाच्या जोडीला संजय गांधींची पाच कलमे जोडली होती. त्यात हुंडाविषयक कलम जोडले होते. १. तरुण पुरुषांनी हुंडा घेणार नाही, अशी प्रतिज्ञा करणे, २. तरुण स्त्रियांनी हुंडा घेणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह करणार नाही, असा निर्धार करणे यांचा समावेश होता. हुंड्याच्या समस्येविरुद्ध अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत; पण त्यांचे प्रयत्न अपुरे ठरतात. जनमानस जागृत होणे गरजेचे आहे. हुंडाप्रथा रोखण्यासाठी मोठी क्रांती होणे गरजेचे आहे. तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोचणे आवश्यक आहे.

साहित्यक्षेत्रात अनेक दिग्गजांनी या प्रथेवर भाष्य केले आहे. श्री. भा.वि. उर्फ मामा वरेरकर यांचे ‘हाच मुलाचा बाप’ हे नाटक, ग.दि. माडगूळकरलिखित ‘वरदक्षिणा’ हा चित्रपट, व्ही. शांताराम यांचा ‘दहेज’ चित्रपट, जयवंत दळवीलिखित ‘पर्याय’ हे नाटक, ज्योती म्हापसेकरांचे ‘मुलगी झाली हो’ हे पथनाट्य, जयवंत दळवीलिखित ‘पर्याय’ हे नाटक अशा अनेक हुंडाविरोधी कलाकृतींतून भीती निर्माण होईल, लगेच आंतरिक सुधारणा होईलच असे नाही. तरीही अशा कलाकृती सातत्याने निर्माण होत रहाव्यात, जेणेकरून हळूहळू समाजात विचारपरिवर्तन होईल.

महिला वर्गात हुंड्याविषयी प्रचंड चीड

खेड्यात आजारी पडलेल्या लहान मुलांना चांगल्या डॉक्टरकडे नेण्याऐवजी अंगारे, धुपारे, गंडेदोरे, ताईत बांधून त्याला बरे वाटेल असे सांगणारे भेटताच त्यांच्या आहारी लोक जातात व प्रसंगी बाळाला अपाय होतो. विंचू चावला तर मंत्राने उतरवणारे ग्रामीण भागात आढळतात. डॉक्टरांपेक्षा मांत्रिकच खेडुतांवर आपला प्रभाव पाडून असतात.

एखाद्याच्या हातून पाल मेली, तर देवळात सोन्याची पाल करून ठेवावी लागते. कुत्र्याचे विव्हळणे ऐकू आले, तर घरातील कुणाचा तरी मृत्यू होणार, अशी भीती वाटते. घरावर कावळा ओरडला तर पाहुणे हमखास येणार, घुबडाचे दर्शन झाले तर घरातल्या लहान बालकाचा मृत्यू होणार. स्वप्नामुळे लहान मूल झोपेत ओरडले, तर त्याच्या उशाखाली चामड्याची चप्पल ठेवायची. का? तर म्हणे भूत चामड्याला घाबरतं. केसात जट झाली की, त्या मुलीचा देवदासीत समावेश करायचा. अशा अंधश्रद्धा प्रत्येक घरात पहायला मिळतात. वास्तविक पाहता केसाच्या अस्वच्छतेमुळे जट तयार होते. कुत्रे केव्हाही विव्हळतात. कावळे कुठेही आणि केव्हाही ओरडतात. घुबड तर कितीतरी ठिकाणी दिसतात.



पिढीने घ्याव्यात. सामूहिक परिचयोत्तर विवाहांचे आयोजन केले जावे. मुलामुलींना मोकळ्या वातावरणात भेटू द्यावे, प्रेमविवाह होऊ द्यावेत. पत्नी ही क्रयवस्तू नसून सहधर्मचारिणी आहे, याचे भान तरुणांना व्हावयास हवे. लग्नसंस्था समानतेच्या पायावर उभी राहावी. बराच सुशिक्षित समाज आज जागृत होतो आहे; पण ग्रामीण भागात जिथे शिक्षण व विचारजागृतीचे प्रमाण अत्यल्प आहे, तिथे शासनाने सामाजिक संस्थांच्या मदतीने चर्चासत्रे, जागृती संमेलने आदी भरवली पाहिजेत. स्त्री ही आदिशक्तीचे रूप आहे. तिने दुर्गा, काली, महिषासुरमर्दिनीचे रूप धारण करून छळणाऱ्यांना धडा शिकवण्याचा काळ आता आला आहे. अन्यथा मुलींच्या गळ्यातील मंगळसूत्रच गळफास व्हायला वेळ लागणार नाही.

## १७. अंधश्रद्धा : भीषण समस्या

भारतीय समाजाला मिळालेला एक शाप म्हणजे अंधश्रद्धा. विचार करण्याची क्षमता हरवून बसलेला व्यक्ती अंधश्रद्ध होत जातो. वास्तविक 'श्रद्धा' ही अनमोल ठेव आहे. आईवडील, गरुजन, काही विशिष्ट व्यक्ती किंवा अभिमानास्पद गोष्टींप्रती श्रद्धा

असणे चांगलेच; परंतु जेव्हा अंधश्रद्धेचा अतिरेक होतो, तेव्हा अंधश्रद्धा निर्माण होते. परमेश्वरी अदृश्य शक्तीवर माणसाची श्रद्धा होती. प्राचीन कालखंडात सूर्य, चंद्र, हवा, पाणी यांमध्ये परमेश्वर पाहिला जाई. काळ बदलला आणि मानवनिर्मित परमेश्वर अस्तित्वात आले. दगडाला शेंदूर फासून श्रद्धेची स्थाने निर्माण केली गेली; परंतु पुढे ही संपूर्ण व्यवस्था अंधश्रद्धेत परावर्तीत झाली. त्याचा फायदा काही संधीसाधूंनी घेतला. बुवाबाजी सुरू झाली. चमत्कार केले जाऊ लागले आणि समाजापुढे 'अंधश्रद्धे'चे नवे संकट उभे ठाकले.

परंपरेने चालत आलेल्या गोष्टी त्यातील निरर्थकता कळत असूनही अंगीकारणे ही एकप्रकारची अंधश्रद्धाच आहे. निरक्षरता, गैरसमजुती, अज्ञान आणि सामाजिक, वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या अभावामुळे अंधश्रद्धानिर्मितीला खतपाणी मिळते. हळूहळू ती फोफावते. घरातील रूढी, परंपरा, सभोवतालचे सामाजिक वातावरण, अज्ञान, अनिश्चितता आणि आत्मविश्वासाचा अभाव यांमुळे शिक्षित तसेच अशिक्षित स्त्रीपुरुषही अंधश्रद्धेला बळी पडतात.

अंधश्रद्धेची काही उदाहरणे अभ्यासणे ह्या ठिकाणी आवश्यक वाटते. मूल जन्माला येताच पाचवी, सटवीची पूजा कशासाठी? घरातील वृद्ध स्त्रियांनी किंवा पुरुषांनी सांगितली म्हणून. आजची डॉक्टर, इंजिनियर झालेली उच्चपदस्थ आई किंवा



मुलाचा पिताही त्या पूजा सूतिकागृहात करताना दिसतात. जीवनात प्रत्येकालाच सुखाबरोबर दुःखाला सामोरे जावे लागते. अनेकदा लहानमोठी संकटे येतात. त्यांना आत्मविश्वासाने, धैर्याने तोंड देण्याऐवजी बुवाबाजीला फसून गंडेदोरे, ताईत, नवस अशाप्रकारच्या अंधश्रद्धेला कवटाळले जाते. त्यातून कधीही चांगले निष्पन्न होत नाही. याचा अनुभव असला तरीही समाज आंधळेपणाने त्याचा स्वीकार करतो. सुशिक्षित, द्वि किंवा त्रिपदवीध र मंडळीही पत्रिका बघणे, ज्योतिष्यावर विश्वास ठेवणे, वृत्तपत्रांतून छापून येणारे किंवा दूरचित्रवाण्यांवरून प्रसारित होणारे भविष्य पाहणे, ग्रहशांती करणे, पोथ्या वाचणे, देवदेवतांना नवस बोलणे अशाप्रकारे अंधश्रद्ध झालेल्या दिसतात. स्वतःच्या कर्तृत्वावर, सामर्थ्यावर, सद्सद्विवेकबुद्धीवर त्यांचा दृढ विश्वास नसल्यामुळेच ते असे कुमार्ग अवलंबितात, असे वाटते.

अंधश्रद्ध समाजामध्ये ढोंगी साधूंची चलती असते. ते अपशकुनाच्या बतावण्या करून प्रायश्चित्ताचे निमित्त सांगून गोरगरिबांना, अडाणी, अशिक्षितांना लुबाडत असतात. त्यांच्या अगतिकतेचा, दारिद्र्याचा व अंधश्रद्धेचा फायदा उठवून नको ती भीती त्यांच्या मनात हे ढोंगी भरवतात व नरबळी, पशुबळी, सुवर्णदान, अन्नदान अशी कार्ये करण्यास भाग पाडतात.

करून, हिमतीने, आत्मविश्वासाने, वैज्ञानिक दृष्टिकोण ठेवून प्रयत्न केले तर अंधश्रद्धेला काही प्रमाणात निश्चितच आळा बसेल.

समाजाला पोखरणारी ही व्याधी संपवायची असेल तर समाजप्रबोधनाची अत्यंत आवश्यकता आहे. अंधश्रद्धेतला फोलपणा गरीब, श्रीमंत, अज्ञानी, शिक्षित, लहान, थोर अशा सगळ्यांनाच पटवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणांनी, विद्यार्थ्यांनी समाजसेवकांनी मनापासून प्रयत्न केले पाहिजेत. स्वतःच्या उदाहरणाने सामान्य जनतेला विज्ञानाचे महत्त्व सांगून स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवायला शिकवले पाहिजे, तेव्हाच अंधश्रद्धानिर्मूलनाचे कार्य खऱ्या अर्थाने आकाराला येईल.

समाप्त



लहान मूल म्हटले तर ते स्वप्नात घाबरणार, ओरडणारच. अशा या सर्व गोष्टींचा संबंध अंधश्रद्धांशी जोडला जातो.

प्रत्यक्षात भूत कोणी पाहिले नसले तरी त्याची भीती दाखवून मांत्रिक बनून त्यावर इलाज सांगणारे भोंदू ठायीठायी आढळतात. कारणे अज्ञात असलेल्या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी अशिक्षित तसेच सुशिक्षित अंगात देव येणाऱ्या ढोंगी माणसांच्या नादी लागून त्याने मागितलेले पैसे देऊन सुचविलेले अघोरी उपचारही करताना आढळतात. ही सारी अंधश्रद्धा समूळ उपटून टाकली पाहिजे.

एकविसाव्या शतकात आजच्या विज्ञानयुगात आम्ही अजूनही अंधश्रद्धांना कवटाळून बसलो आहोत, याचे प्रत्यंतर वरील उदाहरणांवरून सहज येते. हल्ली नवीन वास्तूची लाभालभ्यता यावर ज्योतिषी भाष्य करू लागले आहेत. विशिष्ट दिशांनाच स्वयंपाकघर, देवघर, शयनकक्ष असायला हवे, नाहीतर ते घर लाभत नाही, असे सांगितले जाते. त्याची शांती करायला हजारो रुपये खर्च करा किंवा ह्या वास्तुशास्त्राप्रमाणे जुने घर पाडून नवे बांधा. त्याकरिता लाखो रुपये खर्च करा. हा शुद्ध मूर्खपणा किंवा अंधश्रद्धेचा कळस नाही का? यापूर्वी जी घरे हवा, पाऊस, सूर्यप्रकाश वगैरेच्या सोयीने बांधली गेली ती

काय मूर्खपणाने? वर्षानुवर्षे सर्व लोक त्यात राहिले तेव्हा ती त्यांना बाधली नाहीत आणि आता ही कोण नवीन तज्ञ मंडळी आली आहेत, की वायव्येला अमूक खोली बांधा आणि ईशान्येला अमूक म्हणून सांगताहेत? त्यामागे काही वैज्ञानिक कारण आहे, की अर्थकारण?

वैज्ञानिक कसोटीवर यातील अनेक अंधश्रद्धांचा पडदाफार्श करता येतो. अंधश्रद्धानिर्मूलन समितीचे कार्यकर्ते, राष्ट्रीय सेवा योजनेतून काम करणारे प्राध्यापक, विद्यार्थी गरीब, अशिक्षितांच्या मनातून ह्या अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात; पण शिक्षित, श्रीमंत, उच्चपदस्थ जेव्हा पत्रिका बघतात, ग्रहशांती करतात, कालसर्पयोग पूजा करतात, देवदेवतांना नवस बोलतात, पीडा टाळण्यासाठी पोथ्या वाचतात, चित्रपटाच्या निर्मितीसाठी, निवडणुकांचे अर्ज भरण्यासाठी मुहूर्त पाहतात, त्यांना काय म्हणावे?

आईवडिलांच्या मृत्यूनंतर दसवी, तेरवी, वर्षश्राद्ध वगैरे कार्यासाठीसुद्धा नातलग, जातवाले, समाजातील लोक काय म्हणतील, या ध ााकाने मुले अफाट खर्च अगदी कर्ज काढूनही करतात. ते नाही केले तर आपण नरकात जाऊ, असा समज असणे ही निखालस अंधश्रद्धा आहे. मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते, हे कुणालाही माहीत नाही.



परंपरेने चालत आलेली ही रूढी भटभिक्षुकांनी सगळ्यांच्या गळी उतरवली आहे. त्यामुळे सुशिक्षितातलाही एखादाच ह्या रूढीला विरोध करतो. इतर परंपरेचे पालन करतात, तेव्हा अशिक्षित, अडाण्यांनी लगेच सुधरावे, अशी अपेक्षा तरी कशी करणार?

गेल्या शतकात गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदींनी जनजागृतीसाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी भजन, कीर्तन, काव्यलेखन, भाषण यांतून प्रहार केले. बळी म्हणून बकरा मारणाऱ्याला 'मुक्या जनावराला मारू नका, त्याने तुमचा काही अपराध केला नाही' हे पटवून दिले. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. सत्यनारायण केल्याने संकटे दूर होत नाहीत, हे सिद्ध करून दाखवले. दगडाच्या देवापेक्षा माणसातला देव शोधण्याचे आवाहन केले.

परंपरावादी कल्पना आणि रूढींपासून मुक्त होण्यासाठी सर्वांनीच विशेषतः तरुण-तरुणींनी स्वतःच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. स्वतःच्या सुखमय जीवनासाठी, दुःखनिवारणासाठी, रोगमुक्ततेसाठी, संकटांवर मात करण्यासाठी भोंदूगिरी करणाऱ्या तथाकथित साधूंच्या किंवा अंधश्रद्धेच्या नादी न लागता प्रत्येकाने आपल्या बुद्धीचा उपयोग